ॐ

उपनिषत्परमामृतम् ।

महाराष्ट्रभाषाटीकया युतम् ।

प्रथमः खंडः ।

१ वेदान्तरहस्यम् ।

२ ईशावास्योपनिषत् ।

३ केनोपनिषत् ।

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ।

मूल्यं ८ आणकाः

प्रस्थानत्रयमाला।

ॐ

उपनिषत्परमामृतम्।

महाराष्ट्रभाषाटीकया युतम्।

प्रथमः खंडः।

सेयं टीका

मुमुक्षुजनानां त्रिविधतापहरणाय

परशुराम हरि थत्ते, चिपळूणकर,

धर्माधिकारी, केतकीत्रिवल्ल्यादि द्वादशग्राम,

अध्यापक, एल्फिन्स्टन मिडल स्कूल, मुंबई,

इत्यभिधेन विरचिता।

तच्च

मुंबापुर्याम्

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक इत्युपाह्वेन

ग० 'कृ०जी' मुद्रणयंत्रालये मुद्रयित्वा प्रकाशितम्।

शकाब्दाः १८२६, ख्रिस्ताब्दाः १९०४.

मूल्यं ८ आणकाः।

प्रस्तावना.

१ सर्वराष्ट्रीय धर्मसभेंत आमच्या वेदान्त धर्माचें आविष्करण करण्याकरितां प्रस्तुत कैवल्यरूप स्वामी विवेकानन्द यांस मागें आमच्या मद्रासकर बंधूंनीं अमेरिकेंत शिकागो येथें पाठविलें होतें. तेथून ते इकडे येऊन मद्रासेस इ० स० १८९७ फेब्रुवारी ६ रोजीं दाखल झाले. तेव्हां ते नऊ रात्र तेथें राहिले व त्यांनीं पांच व्याख्यानें दिलीं. त्यांपैकीं एक व्याख्यान त्यांनीं पचाप्पा कालेजमध्यें दिलें. तें इतकें उत्तम वठलें कीं तें प्रत्येकास आवडलें, पण तें सगळें कोठेंहि प्रसिद्ध झालें नाहीं तेव्हां तें सविस्तर वाचावयास मिळावें ह्मणून लोक अत्यंत उत्कंठित झाले, ह्मणून तें पुन्हा सविस्तर लिहवून छापून काढिलें. "The Vedanta In Its Application To Indian Life" हें तें इंग्रजी व्याख्यान. त्याचें हें पुढील मराठी भाषांतर आहे.

२ मद्रास येथें नवरात्र वास करीत असतां स्वामी विवेकानन्द यांस केंब्रिज कान्फरन्सिसचे लुई जेन्सादि दहा पण्डित यांजकडून एक पत्र आलें, त्यांत त्यांच्या तिकडील कामगिरीबद्दल एक अत्यंत महत्वाचें कलम आहे, तें असें:—

" Such expositions as have been given by yourself + + have more than a mere speculative interest and utility,–that they are of great ethical value in cementing the ties of friendship and brotherhood between distant peoples, and in helping us to realize + + solidarity of human relationships and interests."

३ वरील कलमांतील आशय सदरहू व्याख्यानास विशेषेंकरून लागू पडण्यासारिखा आहे. कारण त्याप्रमाणें आमचे लोक अभ्यासवैराग्यपूर्वक आचरण करतील तर आमच्या हिंदु लोकांत प्रस्तुत जिकडे तिकडे दुही, आपलपोटेपणा, मात्सर्य, उदासीनता वगैरे जे दुर्गुण माजून राहिले आहेत व आमच्या समाजाचा सत्यानाश करीत आहेत त्यांचा प्रतिकार होऊं लागेल. त्या व्याख्यानांत नुस्तें तत्वज्ञानच भरलें नाहीं तर उदात्त नीतितत्वें कीं जीं दूरदूरच्या लोकांस मैत्री व बंधुत्व यांच्या पाशांनीं बेमालूम बद्ध करून सोडितात व सगळ्या लोकांचें अद्वितीयत्व मूर्तिमंत दाखवितात त्या नीतितत्वांनीं तें ओतप्रोत भरलें आहे. तें हिंदुस्तानांतील फुटलेल्या अगणित वेदधर्मानुयायी लोकांस एकजीवकरून सर्व हिंदुस्थान देशास राष्ट्रीयत्वाची स्फूर्ति देण्यासारिखें आहे.

४ ह्मणून तें मुद्दाम मराठींत करून आह्मीं आमच्या मराठी जाणणाऱ्या लोकांस सादर समर्पण केलें आहे. तें त्यांनीं गोड करून घ्यावें ही विनंति.

५ पुढील त्रिपुटीचें ऐक्य पहाः—

१ व्याख्यानकारः—
बंगाली.
२ श्रोतेः—
मद्रासी.
३ भाषांतरकारः—
मराठा.

मुंबई.
१२सपटंबर१९०२

प०ह०थ०

ॐ

वेदान्तरहस्य,

अथवा

प्रत्येक हिंदूच्या संसारांत उपयोगीं पडण्याजोगीं वेदाचीं तत्वें.

आमच्या भाषेंत एक शब्द आहे, तो आमची जात व धर्म यांस सामान्यत्वेंकरून लागतो. तो शब्द कोणता ह्मणाल तर "हिंदू" हा होय. त्या शब्दाचा वेदान्ताशीं जो संबंध आहे, त्याचा विचार करितां त्याचें थोडेंसें विवरण केलें पाहिजे. जुने पारशी अथवा इराणी लोक हिंदू हा शब्द सिंधू नदीस लावीत असत. जेथें जेथें संस्कृतांत 'स' हें अक्षर येतें, तेथें तेथें जुन्या पारशी भाषेंत 'ह' हें अक्षर येतें, याप्रमाणें संस्कृतांतील सिंधू या शब्दाचें पारशींत हिंदू होतें. ग्रीकांस ह्मणजे प्राचीन यवनलोकांस हचा उच्चार करणें कठीण गेलें ह्मणून त्यांनीं हिंदू शब्दांतील तो ह अजीबात गाळून टाकिला. तेणेंकरून आपल्यास युरोपियन भाषांत इंडियन हें नांव पडलें. तेव्हां हिंदू ह्मणजे सिंधूच्या अलीकडे राहणारे लोक, असा अर्थ होतो. प्राचीन काळीं सदरहू शब्दाचा हा किंवा दुसरा कोणताहि अर्थ असो, पण तो त्याचा अर्थ प्रस्तुत मुळींच राहिला नाहीं. कारण सिंधूच्या अलीकडे हल्लीं जे लोक राहत आहेत, ते एका धर्माचे राहिले नाहींत. त्यांत नांवाप्रमाणें खरे हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, बौद्ध व जैन यांचा समावेश

होतो. हिंदू या शब्दाच्या मूळ अर्थाप्रमाणें त्यांत या झाडून सर्व जातींचा अंतर्भाव होतो, पण त्यांच्या धर्माकडेच लक्ष दिलें तर ह्या सर्व जातींस हिंदू ह्मणणें वाजवी होणार नाहीं. तर या धर्मांत निरनिराळे धर्म, निरनिराळ्या कल्पना, निरनिराळे संस्कार, प्रघात व मूर्ति ह्यांचा अंतर्भाव होतो, पण त्यांतील अमूक अमक्या ठिकाणांतून घेतलें व त्याचें नामरूप अमूक व त्यांतील अमूक अमक्या धर्मांतील व त्याची व्यवस्था अमूक असें नुसतें सांगण्याला सुद्धां त्यांत मुळींच जागा राहिलेली नाहीं. पण ज्या केंद्रांत ह्मणजे बिंदुस्थानीं आमच्या सर्व पोटजातींचें ऐक्य होतें, तो कोणता होय ह्मणाल तर वेद नामक जे धर्मग्रंथ आहेत त्यांवर आह्मी झाडून सर्व भरंवसा ठेवितों हा होय. वेदांचें वर्चस्व जो कबूल करीत नाहीं, त्यास हिंदू ह्मणवून घेण्याचा हक्क नाहीं हें त्यांत अगदीं निश्चित आहे. हें सर्वांस ठाऊक आहे कीं ह्या सर्व वेदांचे दोन भाग आहेत:—कर्मकांड व ज्ञानकांड. कर्मकांडांत यज्ञ व यज्ञसंस्कार यांचा समावेश होतो, पण त्यांतील बहुतेक कर्मं प्रस्तुत निरुपयोगी झालीं आहेत. ज्ञानकांडांत वेदांतील आध्यात्मिक ज्ञानाचा समावेश होतो. आमचे गुरु, तत्वज्ञानी व ग्रंथकार, मग ते द्वैती अथवा विशिष्टाद्वैती अथवा अद्वैती असोत, ते त्या आध्यात्मिक विषयावर उपनिषदें, ब्रह्मसूत्रें वगैरे वेदान्ताचे ग्रंथ प्रमाणभूत मानितात. या भरतखंडांतील मनुष्याची जात किंवा पंथ किंवा तत्व कोणतेंहि असो, त्यास त्याला अधार पहावयाचा तर तो त्यास उपनिषदांत पाहावा लागतो. ह्मणून ह्या भरतभूमींतील अर्वाचीन काळीं विद्यमान प्रत्येक हिंदुस जें एक नांव लागतें, तें वेदान्ती किंवा वैदिक हें होय व त्याच अर्थानें आह्मी वेदान्त व वेदान्ती हे शब्द योजितों. पण अलीकडे वेदान्त ह्मणजे अद्वैत वेदान्त पंथ असें

समजण्याचा बहुतेक लोकांचा परिपाठ पडला आहे. ह्मणून त्यासंबंधें थोडेंसें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. उपनिषदांच्या आधारें अनेक तत्वज्ञानाचे पंथ संस्थापित झाले आहेत. त्या पंथांपैकीं अद्वैत ही एक शाखा आहे. अद्वैत पंथाचे जे अनुयायी आहेत, ते उपनिषदांस जितके पूज्य मानितात, तितकेच विशिष्टाद्वैत पंथाचे जे अनुयायी आहेत ते त्यास पूज्य मानितात. अद्वैती हे वेदान्त ग्रंथांस जितके प्रमाणभूत मानितात तितकेच विशिष्टाद्वैतीहि त्यांस पूज्य मानितात.तीच स्थिति द्वैत्यांची आहे. त्याप्रमाणेंच स्थिति हिंदुस्थानांतील दुसऱ्या प्रत्येक पंथाच्या लोकांची आहे.पण सामान्य लोकांच्या मताप्रमाणें वेदान्ती हा शब्द कांहींसा अद्वैती लोकांसच लागतो व त्याचें एक कारण आहे. तें असें कीं, आह्मीं जसे वेदांस धर्मग्रंथ मानितों त्याप्रमाणेंच पुढें झालेले ग्रंथ जे स्मृति व पुराणें हे त्या वेदांच्या मतांचें स्पष्टीकरण करणारे आहेत असें मानितों; अलबत, ह्या ग्रंथांस वेदा इतकें महत्व नाहीं आणि ह्मणून जेथें जेथें हीं पुराणें व स्मृति यांचें श्रुतीच्या एकाद्या भागापासून भिन्नत्व आढळेल तेथें तेथें श्रुती पाळाव्या व स्मृतींचा निषेध करावा असा नियमच आहे.[१] आतां महा अद्वैत सिद्धांताचे संस्थापक जे शंकराचार्य यांच्या विवरणांत व त्यांनीं स्थापिलेल्या पंथांत असें आढळतें कीं त्यांनीं दिलेलीं प्रमाणें बहुतेक उपनिषदांतील आहेत; त्यांत स्मृतींतील प्रमाण मुळींच आलें नाहीं व एकादें आलें असेल तर तें तरी जो मुद्दा श्रुतींत आढळण्यासारिखा नव्हता, त्याच्या स्पष्टीकरणार्थ आलें आहे. दुसऱ्या पक्षीं, दुसऱ्या पंथांत स्मृतीचा आश्रय अधिकाधिक केला आहे व श्रुतीचा कमी कमी केला आहे व जों जों आ-

---

१ श्रुतिस्मृतिविरोधे तु श्रुतिरेव बलियसी ।

पण द्वैतपंथाकडे जावें, तों तों आह्मांस असें आढळतें कीं या वेदान्त्यांपासून आपण स्मृतींतील जितक्या प्रमाणांची अपेक्षा करितों, त्यापेक्षां त्या पंथाच्या ग्रंथांत घेतलेलीं जीं अवतरणें आहेत, तीं अगदींच थोडीं आहेत. तीं इतकीं कीं त्यांचा थोडेपणा त्या वैदिक ह्मणविण्याऱ्या पंथास शोभत नाहीं. द्वैत्यांनीं पुराणांतील प्रमाणांस असें प्राधान्य दिलें ह्मणुन अद्वैत्यांस उत्कृष्ट वेदान्ती असें ह्मणूं लागले असावे असें वाटतें.

तथापि असें झालें असेल कीं वेद हें आमचें अनादि व अत्यंत पुरातन वाङ्मय आहे. ह्मणून त्यांतील वेदान्त हा शब्द हिंदुधर्माची सगळी जागा व्यापितो, कारण अर्वाचीन विद्वानांच्या कल्पना कांहींहि असोत, तरी वेदांचा कांहीं भाग एकावेळीं लिहिण्यांत आला व दुसरा दुसरेवेळीं लिहिण्यांत आला हें त्यांचें ह्मणणें कबूल करण्यास हिंदू लोक तयार नाहींत. अलबत, ते आपल्या अशा मताला अद्याप चिकटून आहेत कीं वेद हे ईश्वराच्या मनांत सदैव व निरंतर वास करीतात, त्याअर्थी वेद हे एकदम उत्पन्न झाले असें ह्मणण्यापेक्षां ते स्वयंभू आहेत, ते कधींच उत्पन्न झाले नाहींत असें ह्मणणें आह्मास बरें वाटतें. यावरून वेदान्त हा शब्द आमच्या द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत धर्माची सगळी जागा व्यापितो ह्याचा अर्थ काय हें कोणासहि समजेल. बौद्ध व जैन लोक आमच्यांत मोडावयास तयार असतील तर त्यांच्या धर्मासहि आमच्यांत अंशतः घेण्यासारिखीं आमचीं हृदयें उदार आहेत. पण तेच आमच्यांत मोडावयास खुशी नाहींत; बाकी त्यांस आमच्यांत घ्यावयास आह्मी एका पायावर तयार आहों. बौद्ध धर्माचें चांगलें साद्यंत पृथक्करण केलें तर आपल्यास असें दिसून येतें कीं बौद्ध धर्माचा सारभूत भाग जेवढा आहे तेवढा झाडून सगळा उपनिषदांतूनच उसना घेतलेला आहे. फार तर काय पण बौद्ध

धर्मांतील फार नांवाजलेलें चमत्कारिक व मोठें जें नीति-शास्त्र आहे, तें सुद्धां उपनिषदांच्या कोणत्या ना कोणत्या तरी पुस्तकांत शब्दशः आहे, तशींच जैन लोकांचीं सगळीं चांगलीं मतेंहि त्यांत आहेत. फक्त त्यांच्या वेडगळ मतांस मात्र त्यांत थारा नाहीं. आपल्या धर्माच्या विचारांच्या पुढील सगळ्या विकासाचें बीं देखील त्या उपनिषदांतच आहे. उपनिषदांत भक्तीचें इष्ट स्वरूप आढळत नाहीं असें कधीं कधीं प्रतिपादण्यांत येतें, पण त्या ह्मणण्यास मुळांत मुळींच आधार नाहीं. उपनिषदांचा अभ्यास ज्यांनीं वरवर हि केला आहे, त्यांस हें मुळींच खरें नाहीं हें पक्कें समजलें आहे. आपण बरोबर शोध केला तर प्रत्येक उपनिषदांत पुरा भक्तिरस आढळेल. पुराणें व स्मृति यांमध्यें पुढील काळांत पूर्ण विकास पावलेल्या ज्या दुसऱ्या कल्पना आहेत त्या उपनिषदांत बीजरूपानें आहेत. ह्मणजे त्यांत त्यांचा आराखडा आहे. त्याला जी परिपूर्णता आली आहे ती कांहीं पुराणांत मिळाली आहे. पण अशी एकहि आमची परिपक्क इष्ट सृष्टि नाहीं कीं ज्याचा छडा त्याच उगमस्थानाकडे ह्मणजे उपनिषदांकडे लागत नाहीं. उपनिषदांत फारसें गम्य नसलेल्या कांहीं पुरुषांनीं इकडील भक्तीचा माग कांहीं विदेशी उगमस्थानाकडे नेऊन पोहोंचविण्याचे प्रयत्न अगदीं हसूं येण्यासारिखे केले आहेत. पण त्यांचे ते सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. कारण आपणांस भक्तीचें इष्टरूप दाखविण्यास उपनिषदेंच कशाला हावींत, तें संहितांत देखील आहे. त्यांत पूजन, अर्चन, भक्ति व तिचें सर्व कांहीं आहे. फक्त त्यांत भक्तीची इष्ट सृष्टि अधिकाधिक उन्नत होत आहे. संहितांमध्यें भय व सत्वपरीक्षा (कसोटी) यांचे जागोजाग माग सांपडतात. संहितांमध्यें वरुण किंवा दुसरा देव यांजपुढें कांपणारा

भक्त आढळतो. पापाच्या विचारानें ते अत्यंत पीडित आहेत असें आढळतें. पण उपनिषदांत ह्या वस्तूंच्या रूपरेखनास मुळींच थारा मिळाला नाहीं. कारण उपनिषदांत भयमूलक धर्माचें विवरण नाहीं; त्यांतील सगळा धर्म भक्तिमूलक व ज्ञानमूलक आहे.

हीं उपनिषदें म्हणजे आमचीं धर्मपुस्तकें होत. त्यांचा अर्थ निरनिराळा होतो. वेद व पुढील पुराणें ह्यांत भेद उत्पन्न होईल तेव्हां पुराणें बातल समजलीं पाहिजेत हें पूर्वी सांगण्यांत आलें आहे. पण ह्याचा व्यावहारिक परिणाम असा झाला आहे कीं आमच्यांत शेंकडा नव्वद पुराणोक्त पद्धतीनें वागणारे आहेत व फार फार झालें तर शेंकडा दहा वेदोक्त पद्धतीनें वागणारे आहेत आणि हेंहि आमच्या पाहण्यांत आहे कीं आमच्यांत अशा विरुद्ध रीतीभाती व धर्ममतें चालत आहेत कीं ज्यांस हिंदू समाजांत चालणाऱ्या धर्मपुस्तकांत मुळींच आधार नाहीं. व अनेक बाबतींत. हें पाहून आश्चर्य वाटतें कीं आमच्या पाहण्यांत व वाचनांत ह्या देशच्या लोकांच्या असल्या रुढी येतात कीं ज्यांस वेद, स्मृति अथवा पुराणें ह्यांत मुळींच आधार नाहीं. पण त्या केवळ त्या त्या जागच्या चाली आहेत. असें असूनही प्रत्येक अजाण खेड्यांतील मनुष्यास वाटतें कीं ती लहान गांवकीची रीत लय पाऊं दिली तर आपण हिंदू राहणार नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें वेदान्त व ह्या क्षुल्लक चाली यांची सांगड अशी बेमालूम झालेली आहे कीं ती कधीं तोडतां येण्यासारिखी नाहीं. धर्मपुस्तकें वाचीत असतां आपण जें काय करीत आलों तें शास्त्रसंमत नाहीं व तें सोडून दिलें तर आपल्यास मुळींच इजा होणार नाहीं, पण उलट आपली सुधारणा होईल हें त्यांस समजण्यास जड जातें. दुसरी एक अडचण आहे. आमचीं हीं धर्मपुस्तकें फार

मोठीं आहेत. पतंजलीचा तत्वज्ञानविषयक महाभाष्य नामक एक ग्रंथ आहे त्यावरून असें कळतें कीं नुसत्या सामवेदाच्या हजार शाखा असत. त्या प्रस्तुत कोठें आहेत? हें कोणासहि ठाऊक नाहीं. हीच स्थिति प्रत्येक वेदाची आहे. ह्या पुस्तकांचा प्रधान भाग नाहींसा झाला आहे व फक्त त्यांचा गौण भाग आमच्या जवळ शिल्लक राहिला आहे. ते भाग कांहीं विवक्षित कुळांच्या स्वाधीन केलेले होते ह्या कुळांचें निसंतान झालें किंवा तीं विदेशी लोकांच्या छळानें ठार मारलीं गेलीं; व त्यांच्याबरोबर त्यांच्या स्वाधीन असलेली शाखा लोप पावली. ज्या कोणास एकाद्या नवीन गोष्टीचा उपदेश करावयाचा असेल अथवा एखाद्या वेदविरुद्ध गोष्टीचें देखील समर्थन करावयाचें असेल तर त्यानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. कारण कीं मोठ्या वादळांत जसा गलबतास मोठा नांगर उपयोगीं पडतो, तसा त्यास सदरहू मुद्दा उपयोगीं पडेल. जेव्हां जेव्हां श्रुति व स्थानिक रूढी यांबद्दल वाद उत्पन्न होतो व जेव्हां जेव्हां असें दाखविण्यांत येतें कीं ती स्थानिक रूढी धर्मपुस्तकांच्या विरुद्ध आहे तेव्हां तेव्हां जी कोटी पुढें आणितात ती ही होय कीं ती रूढी दशांच्या विरुद्ध नाहीं, तर लुप्त झालेल्या श्रुतीच्या शाखेंत ती रूढी पूर्वी अस्तित्वांत होती; व असें करणें हीहि एक रूढीच आहे. ह्मणून आमच्या धर्मपुस्तकांचे हे अनेक भिन्न व विचित्र पाठ व त्यांवरील टीका यांमध्यें जो खऱ्या शास्त्रार्थाचा धागा आहे, तो शोधून काढणें कठीण झालें आहे;कारण ह्याबद्दल आमची एकदम खात्री होऊन जाते कीं हे भिन्न विभाग व पोटविभाग ह्यांच्या मुळाशीं कांहीं तरी सामान्य तत्व असलें पाहिजे व ज्याच्यावर हे इमारतीचे लहान लहान तुकडे बांधिलेले जसेच्या तसे लगून राहिले आहेत त्याचा सामान्य बेताचा कांहीं आराखडा

व परस्पर मेळ असला पाहिजे व ज्यास आह्मी धर्म असें ह्मणतों त्या बाहेरून अथांग दिसणाऱ्या घोटाळ्याच्या घटकद्रव्यांच्या मुळाशीं कांहीं सामान्य धर किंवा आधार असला पाहिजे. नाहींतर तो धर्म इतके दिवस राहिला नसता व तो इतके दिवस टिकला नसता.

आतां आपण आमच्या उपनिषदांवरील टीकाकारांकडे वळलों तर ही दुसरी अडचण येऊन उभी राहते. जेव्हां जेव्हां अद्वैतदर्शक पाठ येतो, तेव्हां तेव्हां जो अद्वैतमताभिमानी टीकाकार तो पाठ जशाचा तसाच राखितो, तोच पहावा तों त्याच्यापुढें द्वैतदर्शक पाठ आल्याबरोबर त्याचा चोळामोळा व छल करितो व त्याला काढितां आला तर त्यांतून चमत्कारिक अर्थ काढितो. कधीं कधीं ' न जन्मणारा ' ह्या अर्थाच्या अज शब्दाचा अर्थ बोकड असा करितो. असलीं विलक्षण स्थित्यंतरें होतात. याप्रमाणें द्वैतमताभिमानी टीकाकारहि उपनिषदांतील पाठाशीं तशीच लट्टालट्टी करितात. प्रत्येक द्वैत पाठ जशाचा तसाच राखण्यांत येतो, पण अद्वैत–तत्व–दर्शक जो जो पाठ असेल त्याचा पाहिजे तसा छळ करण्यांत येतो. संस्कृत भाषा इतकी संकीर्ण व त्यांत वेदाची तर संस्कृत भाषा इतकी प्राचीन व एकंदर संस्कृत भाषाशास्त्र इतकें परिपूर्ण आहे कीं एखाद्या शब्दाच्या अर्थासंबंधें तींत पाहिजे तितका वादविवाद युगानुयुग चालवितां येतो. एखाद्या पंडितानें मनांत आणिलें तर पाहिजे त्या मनुष्याच्या बडबडीस पाठ व विधिनियम यांचीं अवतरणें व प्रमाणें देऊन शुद्ध संस्कृत रूप देतां येतें. उपनिषदें समजणाच्या मार्गांत ह्या अडचणी आहेत. सुदैवेंकरून माझा वास अशा मनुष्याबरोबर झाला कीं तो जसा खरा द्वैताभिमानी होता, तसाच तो अद्वैताभिमानी होता, व तो जसा कळकळयुक्त भक्त

होता तसाच तो कळकळयुक्त ज्ञानी होता आणि ह्या पुरुषाच्या समागमें राहत असतां ह्या टीकाकारांमागून अंधासारिखें जाण्यापेक्षां उपनिषदें व धर्मपुस्तकें स्वतंत्र व चांगल्या आधारानें समजण्याची कल्पना माझे मनांत आली; व माझ्या मताप्रमाणें व शोधाप्रमाणें हे पाठ मुळींच परस्पर विरुद्ध नाहींत असें आढळलें. ह्मणून आह्मास पाठ-छलाची भीती मुळींच राहिली नाहीं ! ते पाठ सुंदर आहेत, एवढेंच नाहीं तर ते चमत्कारिक आहेत व ते परस्परविरोधी नाहींत तर चमत्कारिक एकमेळाचे आहेत. ते इतके कीं एक विचार दुसऱ्या विचाराकडे मनुष्यास सहज नेतो. पण त्यांत मला जी एक गोष्ट सांपडली ती ही होय कीं सगळ्या उपनिषदांचा आरंभ द्वैतमूलक विचारांनीं व पूजा अर्चांनीं होतो व त्यांचा शेवट अद्वैतमूलक विचारांच्या मोठ्या ललकारण्यांनीं होतो.

ह्या पुरुषाच्या समागमानें पुढें मला असें कळून चुकलें कीं द्वैतवादी व अद्वैतवादी लोकांनीं एकमेकांशीं झगडण्याचें कारण नाहीं, ह्या राष्ट्राच्या आयुष्यक्रमांत त्या दोहों पंथांतील प्रत्येकास शिरण्यास नुस्ती कशीबशी नव्हे तर मोठी सर्वमान्य सवड आहे. ह्या राष्ट्रांत अद्वैतवादी लोकांप्रमाणें द्वैतवादीहि लोक असले पाहिजेत. ह्या राष्ट्राच्या धार्मिक आयुष्यक्रमांत अद्वैती लोकांची जितकी जरूर आहे, तितकीच द्वैती लोकांची जरूर आहे. एक दुसऱ्या शिवाय असूं शकणार नाहीं; एक दुसऱ्याचें परिपूरक आहे; एकास इमारत मानिली तर दुसऱ्यास तिचें शिखर मानावें लागेल; एकास मूळ मानिलें, तर दुसऱ्यास त्याचें फळ मानिलें पाहिजे आणि असेंच पुढें. आणखीं उपनिषदांच्या मूळ पाठांची ओढाताण करण्याचा प्रयत्न करणें हें आह्मास अत्यंत उपहासास्पद दिसतें,

कारण असें आह्मास आढळूं लागलें आहे कीं उपनिषदांच्या ठायीं अत्यंत मोठ्या तत्वज्ञानाचे व मनुष्यजातीच्या मुक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या धर्माचे चमत्कारिक गुण आहेत. शिवाय, त्यांची भाषा इतकी लोकोत्तर आहे कीं तीं या दुनियेंतील वैभवाचीं अत्यंत चमत्कारिक चित्रें आहेत. त्यांत मनुष्याच्या मनाचें व्यक्तिस्वातंत्र्य व आह्मा हिंदू लोकांच्या अतींद्रिय ज्ञानी मनाचें चित्र ठसठशीत उमटलें आहे. इतर ठिकाणीं दुसऱ्या राष्ट्रांतील वैभवाचीं चित्रें आहेत. पण त्यांतील एकून एक चित्रांत मुख्य झोंक जडवैभवाचें आकलन करण्याकडे आहे. आपण मिल्टन, डान्त, होमर अथवा दुसऱ्या पाश्चिमात्य कवीचें उदाहरण घेऊं. त्यांत चमत्कारिक उन्नत विचार आहेत; पण त्यांत अमर्याद विस्तार व अनंत अवकाश यांच्या इष्ट सृष्टीच्या नाड्या व इंद्रियें यांच्या आकलनाचा सदैव प्रयत्न झालेला आहे. आपल्या संहितेच्या भागामध्यें तसलेच प्रयत्न आढळतात. ज्या ठिकाणीं सृष्टीचें वर्णन केलें आहे व अशाच दुसऱ्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या ऋग्वेदाच्या ऋचा आपल्यास ठाऊक आहेत. त्यांत विस्ताराच्या वैभवाच्या अत्यंत उच्च शिखरांस व अवकाशाच्या अनाद्यनंतावस्थेस हात घालण्याचा प्रयत्न केला आहे; पण अशा प्रकारें आपल्यास त्या अनंतावस्थेचें आकलन होणें शक्य नाहीं व त्यांच्या मनांतील जे विचार बाहेर पडण्यास प्रयत्न करीत होते, ते अमर्याद अवकाश व विस्तार, व अमर्याद बाहेरील सृष्टि यांनीं व्यक्त होण्यासारिखे नाहींत असें त्या मंत्रदृष्ट्या ऋषींस दिसून येतें. तेव्हां उपनिषदांतील भाषा नवीन रूप धरित्ये. ती बहुतेक निषेधार्थी असत्ये, ती कधीं कधीं अव्यवस्थित असते, कधीं कधीं ती आपल्यास आपल्या इंद्रियांच्या बाहेरील विषयांकडे नेत्ये, ती आपल्यास

अर्ध्या रस्त्यावर नेऊन सोडितें व ज्याचें आपल्यास आकलन होणार नाहीं व जें आपल्यास इंद्रियांनीं समजत नाहीं तें ती दुरून दाखविते. तेव्हां तें तेथें आहे असें आपल्या मनास पक्कें पटतें हें मात्र अगदीं खचीत. दुनियेंतील कोणतीं कवनें पुढील काव्याची बरोबरी करतील बरें!

न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकम्
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ॥

याचें भाषांतर असें:–" त्या ठिकाणीं सूर्य, चंद्र, तारे, फार तर काय विजेची चमक सुद्धां प्रकाशूं शकत नाहीं, तर तेथें ह्या मृत्युलोकच्या विस्तवाचा पाड काय !" यापरता सगळ्या दुनियेच्या सर्व तत्व–ज्ञानाचा, आह्मां हिंदूंच्या आजपर्यंत चाललेल्या सर्व विचारांच्या साराचा अधिक परिपूर्ण उद्गार, व मनुष्याच्या मुक्तीचें अधिक सुंदर शब्द–चित्र व अधिक अद्भुत अलंकार आपल्यास कोठें आढळेल काय ?

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्योऽभिचाकशीति ॥ ४४ ॥
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः । जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥ ४५ ॥

तृतीय मुण्डके प्रथमः खण्डः ॥

एका वृक्षावर दोन पक्षी आहेत. त्या दोघांचा पिसारा सुंदर आहे. त्यांचें परस्पर मोठें जीवश्चकंठश्च आहे. त्यांतील एक पक्षी त्या झाडाचीं गोड फळें खातो व दुसरा कांहीं

एक न खातां तेथें शांत व स्तब्ध बसतो. खालच्या खांदीवर जो पक्षी आहे, तो आळीपाळीनें गोड व कडू फळें खातो व वरच्या खांदीवर जो पक्षी आहे, तो स्थिर व वैभवयुक्त आहे. तो गोड किंवा कडू फळें खात नाहीं, तो सुखदुःखाची पर्वा करीत नाहीं, व आपल्याच मोठेपणांत गर्क असतो. हें मनुष्याच्या आत्म्याचें चित्र आहे. मनुष्य ह्या संसारांतील सुखदुःखाचीं फळें खातो तो पैसेरुके व सोनेरुपें हें मिळविण्याच्या छंदास लागतो, तो आपल्या इंद्रियांच्या नादीं लागतो, तो संसारांतील वृथा वैभवाच्या पाठीस लागतो व तो निराशेनें व वेडपणानें धडपडत संसारयात्रा चालवितो. दुसऱ्या स्थळीं उपनिषदांत त्याची तुलना सारथी व अनियंत्रित बेफाम घोडे याशीं केली आहे. संसारांतील वृथा वैभवाच्या पाठीमागें लागलेल्या लोकांचें, वृथा सुखाचीं स्वप्नें पाहणाऱ्या मुलांचें, व गतकर्मांचें चर्वण करणाऱ्या, पण या मायाजालांतून कसें सुटावें हें न उमजणाऱ्या ज्ञात्याऱ्या लोकांचें चरित्र हें असें असतें. आह्मी असेच आहों; पण प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यक्रमांत असे सोन्यासारिखे सुक्षण येतात व अत्यंत दुःखामध्यें, इतकेंच नव्हे तर अत्यंत आनंदामध्यें-हि असे सुक्षण येतात कीं ज्या वेळीं ज्या ढगानें सूर्याचा प्रकाश झांकला असतो, तो ढग एका बाजूस आपोआप जातो व आह्मी जाणून बुजून प्रयत्न करीत नसतांहि पलीकडचें दूरचें, इंद्रियांपलीकडील दूरचें, वृथा अभिमानाच्या गोष्टीपलीकडील दूरचें, सुखदुःखापलीकडील दूरचें, सृष्टीपलीकडील दूरचें, इहलौकिक अथवा पारलौकिक सुखाच्या कल्पनामधील द्रव्य, अथवा कीर्ति अथवा नांवलौकिक अथवा संतति यांच्या तृष्णेच्या पलीकडील दूरचें न सांगतां येण्यासारिखें कांहीं तरी आपल्या नजरेस पडतें. हा दृष्टांत

होत असतां मनुष्य क्षणमात्र थांबतो व शांत व वैभवशाली गोड किंवा कडू फळें न खाणाऱ्या, स्वतःच्या मोठेपणांत गढलेल्या, आत्मसंतुष्ट व स्वसमाधानी दुसऱ्या पक्ष्यास पाहतो. गीतेंत सांगितलेंच आहे कीं "जे आत्म्यामध्यें संतुष्ट आहेत व ज्यांस आत्म्यापलीकडील कांहीं एक नको असतें, त्यांस कर्म करण्याची काय जरूर? त्यांनीं कर्माच्या खटाटोपांत कां पडावें?" त्याला असा दृष्टांत होतो नंतर पुन्हा त्याला विसर पडतो, तो संसारांतील सुखदुःखाचीं फळें खात राहतो, त्याला पुन्हां प्रत्येक गोष्टीचा विसर पडतो, कांहीं वेळानें त्याला पुन्हां दृष्टांत होतो व जगाचे जसे टोले बसतात तसा खालचा पक्षी वरच्या पक्ष्याच्या अधिकाधिक जवळ येतो; सुदैवेंकरून त्यास जास्त टोले बसले तर तो आपला स्नेही, दोस्त, दिलप्यारा, जो दुसरा पक्षी याजवळ आणखीं अधिकाधिक येतो व तो जसजसा जवळ जातो, तसतसें त्यास आढळूं लागतें कीं दुसऱ्या पक्ष्याजवळचें तेज येऊन त्याच्या स्वतःच्या पिसाऱ्याभोंवती झळकत आहे व तो जसजसा जवळ जातो तसतसें पहा त्याचें कसें रूपांतर होत जातें तें! तो स्वतः वितळत जातो! तो अधिकाधिक जवळ जातो तसा तो सर्वस्वीं अंतर्धान पावतो! त्याचें अस्तित्व राहत नाहीं! तो हालणाऱ्या पानांवर निश्चळ व वैभवशाली व सदैव शांत बसलेल्या दुसऱ्या पक्ष्याशीं सरूप होतो. त्यास वरच्या पक्ष्याचें वैभवसर्वस्व प्राप्त होतें. असें झालें असतां त्यास पुढें भीतीचा लवलेशहि बाधत नाहीं; त्यास पुरें समाधान असतें व तो शांत व गंभीर वृत्तीनें राहतो. अशा अलंकाराच्या रूपानें उपनिषदें आपल्यास द्वैतकल्पनेंतून अद्वैतकल्पनेंत नेतात. असलीं उपनिषदांतील अद्भुत काव्यें, उदात्त व प्रौढ कल्पनांचीं चित्रें, हीं दाखविण्याकरितां पाहिजे तितकीं उदा-

हरणावर उदाहरणें देतां येतील. पण स्थलसंकोचास्तव असें करितां येत नाहीं, पण आणखीं एक गोष्ट आहे. ती ही कीं, उपनिषदांची भाषा, विचार व प्रत्येक जें कांहीं आहे तें प्रत्यक्ष प्रगट होतें. त्यांचा मारा तरवारीच्या पात्याप्रमाणें व हातोडीच्या ठोक्याप्रमाणें अमोघ व अचूक असतो. त्यांचा अर्थ लावण्यांत भूलचूक होत नाहीं. त्या गाण्याचा प्रत्येक स्वर निश्चळ असतो व त्याचा परिणाम निःशेष व पुरा होतो. डोकें खराब करणारे घोंटाळे, व अयुक्तिक शब्द व शब्दव्यूह हे त्यांत मुळींच आढळत नाहींत. त्यांत अवनतीचीं चिन्हें मुळींच नाहींत. त्यांत सर्व अर्थ नाहींसा होईतों व मेंदूस भोंवळ आणीतों व वांङ्मयाच्या चक्रव्यूहांत रस्ता समजेनासा होईतों घोंटाळा माजविणारे फाजील दृष्टांत व विशेषणांवर विशेषणांच्या राशी ह्या घालण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. असा प्रकार त्यांत अद्याप आढळला नाहीं. तें वांङ्मय मनुष्यकृत असेल तर ज्यांच्या राष्ट्राच्या शौर्याचा एक अंशसुद्धां अद्याप लोप पावला नाहीं अशा लोकांची ती कृति असली पाहिजे. त्यांच्या प्रत्येक पानांत आपल्यास शक्ति व बळ संपादन करण्याचा उपदेश आहे. सगळ्या वेदान्तांत मोठी लक्षांत ठेवण्यासारिखी जी गोष्ट आहे, ती हीच होय; माझ्या सर्व आयुष्यक्रमांत जो मला मोठा उपदेश मिळाला, तो हाच होय; त्यांत असें ह्मटलें आहे कीं, हे मानवा, तूं दुबळा राहूं नकोस, तूं शक्ति व सामर्थ्य मिळीव. त्यावर मनुष्य ह्मणतो कीं ह्या उपदेशाप्रमाणें वागलें ह्मणजे मनुष्यांत दुसरा दुबळेपणा राहणार नाहीं काय ? त्यास उपनिषदें उत्तर देतात कीं दुसरा दुबळेपणा राहील; पण ज्यास्त दुबळेपणा धरून तो दुबळेपणा जाईल काय ? मळानें मळ घालविण्याचा प्रयत्न करणें तुह्मांस इष्ट

आहे काय ? पापानें पाप दूर होईल काय ? बुळकटपणानें बुळकटपणा जाईल काय ? ह्मणून उपनिषदें उपदेश करितात कीं, हे मर्दा तूं मर्द हो, उभा रहा व बळकट हो. एवढेंच नाहीं तर ह्या दुनियेंत एवढेंच कायतें असें वांङ्मय आहे कीं ज्यांत तूं भिऊं नको, तं निर्भय हो असा पुन्हःपुन्हा उपदेश केलेला आढळतो. 'मा भैषीः' ह्मणजे निर्भय हो. निर्भय हें विशेषण मनुष्य किंवा देव यास लाविलेलें दुनियेंतील दुसऱ्या कोणत्याहि धर्मपुस्तकांत आढळत नाहीं. इतक्यांत जणुं पाश्चिमात्य देशांतील मोठा पराक्रमी बादशाह जो अलेक्झांडर ह्याचें स्वप्न आह्मास डोळ्यापुढें दिसूं लागतें. त्या माहाराजाधिराजाची मूर्ति अरण्यांतील आमच्या एका संन्याशाशीं बोलत सिंधुनदीच्या तटाकीं उभी आहे. शिळेवर बसलेल्या एका बहुतेक नग्न किंवा दिगंबर वृद्ध पुरुषाशीं बोलत असतां त्याचें शहाणपण पाहून चकित झालेली ती मूर्ति त्यास द्रव्य व मानपान यांच्या आमिषानें ग्रीस देशीं येण्यास लालचावित आहे. आणि हा पुरुष त्याचें द्रव्य व लालूच हीं तुच्छ मानून त्यास मी येत नाहीं ह्मणून साफ ह्मणत आहे. तेव्हां अधिकारमदानें धुंद झालेला तो बादशाह त्यास दरडावून ह्मणत आहे कीं "तूं मजबरोबर येणार नाहींस तर मी तुला ठार मारीन." असें ह्मटल्याबरोबर तो पुरुष खदखदां हांसून ह्मणतो, "बाबा, तूं या क्षणीं जितकें मिथ्या बोलत आहेस इतकें मिथ्या भाषण तूं आजन्मांत कधीं बोलला नसशील. मला कोण मारूं शकेल ? या जडसृष्टीचा बादशाह जो तूं तो काय ठार करणार मला अँ ! तूं मला कधींहि मारूं शकणार नाहींस, कारण कीं मी अजन्मा व अव्यय आहें, मी कधींहि जन्मास आलों नाहीं व कधींहि मृत्यु पावत नाहीं, मी अनंत, सर्वसाक्षी व

सर्वज्ञ आहें, असें असून तुझ्यासारिखें कालचें टारगें पोर मला ठार मारणार नव्हे का! " अहो, शक्ति, बळ, सामर्थ्य व पुरुषार्थ ह्मणतात तो हाच. आणि जों जों अधिक आह्मी उपनिषदें वाचितों तों तों आमच्या मित्रांनो व भाईनों, तुमच्या-बद्दल आह्मास अधिकाधिक खेद उत्पन्न होतो व रडूं येतें. कारण त्यांत वेदान्ताचा मोठा व्यावहारिक उपयोग आहे, आह्मी शक्ति व बळ कसें मिळवावें हें त्यांत दिलें आहे. प्रस्तुत आह्माला ज्याची वाण आहे, ती ह्या शक्तीचीच होय. तर आह्मास ती शक्ति कोण पुरवील बरें ? हजारों गोष्टी आह्मास दुबळेपणा आणणाऱ्या आहेत. जर तुह्मी आमचीं पुराणें धुंडाळलींत, तर त्यांतील प्रत्येकांतून दुनियेंतील तीन चतुर्थांश पुस्तकालयें भरण्या इतक्या गोष्टी सांपडतील. त्याचा आमच्यापाशीं भरपूर संचय आहे. आमच्या झाडून सगळ्या जातीस दुबळी करणारी प्रत्येक गोष्ट गेल्या हजार वर्षे आह्मांस प्राप्त झाली आहे. जणुं काय असें दिसतें कीं, गेलीं हजार वर्षे आह्मी दिवसानुदिवस अधिकाअधिक दुबळे कसे होऊं ? हें साधणें हा आमच्या राष्ट्राच्या आयुष्यक्रमाचा एक मुख्य हेतु होऊन बसला आहे. असें होतां होतां शेवटीं आह्मी खरोखरी काडू किंव गांडमेंडुळें होऊन बसलों आहों ; व जो कोणी आमच्यावर छातीनें पाय देण्यास येईल, त्याच्या पायाशीं आह्मा सरपटत पडलों आहों. ह्मणून माझ्या मित्रानों, तुमचेंच रक्त ज्याच्या धमन्यांतून धमधमां वाहत आहे, व जो तुमच्या बरोबर जन्मून मृत्यु पावणार आहे असा जो मी त्या मला आपल्यास शक्ति, बळ व पुरुषार्थ यांची पदोपदीं किती मोठी वाण भासते हें तुह्मांस सांगूं द्या. आणि उपनिषदें हीं त्या बळाची मोठी खाण आहे. त्या उपनिषदांत सगळ्या दुनियेस सबळ करण्या इतकें सामर्थ्य आहे. सगळ्या

जातींच्या, पोटजातींच्या व धर्मांच्या दुबळ्या; विपद्ग्रस्त, व परपीडित लोकांस तीं शंखध्वनि करून सांगत आहेत कीं, बाबानों, ' उत्तिष्ठत जागृत ' ह्मणजे जागे होऊन आपल्या पायांवर उभे रहा व मोकळे व्हा; शारिरिक, मानसिक, व अध्यात्मिक स्वतंत्रता हे आपल्या उपनिषदांच्या आप्तवचनांतील इशाऱ्याचे शब्द आहेत. एवढेंच नाहीं तर, ज्यांत तारणाची वार्ता नाहीं व ज्यांत केवळ स्वतंत्रतेची फोड आहे असें प्रत्येक उपनिषद् हें सगळ्या दुनियेंतील अद्वितीय व अप्रतिम धर्मपुस्तक आहे. प्रकृतीच्या पाशांपासून मोकळे व्हा, व सगळ्या दुबळेपणापासून मोकळे व्हा! आणि ती मोकळीक प्रत्येकास रोकडी मिळण्यासारिखी आहे हें तीं तुम्हांस सुस्पष्ट दाखवीत आहेत. आणखीं एक विशेष प्रकार आहे. तुह्मी द्वैतवादी असाल तर असाना बापडे, हें स्वभावतःच तुह्मांला कबूल करावें लागेल कीं, आत्मा हा परिपूर्ण आहे. पण त्याच्या कांहीं विशेष कार्यांनीं तो आकुंचन पावला आहे. रामानुजाचार्यांच्या आकुंचन व प्रसरण यांच्या उपपत्तीलाच अर्वाचीन पाश्चिमात्य इन्होल्यूशनिस्ट ह्मणजे उत्क्रांतिमतवादी हे उत्क्रांती असें ह्मणतात. आत्मा जणुं मागें जातो व आंवरटतो, त्याच्या शक्ति वाढण्यासारिख्या असतात व सत्कर्म व सुविचार यांनीं तो पुनः विस्तार पावतो व आपली स्वाभाविक परिपूर्णावस्था प्रगट करितो. त्यांचा अद्वैतवादी लोकांशीं जो मोठा फरक आहे तो हा होय कीं द्वैत्यांप्रमाणें अद्वैतवादी सृष्टींत जशी उत्क्रान्ति होते असें मानितात,तशी ते आत्म्यामध्यें उत्क्रान्ति होते असें मानीत नाहींत. असें समजा कीं एक पडदा लाविला आहे व त्या पडद्याला एक लहान भोंक आहे. मी एकजण त्या पडद्यापाठीमागें उभा आहें व या सभेकडे पाहत आहें. पण त्या भोंकांतून मला थोडयाच लोकांचे

चेहरे दिसत आहेत. समजा तें भोंक वाढत चाललें. तर तें जसजसें वाढत जाईल, तशतशी ह्या सभेंतील अधिकाधिक मंडळी माझ्या नजरेस पडूं लागेल. शेवटीं, पडदा व मंडळी एकरूप होतील. तेव्हां तुमच्या माझ्यांत जो कांहीं आडपडदा होता तो राहणार नाहीं. यांत तुह्मीहि बदललां नाहीं व मीहि बदललों नाहीं. सगळी बदल त्या पडद्यांत झाली. पहिल्या पासून शेवटपर्यंत तुह्मी तेच आहां, फक्त त्यांत पडदा बदलला आहे. उत्क्रांती संबंधें—ह्मणजे सृष्टीची उत्क्रांती व आंतील आत्म्याचा आविर्भाव यासंबंधें अद्वैत वाद्यांची संस्थिति अशी असते. आत्मा कांहीं केल्या आकुंचित करितां येत नाहीं. तो अव्यय व अनंत आहे. त्याच्यावर मायेचें जणुं पडळ ह्मणजे झांकण पडलें आहे. हा मायेचा पडदा अधिकाधिक पातळ होत जातो व आत्म्याचें अंतर्गत स्वाभाविक वैभव प्रगट होतें. हें एक मोठें तत्व आहे. तें तत्व हिंदुलोकांपासून शिकण्यास जग टपलें आहे. ते कांहींहि बोलोत, त्यांना केवढाहि अभिमान असो, तरी त्यांस दिवसानुदिवस असें आढळेल कीं हें तत्व कबूल केल्यावांचून लोकसमाज सजीव असूं शकणार नाहीं. प्रत्येक गोष्टीची कशी उलथापालथ होत आहे हें तुम्हांस दिसत नाहीं काय ? प्रत्येक गोष्ट चांगली ठरेतों ती वाईट आहे हें गृहीत धरण्याचा आजपर्यंत पूर्वापार कसा प्रघात होता हें तुह्मास दिसत नाहीं काय ? विचाराचा विषय शिक्षण असो, गुन्हेगारांस शिक्षा देण्याचा असो, वेड्यांस उपचार करण्याचा असो, फार तर काय पण सामान्य रोगांवर उपचार करण्याचा असो तरी त्यांत हा जुना नियम लावण्याची वहिवाट आहे. तर नवीन नियम ह्मणता तो कोणता ? नवीन नियमाप्रमाणें शरीर हें स्वतः निरोगी असतें; तें आपो-

आंपआपला रोग बरा करितें. औषध फार झालें तर शरीरांतील उत्तमांशाच्या रक्षणास साहाय्य करितें. तो नियम गुन्हेगारांविषयीं काय ह्मणतो? तो असें गृहीत धरून चालतो कीं गुन्हेगार कितीहि नीच असो तरी त्याच्या आंत ईश्वरी अंश आहे. तो मरत नाहीं. तो असा आहे असें समजून आपण गुन्हेगारांस वागविलें पाहिजे. अशा विचारानें सर्व कांहीं बदलतें. तुरुंग हीं प्रायश्चित्तगृहें बनतात. अशीच स्थिति प्रत्येक गोष्टीची होते. हिंदुस्थानच्या आंत बाहेर जो ईश्वर आहे, तो कळत वा नकळत आविर्भूत होत आहे. आणि त्याचें स्पष्टीकरण आमच्या धर्मपुस्तकांत आहे. आपण तें शिकावें ह्मणून तें त्यांत आहे. तेणेंकरून मनुष्यामनुष्यांतील वर्तनांत सर्वस्वी उलथापालथ होईल व मनुष्याच्या दुबळेपणाकडे वारंवार बोट करण्याच्या जुन्यापुराण्या कल्पना पार नाहींशा होतील. असें झालें तर त्या कल्पनांची इतिश्री ह्याच शतकांत होईल. आतां कोणी उभे राहून माझ्यावर टीका करतील कीं ' पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः ह्या ' पुराणाच्या उक्तीविरुद्ध आह्मी असें नाहीं ह्मणून मी उपदेश करीत आहें. तेव्हां कोणी माझ्याबद्दल दुनियेच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत टीका करतील तर ते खुशाल करोत ! ह्याच लोकांचे वंशज हे मी जसा पुण्याचा उपदेशक होतों, तसा पापाचा उपदेशक नव्हतों ह्मणून माझा जयजयकार करतील. मी पुण्याचा उपदेशक आहें, मी पापाचा उपदेशक नाहीं. मी ज्ञानाचा पुरस्कर्ता आहें तसा अज्ञानाचा पुरस्कर्ता नाहीं ह्या बद्दल माझा मला मोठा अभिमान वाटतो.

आमच्या उपनिषदांपासून जग दुसरी एक मोठी कल्पना घेण्यास टपलें आहे. ती कल्पना ही कीं हें विश्व एका जीवाचें आहे. त्यांतील सीमा व भेद यांच्या जुन्या पुराण्या हद्दीचे

धोंडे भराभर नाहींसे होत आहेत. वीज व वाफ यांच्या शक्तीनें दुनियेच्या निरनिराळ्या भागांचें अंतर्गत दळणवळण एकमेकांशीं चालू झालें आहे. तेणेंकरून आतां आपण हिंदुलोक आमच्या देशाच्या पलीकडील देशांमध्यें वस्ती पिशाच्च व राक्षस यांची आहे; व ख्रिश्चयन देशांतील लोकहि हिंदुस्थानांत मनुष्य भक्षक रानटी लोक आहेत असें ह्मणत ाहींत. आमच्या देशाबाहेर गेलों तर आह्मांस आमच्याच सारखीं माणसें आढळतात. त्यांस मदत करण्यास आमच्या सारिखेच हात असतात. त्यांस शुभ बोलण्यास आमच्या सारखींच तोंडें आहेत. फार काय सांगावें पण आह्मी ज्या ह्या देशांत जन्मास आलों आहों, त्यांतील लोकांपेक्षां त्या परदेशचे कांहीं लोक उत्तेजनपर व आशीर्वादपर बोल बोलण्यांत व त्याप्रमाणें मदत करण्यांत जास्त तयार आहेत. ते विदेशी लोक इकडे आले तर त्यांस इकडे तसाच भाईचार, तसेंच उत्तेजन व तसलेच आशीर्वाद मिळतात. बरें तें असो. आमचीं उपनिषदें ह्मणतात कीं सर्व दुःखांचें जें मूळ तें अज्ञान हें होय, व ही गोष्ट संसाराची प्रत्येक स्थिति, मग ती सामाजिक असो कीं अध्यात्मिक असो, तींत अक्षरशः लागू पडते. आपण अज्ञानामुळेंच एकमेकांचा द्वेष करितों, आपण अज्ञानामुळेंच एकमेकांस ओळखीत नाहीं व एकमेकांवर प्रेम करीत नाहीं. पण एकमेकांस एकमेकांचें ज्ञान झाल्याबरोबर प्रेम उत्पन्न होतें, व प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे. कारण आह्मी मूळचेच एक नाहीं काय ? याप्रमाणें द्वैतांत आपोआप अद्वैत उत्पन्न होतें. सुमारें वीस वर्षांपूर्वी राजनीति व समाजशास्त्र यांतील जीं प्रमेयें फक्त राष्ट्रसंबंधाचीं समजत असत, तीं हल्लीं राष्ट्रदृष्टीनें सोडवितां येत नाहींत. तीं मोठीं होत होत जगडव्याळ स्वरूप धारण करीत

आहेत.देशादेशांच्या परस्पर अंतर्गत व्यवहारांकडे नजर देऊन तीं प्रमेयें सोडविण्याचा प्रयत्न केला तरच तीं सुटतात. देशोदेशांच्या अंतर्गत व्यवहाराच्या संस्था, राष्ट्रांराष्ट्रांच्या अंतर्गत जुटी, राष्ट्राराष्ट्रांचे अंतर्गत कायदे करून घेण्याविषयीं जिकडे तिकडे आज ओरड चालली आहे. हीच गोष्ट राष्ट्राराष्ट्रांचें अद्वैत दाखविते. भौतिक शास्त्रामध्यें द्रव्याची अद्वैत कल्पना दिवसानुदिवस सिद्ध होत आहे. आपण सगळ्या विश्वास एक, सजातीय द्रव्याचा लादा होय असें मानितों; विश्व हा एक द्रव्याचा महासागर आहे. त्यांत तुह्मी व आह्मी, सूर्य व चंद्र व इतर हरयेक वस्तु हीं निरनिराळ्या लहान भोंवऱ्यांचीं नांवें आहेत. विचारदृष्ट्या पाहतां, तो सागर एक विश्वव्यापी विवेकोदधि आहे. त्यांत तुह्मी व आह्मी सारखे लहान लहान भोंवरे आहोंत व तत्व दृष्टीनें पाहतां तो हालत नाहीं, डोलत नाहीं कीं रूपांतर पावत नाहीं. सागरावरच्या ऊर्मी सागराहून भिन्न नसतात, त्याप्रमाणें तुह्मी व आह्मी सगळे एक आहोंत; तसाच तो एक अद्वितीय, अव्यय, अविकारी व सजातीय आत्मा आहे. तशीच चोहोंकडे नीतीची ओरड ऐकूं येते. ती नीति आमच्या धर्मपुस्तकांत संगृहीत आहे. नीतीचें विवरण झालें पाहिजे. या दुनियारूपी शेतास त्या नीतिशास्त्ररूप झऱ्याच्या पाण्याची जरूर आहे, व तें त्यास त्या पुस्तकांतून मिळण्यासारिखें आहे. पण आह्मां हिंदुस्थानवासीयांस कशाची जरूर आहे बरें? परक्या लोकांस ह्या नीतीची एक पट जरूर असेल तर तिची आह्मांस वीसपट अधिक जरूर आहे. कारण आमचीं उपनिषदें केवढींहि मोठीं व असलीं,व आमच्या ऋषींची पूर्वजपरंपरा केवढीहि अभिमानास कारणीभूत होण्यासारिखी असली तरी हें तुह्मांस मला उघड सांग्या

शब्दांनीं सांगणें भाग आहे कीं, आह्मी दुबळे आहों, आह्मी, नुस्ते दुबळे नव्हे, आह्मी फारच दुबळे आहों, प्रथमतः आह्मी सगळे शरीरानें अत्यंत दुबळे आहों. हा शरीराचा दुबळेपणा कमींत कमीं आमच्या एकतृतीयांश दुःखास कारण आहे. आह्मी मंद व सुस्त आहों; आह्मांस काम करण्याची कुवत नाहीं; आह्मांस जूट करितां येत नाहीं; आह्मी एकमेकांवर माया मोहोब्रत करीत नाहीं; आह्मी अत्यंत आपलपोटचे आहों; युरोपांतील बायका जशा मत्सरी आहेत तसेच आह्मीं आहों; आह्मीं तिघेजण एकत्र झालों व आह्मी एकमेकांचा तिटकारा केला नाहीं व एकमेकांचा मत्सर केला नाहीं असें कधींच होत नाहीं. अशा स्थितींत आह्मी आहों, आह्मी अत्यंत अव्यवस्थित बाजारबुणग्यासारिखे आहों, आह्मी परमावधीचे आपलपोटचे आहों;अमक्यानें अमुक गंधाची खुग (नाम) अशी उभी लावावी कीं अशी आडवी लावावी–ह्याबद्दल आह्मी एकमेकांशीं निरर्थक शतकानुशतक लढत बसलेले आहों. एकाद्या मनुष्याच्या नजरेनें माझें अन्न दृष्टाळेल कीं नाहीं अशा अत्यंत महत्वाच्या प्रश्नांसंबंधें आह्मी ग्रंथांचीं भारुडांवर भारुडें लिहित बसलेले आहों गेलीं कित्येक शतकें ही आह्मी कामगिरी बजावित आहों. ज्यांच्या सगळ्या मेंदूची शक्ति, असलीं चमत्कारिक सुंदर प्रमेयें व शोध यांत गुंतली आहे त्यांच्यापासून आह्मीं प्रस्तुत ज्या स्थितींत आहों त्यापेक्षां अधिक चांगल्या स्थितीची अपेक्षा करावयास नको ! आणि चमत्कार हा कीं ह्याची आह्मांस लाज वाटत नाहीं. ती कधींकाळीं आह्मास वाटली तर आमच्या विचाराप्रमाणें आह्मांस कांहीं एक करितां येत नाहीं. आमचे मनांत विचार थोडे येतात असें नाहीं, पुष्कळ येतात, पण आपण त्यांतील

कांहीं कधीं करीत नाहीं, शेवटीं पोपटास जसें बोलणें तसें आम्हांस विचार करणें व त्या विचाराप्रमाणें कधीं कांहीं 'न' करणें ही संवय होऊन बसते. ह्याचें कारण काय? शरीराचा दुबळेपणा. दुबळ्या शरीरांत दुबळें मन असतें. हें दुबळें मन किंवा मेंदू यांस कांहीं एक काम करितां येत नाहीं; आपल्याला ह्याचें रूपांतर ह्मणजे बदल केली पाहिजे सर्वारंभीं आमचे तरुण लोक सशक्त झाले पाहिजेत. शरीर बळकट झालें कीं धर्म त्यापाठीमागून आपोआप येईल. तर आमच्या तरुणमित्रांनीं प्रथम बळकट झालें पाहिजे. ह्या-परता त्यांस दुसरा उपदेश करितां येण्यासारिखा नाहीं. फूट-बाल ह्मणजे पादतिंदुक नामक चेंडूनें खेळल्यानें ते जितके स्वर्गाजवळ जाऊन पोहोंचतील तितके ते नुस्त्य गीतेच्या अभ्यासानें पोहोंचावयाचे नाहींत. हे शब्द धिटाईचे वाटतील तर वाटोत, पण ते मला उघड बोलून दाखविणें भाग आहेत. माझी तुमच्यावर माया आहे. माझा जोडा कोठें लागत आहे हें मला चांगलें समजत आहे. कारण मला दुनियेचा थोडासा तसाच अनुभव आला आहे. तुमच्या शरीराचे स्नायु अंमळ जास्त बळकट झाले, तर तुह्मास गीता अधिक चांगली समजावयास लागेल. जेव्हां तुमच्या शरीरांत जोरानें रक्त खेळूं लागेल तेव्हां श्रीकृष्णाची अप्रतिम बुद्धि व अद्वितीय बळ यांचें ज्ञान तुह्मांस होईल. जेव्हां तुमचें शरीर तुमच्या पायांवर ताठ तोललेलें राहूं लागेल व आपण मर्द आहों असें तुमचें तुह्मांस वाटूं लागेल तेव्हां उपनिषदें व आत्म्याचें वैभव तुह्मांस अधिक चांगलें समजूं लागेल. याप्रमाणें वेदान्ताच्या तत्वांची योजना आपल्या गरजा पुरविण्याकडे आपल्यास केली पाहिजे. लोकांस पुष्कळ वेळां अद्वैताचा कंटाळा येतो. त्यांस अद्वैत

अथवा द्वैत अथवा दुनियेंतील दुसरा कोणताहि धर्म शिकविण्याचा आमचा उद्देश नाहीं. प्रस्तुत आह्मांस ज्या धर्माची अत्यंत आवश्यकता आहे, तो हा होय कीं आत्म्याविषयीं चमत्कारिक कल्पना ह्मणजे त्याचें 'अमर्याद सामर्थ्य, त्याचें अनंत बळ, त्याची निरंतर शुद्धि व त्याची अखंड परिपूर्णता—ह्यांविषयीं कल्पना आमच्या हृदयांत पक्की व पुरी संचरली पाहिजे.

जर मला एखादें मूल असतें तर 'तूं शुद्ध ब्रह्मरूप' आहेस हें त्यास त्याच्या जन्मापासून मी त्यास शिकवूं लागतों. मूल झाल्याबरोबर त्यास स्वतःच्या हातांनीं पाळण्यांत घालून पाळणा मागें पुढें झोंके खात असतां "तू शुद्ध, निष्कलंक, निष्पाप, बलिष्ठ, परात्पर आहेस" हें गाणें मी गायिलें असतें. मदालसा राणी हें कशी गात असे ही सुंदर कथा तुह्मी पुराणांत वाचली असेल. ह्या कथेंत घेण्यासारिखें पुष्कळ आहे. तुह्मी मोठे आहां हें तुमच्या हृदयांत संचरूं द्या कीं तुह्मी मोठे झालाच ह्मणून समजा. सगळें जग धुंडाळून मला जो काय लाभ झाला तो हाच होय.॥ पापोऽहं पापकर्माऽहम् ॥ असें लोक बोलतात तर त्यांस खुशाल बोलूं द्या. पण आपण पापी आहों असें सर्व इंग्रज लोक खरोखरी मानूं लागले तर मध्यआफ्रिकेंतील निग्रो लोकांपेक्षां त्या इंग्रजांची स्थिति जास्त चांगली राहणार नाहीं. ह्या तत्वावर त्यांचा भरंवसा नाहीं ह्मणून देवानें त्यांचें कल्याण केलें आहे व आणखी करील. उलट, आह्मी दुनयेचे उपजत मालक आहों असें इंग्रज लोक मानितात. ते तसेंच आणखीं मानितात कीं आपण मोठे आहों व आह्मी दुनियेंत पाहिजे तें करूं, आह्मास पाहिजे तर चंद्रावर अथवा सूर्यावरहि जातां येईल व ह्याचेच योगानें ते मोठे झाले आहेत. आपण पापात्मे,

पापसंभव आहों व अनंत कालचक्रभर त्याचीं फळें आपणांस भोगावीं लागणार आहेत असें इंग्रजांचे धर्मोपदेशक इंग्रजांस शिकवितात. त्यावर इंग्रजांनीं भरवंसा ठेविला असता तर आज त्यांची जी स्थिति आहे ती राहिली नसती. 'धर्मोपदेशकांचा उपदेश व धर्मभोळेपणा ह्यांस न जुमानतां प्रत्येक राष्ट्रांत तो दिव्य अंतरात्मा सजीव राहून आपला प्रभाव दाखवितो, असें धडधडीत आपल्या पाहण्यांत येत आहे. तुह्मांस हें खरें न वाटेल तर न वाटो, पण मी माझा खरा अनुभव तुह्मांस सांगतों. तो हा कीं, इंग्रज स्त्री व पुरुष यांपेक्षां आमचा त्या परमात्म्यावर भरंवसा नुस्ता कमी नाहीं तर हजारोंपट कमी आहे ! हें उघड बोलणें आहे. पण तें मी बोलत आहें, कारण त्यास माझा इलाज नाहीं. इंग्रज स्त्री व पुरुष आमच्या कल्पना उचलितात तेव्हां तीं जणूं त्यांनीं अगदीं वेडावून जातात व तीं राज्यकर्तीं आहेत तरी तें सर्व विसरून आपल्या देशभाईंचा उपहास व मसकऱ्या यांची परवा न करितां आमच्या धर्माचा उपदेश करण्यास हिंदुस्थानांत कशीं येतात हें तुह्मीं पाहिलें नाहीं काय ? तुमच्या पैकीं किती लोक असें करूं शकतील ? ह्याचा विचार करा, व तुह्मांसच तें कां करितां येऊं नये ? तुह्मांस माहित नाहीं असें तें काय आहे ? तुह्मांस त्यांच्यापेक्षां जास्त माहिती आहे, ह्मणूनच असें झालें आहे. तुमचें हित साधण्यास तुह्मी जितके शहाणे असावयास पाहिजे त्यापेक्षां तुह्मी जास्त शहाणे आहां, ह्याचीच तुह्माला मोठी अडचण झाली आहे ! तुमचें रक्त डांबरासारिखें आहे, ह्मणूनच प्रस्तुत तें सडून तुमच्या मेंदूंतून, पू बाहेर पडत आहे, व तुमचें शरीर दुबळें झालें आहे. शरीर बदललें कीं तें बदललेंच पाहिजे. शरीराचा दुबळेपणा हें त्याचें कारण होय,

दुसरें कांहीं नाहीं. गेलीं शंभर वर्षे तुह्मी सुधारणा, नमुनेदार वर्तन व दुसऱ्या असल्या त गोष्टी याविषयीं बोलत राहिले आहां. पण तें करून दाखविण्याचा प्रसंग आला कीं तुमचा पत्ता कोठेंहि लागेनासा होतो. असें करकरून तुह्मी सर्व दुनियेस विटविलें आहे; तें इतकें कीं तुमच्या सुधारणेचें प्रत्यक्ष नांवच सगळ्या दुनियेस उपहासास्पद झालें आहे! याचें कारण काय? तुह्मांस त्याची माहिती नाहीं हें त्याचें कारण नाहीं. तुह्मी अति शहाणे आहां, तुह्मांस नको नको इतकी माहिती तुम्हांस आहे. त्याचें जें कारण आहे तें हें होय कीं तुह्मी लेंबडे, शेंबडे, दुबळे आहां, तुमचें शरीर अशक्त आहे, तुमचें मन बलहीन आहे. तुम्हास धमक नाहीं, तुमचा आत्मप्रभावावर भरंवसा नाहीं. आमच्या भाईनों, जाती व राजे व विदेशी लोक व आपलेच लोक यांच्या शतानुशतक व सहस्रानुसहस्र वर्षे चाललेल्या पिळून काढणाऱ्या जुलमानें तुमची सर्व शक्ति निघून गेली आहे! पायांखालीं तुडविले जाणारे, व तुटके व पाठीचा कणा नसलेले, काडू व गांडमेंडुळें या किडयांप्रमाणें तुह्मी आहां! तर आम्हास शक्ति कोण देऊं शकेल? त्यास आमच्याजवळ कशाची वाण आहे ह्मणाल तर फक्त शक्तीची होय, एवढें माझें सांगणें आपल्यास पटूं द्या. आणि शक्ति मिळविण्यास पहिलें पाऊल टाकावयाचें असेल तर उपनिषदांचा उद्धार करून 'मी आत्मा आहें, मला तरवार कापीत नाहीं, कोणतेंहि हत्यार मला टोचूं शकत नाहीं, मला विस्तव जाळूं शकत नाहीं, मी सर्व शक्तिमान आहें, मी सर्वज्ञ आहें, या सुमंगल व मुक्तिदायक शब्दांचा जयजयकार करा. आह्मी दुबळे आहों असें ह्मणूं नका, आह्मी प्रत्येक गोष्ट व पाहिजे ती गोष्ट करूं शकूं असें ह्मणत जा. आपण कोणती गोष्ट करूं शकणार

नाहीं ? प्रत्येक गोष्ट आपल्यास करितां येईल. आपणा प्रत्येकांत एकाच दिव्य आत्म्याचा वास आहे; व तें आह्मांस खरें पटूं द्या. कठोपनिषांतील नचिकेतासारिखी आमची भक्ति व श्रद्धा अव्यभिचारिणी असूं द्या. त्याच्या बापाच्या यज्ञाच्या वेळीं नचिकेताच्या ठायीं भक्ति उत्पन्न झाली. तसली भक्ति तुह्मांपैकीं प्रत्येकांत उत्पन्न व्हावी अशी माझी इच्छा आहे. ती उत्पन्न झाल्याबरोबर तुमची प्रत्येकाची बुद्धि विशाल होईल व प्रत्येक बाबतींत तुह्मी जगच्चालक, पुरुषसिंह, अनंत व सच्चिदानंद बनाल. तुह्मांस जें स्वरूप यावयास पाहिजे असें मला वाटत आहे तें हें होय. उपनिषदांपासून जी शक्ति येते ती हीच होय. त्यांपासून असली शक्ति व भक्ति उत्पन्न होते, व ती त्यांत आहे. पण ह्मणताताना ती शक्ति फक्त सन्याशांना प्राप्त होते ! तें त्यांचें रहस्य आहे ! उपनिषदें पूर्वी फक्त संन्याशांच्या हातीं असत ! ते अरण्यांत जात असत ! त्यांपैकीं शंकराचार्यांनीं थोडीशी मेहेरबानी करून ह्मटलें कीं गृहस्थानीं देखील उपनिषदांचा अभ्यास करावा, त्यांनीं अभ्यास केल्यास त्यांचा फायदाच होईल; त्याचे योगानें त्यांचें नुकसान होणार नाहीं. पण अद्याप अशीच समजूत आहे कीं उपनिषदांत फक्त अरण्यसंबंधी प्रतिपादन आहे. वेदावर नुस्ती टीका नव्हे तर प्रमाणभूत टीका एकदां एक होऊन गेली आहे. ज्याचें निश्वसीत वेद होत अशा त्या भगवान् श्रीकृष्णानीं ती गीतेंत करून ठेविली आहे. त्या गीतेंतील टीका प्रत्येक मनुष्याच्याच नव्हे तर प्रत्येक धंदेवाल्याच्या उपयोगार्थ व साह्यार्थ अवतीर्ण झाली आहे. ह्या वेदान्ताच्या कल्पना जाऊन अरण्यांत राहिल्या पाहिजेत; एवढेंच नाहीं तर त्या गुहांतहि शिरल्या पाहिजेत; एवढेंच

नाहीं तर त्या वकीलमंडळें, न्यायासनें, व्यासपीठें, गरीबांच्या झोंपड्या, मासे धरणारे कोळी व अभ्यास करणारे विद्यार्थी यांच्या–व्यवहाराच्या मुळाशीं जाऊन बसल्या पाहिजेत व सदोदित उठावणी करीत राहिल्या पाहिजेत. प्रत्येक पुरुष, प्रत्येक स्त्री, व प्रत्येक बालक, मग त्याचा धंदा कांहींहि असो, त्यास उद्देशून त्या कल्पना आहेत. ह्मणून त्यांचा संचार सर्वत्र झाला पाहिजे, व त्यांच्या प्रसारापासून भीति ती कसली प्राप्त होणार ! उपनिषदांतील नमुनेदार तत्वें सर्वांकरितां आहेत. तरी कोळी व त्यांसारिखे दुसरे लोक हे तीं कशीं अमलांत आणणार ! त्याचा रस्ता त्यांत दाखविला आहे. तो मार्ग सनातन आहे ! धर्म सनातन आहे ! कोणीहि त्याच्याबाहेर जाऊं शकणार नाहीं, व जें काय तुह्मी कराल तें तुह्मास अत्यंत हितावह होईल. तसें थोडें केलेंत तरी त्याचे अद्भुत परिणाम होतील. ह्मणून प्रत्येकाच्या हातून जें थोडें बहुत होण्यासारिखें असेल तें प्रत्येकाला करूं द्या. कोळ्याला जर वाटूं लागलें कीं मी परमात्मरूप आहें तर तो चांगला कोळी निपजेल; मी ब्रह्म आहें असें विद्यार्थ्यास वाटलें तर तो चांगला विद्यार्थी निपजेल. वकिलास जर मी शिवरूप आहें असें वाटलें तर तो चांगला वकील होईल, व असेंच इतरांचें होईल. व याचा परिणाम असा होईल कीं प्रचलित वर्णव्यवस्था सदोदित कायम राहील. टोळ्या टोळ्या होणें हा समाजाचा स्वभाव आहे; व यानें जाईल काय ? तर हक्क ह्मणून ज्यास ह्मणतात ते जातील ! जातपात ही एक स्वाभाविक व्यवस्था आहे, समाजांत मी एक काम करीन तर तुह्मी दुसरें करा. तुह्मी देशावर अंमल करा व मी जुन्या जोड्यांस ठिगळें लावण्याचें काम करीन ! पण तेवढ्यावरून माझ्यापेक्षां

तुह्मी मोठे ठरत नाहीं. तुह्मी आमचे जोडे नीट करूं शकाल काय ? मला देशावर अंमल करितां येईल काय ? कांहींतरी करणें हें स्वाभाविक आहे. मी जोडे नीट करण्यांत हुशार आहें, तुह्मी वेद ह्मणण्यांत हुशार आहां, पण एवढ्यावर तुह्मी माझ्या डोक्यावर उडून बसण्यास अधिकारी आहां असें ठरत नाहीं. तुह्मी जर खून केलात तर तुमची वाहवा व्हावी व मी बोर चोरिलें ह्मणून मला फाशीं द्यावें ! असें कां बरें व्हावें ? हें नाहींसें होईल. वर्णव्यवस्था वाईट नाहीं. संसाराच्या उलगडयाचा हा एक स्वाभाविक मार्ग आहे. मनुष्यांच्या टोळ्या, व मंडळें झालींच पाहीजेत. तुह्मांस त्यांचें उच्चाटन करितां येण्यासारिखें नाहीं. तुह्मी जेथें जेथें जाल तेथें तेथें तुह्मांस जातिव्यवस्था आढळेल. पण त्यां-बरोबर पूर्वी सांगितलेले विशेष हक्क आपोआप उत्पन्न हो-तात असा त्याचा अर्थ नाहीं. त्या हक्कांचें समूळ उन्मूलन होईल. तुह्मी कोणास वेदान्त शिकविलात तर तो ह्मणेल कीं तूं तत्वज्ञानी आहेस व मी कोळी आहें तरी मी तुझ्यासारखा चांगला मनुष्य आहें. तुझ्यांत जा देव आहे तोच माझ्यामध्यें आहे.आह्मांस जें काय पाहिजे आहे तें हेंच कीं कोणासहि विशेष हक्क नसावेत, ह्मणजे सर्वांस सारख्या सवलती मिळाव्या. प्रत्येकास दिव्य अंतरात्म्याचें ज्ञान करून द्या. ह्मणजे जो तो आपआपली मुक्ति ह्मणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घेईल.एकाद्याच्या वाढीस व बरकतीस पहिली परिस्थिति कोणती अनुकूळ असावी लागते ह्मणाल तर ती अ-पराधीनता व स्वतंत्रता ही होय. अमक्या बायकोस किंवा अमक्या मुलास मी मुक्त करितों असें जर तुमच्यापैकीं कोणी ह्मणूं लागला तर ती नुस्ती चूक नव्हे तर तो समाज छेदणारा खिळा होय असें समजावें. पुन्हः पुन्हां येऊन मला कांहीं

लोक विचारितात कीं ह्या विधवांच्या विवाहाविषयीं व ह्या स्त्रियांच्या प्रश्नांविषयीं आपलें काय मत आहे ? त्या प्रश्नाचा जबाब मला एकदां एकवार देऊन टाकूं द्या. तुह्मी मला पुन्हः पुन्हा हा प्रश्न विचारता, तो मी का विधवा आहें ? बायकांचीं कोडीं व विधवांचीं कोडीं सोडविणारे तुह्मी कोण ? प्रत्येक स्त्री व प्रत्येक विधवा ह्यांवर अंमल करणारे तुह्मी मूर्तिमंत परमात्मा परमेश्वर आहां काय ? तुह्मी तो नाद सोडून द्या. त्या आपआपलीं कोडीं सोडवितील. बेवकूब जुलमी राक्षस हे पाहिजे त्या करितां पाहिजे तें आपल्यास करितां येईल असें मानण्याचा प्रयत्न करितात ! तो नाद सोडा. श्रीभगवान त्या सर्वांची काळजी वाहील. तुह्मांस सर्व कांहीं समजतें असें मानणारे तुह्मी कोण ? ईश्वरनिंदकानों, परमेश्वरावर आपली सत्ता चालते असें मानण्यास तुमची छाती कशी होते ? पाखांड्यांनों, प्रत्येकाचा जीवात्मा हा परमात्म्याचा प्रत्यगात्मा ह्मणजे प्रतिबिंबरूप आत्मा आहे हें तुह्मांस ठाऊक नाहीं काय ? आपआपल्या कामाकडे लक्ष द्या. कृतकर्माचें ओझें पडलें आहे, त्याचें कार्य चाललें आहे. अहो तुह्मी अधमाधमानों, तुमच्या देशांतील लोक तुमचें देव्हारें माजवोत, तुमचा समाज तुह्मांस प्रतिदेव ह्मणून स्वर्गी चढवो, बेवकूब लोक तुमची मन मानेल तशी स्तुति करोत, पण देव कांहीं निजला नाहीं, तो तुम्हांस पकडील व तुम्हांस लगेच किंवा पुढें शिक्षा भोगावयास लावील. ह्मणून प्रत्येक स्त्री, पुरुष व इतर सर्व कांहीं यास ईश्वरासमान माना. तुह्मांस पाहिजे त्यास मदत करितां येणार नाहीं; तुह्मांस सवड मिळाली तर तुह्मांस फक्त कोणाची सेवा करितां येईल, तुह्मांस त्या देवाची व त्याच्या आश्रितांची सेवा करितां येईल. देवाच्या बाळकांपैकीं एकाद्यास मदत

करण्याची सवलत देवानें तुह्मांस दिली तर तुह्मी आपल्यास धन्य माना; पण तेवढ्यावर तुह्मी आपल्यास प्रतिदेव समजूं नका, ती सौलत देवानें तुह्मांस दिली व इतरांस दिली नाहीं ह्मणून तुह्मी कृत्यकृत्य मात्र झालांत खरे. तर असला नाद सोडा; या दुनियेंत तुमच्या मदतीची कोणासही गरज नाहीं. तुमच्यापासून फक्त भक्तीची अपेक्षा आहे. मला असें वाटतें कीं दुनियेंत कांहीं गरीब लोक आहेत. मला त्यांस हातभार लावण्याची सवड आहे ह्मणून मी त्यांच्याकडे जाऊन त्यांची सेवाचाकरी करीन, कारण त्यांच्यांत देव आहे. दुनियेंत कांहीं विपत्तिग्रस्त लोक आहेत. सवड असल्यास त्यांचें दुःख तुह्मी व आह्मी मिळून दूर करूं. तेणेंकरून आह्मांस देवाची भक्ति घडेल. कारण देव हा रोग्याच्या रूपानें येतो, तो अपराध्याच्या रूपानें येतो, तो वेडे, कुष्टी व पापी ह्यांच्या रूपानें सत्व पाहण्यास येतो. हे शब्द अंमळ कठीणच आहेत. सदरहू रूपानीं देव प्रकट झाला असतां आपल्यास त्याची सेवा करण्याची मोठी मुभा आहे, ह्मणून ते शब्द मला तुम्हांजवळ बोलूं द्या. एकाद्यावर चढाई करून तुम्हांस त्याचें बरें करितां येईल ही कल्पना सोडून द्या. पण तुम्हांस त्याशीं वर्तन एकाद्या रोग्याप्रमाणें करितां येईल. आपणास शरीर वाढविण्यास लागणारीं द्रव्यें ह्मणजे त्यास लागणारी माती, पाणी व हवा हीं वाढणाऱ्या बीजांस पुरवितां येतात. आपल्या स्वभावानुरूप त्यास जें पाहिजे तें तें घेईल व तें तें पुरें पचवून स्वतःच्या स्वभावाच्या प्रभावानें बरखत पावेल. दुनियेभर ज्ञानाचा प्रसार करा. ज्ञानानें ज्ञान वाढत जाईल प्रत्येकास ज्ञान द्या. प्रत्येक देवाकडे लागतों ज्ञानाच्या प्रसाराचें काम सोडूं नका. गरीबांस ज्ञान द्या, पण गरिबांस जितकें ज्ञान द्याल त्यापेक्षां श्रीमंतांस जास्त द्या. कारण गरिबांपेक्षां श्रीमंतांस

त्या ज्ञानाची जास्त जरूर आहे. अज्ञानास सज्ञान करा, व सुशिक्षित ह्मणविणारांस जास्त सज्ञान करा. कारण हल्लींच्या दीड दमडीच्या शिक्षणानें जो वृथाभिमान चढतो तो महाभयंकर असतो ! याप्रमाणें सर्वांस ज्ञानाचें दान करा व बाकीचें काम देवावर सोंपवा. कारण भगवान् श्रीकृष्णांनीं स्वतःच गीतेंत ह्मटलें आहे कीं " काम करण्याचा तुह्मांस हक्क आहे. पण त्याच्या फळावर तुमचा हक्क नाहीं. " तुमच्या कामानें तुमच्या डोक्यावर संचिताचा बोजा तर बसतां कामा नये व तुह्मी तेव्हां कामाविरहित तर असूं नये. ज्या देवाधिदेवानें असलीं महान तत्वें अनेक युगांपूर्वी आपल्या वाडवडिलांस शिकविलीं तो त्याच्या आज्ञा व्यवहारांत अमलांत आणण्यास शक्ति देवो.

प्रस्तावना.

१ ब्रह्मविद्या ही एक देवता आहे असें कल्पिलें. तर श्रीमद्भगवद्गीता हे तिचे पाय होतील, व (२) उपनिषदें हें तिचें धड बनेल व (३) ब्रह्मसूत्रें हा तिचा शिरोभाग होईल.

२ सदरहू पायांस व ब्रह्मसूत्ररूप शिरोभागास ज्ञानरूप रुधिराचा जो पुरवठा होतो तो कशापासून होतो ह्मणाल तर तो ह्या उपनिषद्रूप धडाच्या छातीपासून होय.

३ वेदांतील तत्वज्ञान ह्मणून जें काय ह्मणतात तें ह्या उपनिषदांत आहे. वेदान्ताचा मुख्य पाया ह्मटला ह्मणजे हें तत्वज्ञान होय.

४ शोपेनहौर नामक एक जर्मन तत्ववेत्ता सदरहू उपनिषदांसंबंधें बोलतांना असें ह्मणतो.

" In the whole world there is no study so beneficial and so elevating as that of the Upanishads. It has been the solace of my life, it will be the solace of my death".

५ आमचे वाडवडीलहि ह्या ग्रंथाचें महत्व असेंच मोठें समजत असत. मुलांचें उपनयन झाल्यावर हे ग्रंथ ते त्यांजकडून अत्यंत आस्थेनें ह्मणवीत. ह्यास पुरावा ह्या उपनिषद् ग्रंथांत जागोजाग आहे. तो पुढें सहजीं नजरेस पडेल.

६ उपनिषदें ह्मणविण्याची आमच्यांतील जुनी वहिवाट पेशवाईच्या अखेरीपासून समूळ बुडाली. पण इंग्रज सरकारनें संस्कृत अध्ययनास उत्तेजन दिलें. तेणेंकरून अलीकडे ह्या ब्रह्मविद्यारूप देवतेचे गीतारूप पाय यथार्थ पाहिलेले बरेच इसम नजरेस पडूं लागले आहेत व त्यांतील कांहींचें लक्ष्य तिच्या उपनिषद्रूप धडाकडे हल्लीं अधिकाधिक आकर्षित होत आहे. तेव्हां सदरहु वहिवाट रूपान्तरानें का होईना पण पुन्हा चालू होईल असें दिसतें.

७ निदान माझी तरी स्थिति याप्रमाणें झाली आहे. मी चाळीशी लोटल्यावर तदभिज्ञ गुरुजवळ उपनिषदादि ब्रह्मविद्येचे ग्रंथ सार्थ पढत आहें व त्याचें एक फळ माझ्या मुमुक्षु जातभाईस यथामति अर्पण केलें आहे. त्यावरून आपच्या वाडवडिलांप्रमाणें माझ्या सर्व मुलांस अनुक्रमें ब्रह्मविद्या सार्थ शिकविण्याचा माझा

विचार आहे. त्याप्रमाणें माझ्या जातभाईपैकीं कितींची स्थिति होते हें पाहणें आहे.

८ उपनिषद ह्मणजे जन्ममरणाच्या एरझारा चुकविणारी व जीव व शिव यांची भेट करणारी व मुमुक्षूंस मोक्षाची प्राप्ति करून देणारी एक विद्या. हीं उपनिषदें मुख्य बारा आहेत. त्यांतील हें पहिलें. ह्यास कोणी ईशावास्योपनिषद असें ह्मणतात. तें यजुर्वेद संहितेंत मोडतें. यजुर्वेदाचे चाळीस अध्याय आहेत. त्यांतील एकूणचाळीस अध्यायांत मुख्यत्वकरून कर्मकाण्डाचें कथन आहे. चाळीसाव्या अध्यायांत ज्ञानकाण्डाचें कथन आहे. वाजसनेयोपनिषद ह्मणतात तें हेंच. ह्यांत सत्रा मंत्र आहेत. पण उपनिषदांचीं ह्मणून जी स्वतत्र पुस्तकें हल्लीं उपलब्ध आहेत, त्यांत अठरा मंत्र आढळतात. ते त्यांत श्रीमच्छंकराचार्यांच्या वेळेपासून आहेत असें त्यांच्या टीकेवरून दिसतें.

९ हे मंत्र वरवर पाहणारास अगदीं सुबोध वाटतात. पण खरोखरी ते बरोबर समजण्यास अतीशय कठीण आहेत, त्यांच्या प्रारंभीं सर्व कांहीं त्या परम ईशास अर्पण करण्याबद्दल आज्ञा आहे व पुढें सर्व इच्छांचा त्याग करून यज्ञयागादिकर्में करण्याची मुभा ठेविली आहे.

१० कर्में याज्ञिक असोत अथवा नैतिक असोत, श्रौत असोत अथवा स्मार्त असोत, त्यांचा स्वतःसिद्ध कांहीं उपयोग नाहीं. पण तीं निरिच्छपणानें व फलासक्ति न ठेवितां केलीं तर त्यांचा एक मोठा उपयोग आहे; तो हा कीं त्यांचेपासून कर्त्यास पापाची बाधा होत नाहीं, एवढेंच नाहीं तर, त्यास आपल्या मनाचा निग्रह करितां येतो. ह्या मनाच्या संयमानें चित्ताची शुद्धि होते, ह्या चित्ताच्या शुद्धीनें ब्रह्मज्ञान प्राप्त होतें, ह्याकरितां मनुष्यानें कर्में करीत राहून शंभर वर्षेंहि वांचण्याची इच्छा धरावी, पण त्यानें तीं त्या परम ईशास अर्पण करण्यास चुकूं नयेत, ह्मणजे कृतकर्में त्याला चिकटत नाहींत, व त्यांचीं फळें भोगण्याकरितां त्यास पुन्हः पुन्हा जन्म घ्यावे लागत नाहींत, तर त्यास तेणेंकरून ब्रह्मा भोगण्यास पाहिजे तितकी सवड सांपडते. तात्पर्य, कर्में हीं उपनिषदोक्त ब्रह्मज्ञानास व पुनर्जन्म चुकविण्यास साधनीभूत होतात.

११ आश्रम चार आहेत: १ ब्रह्मचर्य २ गार्हस्थ्य ३ वानप्रस्थ ४ संन्यास. या चार आश्रमांत पायरीपायरीनें चढणें व त्या त्या आश्रमाचीं कर्मे यथोचित करणें ही वैदिक पंथाची मूळ शिस्त आहे. ह्या शिस्तीनें सामान्य मनुष्यास कर्म, ज्ञान व मुक्ति यांची प्राप्ति सहजीं होते, पण श्रीमच्छंकराचार्यांसारखे जे असामान्य पुरुष आहेत, त्यांस असें पायरीपायरीनें जावें लागलें नाहीं व त्यांनीं कर्मकाण्डाची कटकट काढून टाकून ज्ञान झाल्याबरोबर संन्यास घेतला आहे, पण हा कित्ता सामान्य माणसांकरितां नव्हे हें इतरांनीं चांगलें लक्षांत ठेवावें.

१२ या उपनिषदांत काम्य कर्म, निष्काम कर्म, ज्ञान, विद्या, अविद्या, संभूति, असंभूति, विनाश व अन्तकाळचें वर्तन यांच्या एकाकी अथवा जोड फळांचें विवरण आहे.

१३ सदरहू संज्ञांपैकीं विद्या, अविद्या व विशेषतः संभूति, असंभूति व विनाश यांचे अर्थ फार बिकट आहेत, त्यासंबंधें टीकाकार व तदभिज्ञ पण्डितांच्या स्पष्टीकरणांत मेळ नाहीं, निदान तेणेंकरून माझें तरी जसें व्हावें तसें समाधान झालें नाहीं, ह्मणून नैय्यायिक जसें केवळ ' अर्थात् तात्पर्यम् ' ठेवितात त्याप्रमाणें त्या संज्ञांचा अर्थ बसवितांना मला करावें लागलें आहे, तेव्हां कोणी त्यांचा जास्त सयुक्तिक अर्थ सुचविला तर त्याचा स्वीकार करण्यांत मजकडून अनमान होणार नाहीं, बाकी अर्थ सरळ केला आहे, त्यांत द्वैत किंवा अद्वैत, सुधारणा किंवा कुधारणा, यांचें खंडन किंवा मंडण करण्याचा माझा प्रयत्न नाहीं.

मुंबई,
३० आगष्ट १८९९.

टीकाकार.

श्रीमच्छंकराचार्यांचा उपक्रम ।

" ॐ तत् सत् ।

ईशावास्यआदिकरून मंत्रांचा कर्मकांडांत उपयोगच होत नाहीं. कारण कीं त्यांच्या योगानें फक्त आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचेंच कायतें ज्ञान होतें । व आत्म्याचा कर्माशीं अर्थाअर्थी संबंध नसतो । आत्म्याचें वास्तविक स्वरूप ह्मटलें ह्मणजे तो शुद्ध, पापरहित, अद्वितीय, अनंत, निराकार, सर्वसाक्षी इत्यादि गुणयुक्त आहे व त्या गुणांचा कर्माशीं विरोध आहे ह्मणून या उपनिषदांतील मंत्रांचा उपयोग यज्ञयागांत होत नाहीं हें ठीकच होय । शिवाय, आत्मा ही कांहीं साध्य किंवा सुसंस्कृत करण्यासारिखी वस्तु नाहीं, किंवा तो कर्ता किंवा भोक्ता नाहीं; तेव्हां त्याचा कर्माशीं कांहींच संबंध पोहोंचत नाहीं । उपनिषदें, गीता व मोक्षधर्म यांतील विवरणांत आत्म्याच्या या सत्यस्वरूपावरच मुख्य झोंड आहे । ज्या सांसारिक समजुतीनें आत्म्यास विचित्र, कर्ता, भोक्ता, अशुद्ध, पापी इत्यादि गुणांनीं विशिष्ट आहे असा मानण्याचा प्रघात पडला आहे त्या समजुतीस तर सर्व कर्में इष्ट व विहितच आहेत । ज्यांस ब्रह्मतेज किंवा स्वर्गसुख मिळविण्याची लालसा असेल त्यांनीं कर्में केलींच पाहिजेत अशी तत्संबंधीं अधिकार जाणणारांची समजूत आहे । तेव्हां या उपनिषदाच्या मंत्रांनीं आत्म्याचें सत्यस्वरूप कळतें व अज्ञान दूर होऊन त्याचें अद्वितीयत्व सिद्ध होतें व संसारांतील माया दुःख वगैरे परिणामांचा उच्छेद होतो । ते मंत्र, ते पढणारे अधिकारी, त्यांच्या विषयांचा परस्पर संबंध व त्यांचीं फळें येणेंप्रमाणें;—

ॐ । पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

अर्थ—जें कांहीं दिसत नाहीं तें झाडून सर्व ब्रह्मरूपच आहे । जें कांहीं दिसतें तें सर्व ब्रह्मरूपच आहे । सगळा हिरण्यगर्भ सगळया ब्रह्मापासून उत्पन्न झाला । सगळें विश्व सगळया ब्रह्मांत लीन होतें । नंतर सगळें ब्रह्मच अवशिष्ट राहतें ।

ॐ । शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥ "

ॐ

अथ ईशोपनिषत्।

वाजसनेयि–संहिता-न्तर्गता ॥

ईशा वास्यमिदꣳ सर्वं यत्किञ्च जगत्याञ्जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥ १ ॥

पदें–ईशा । वास्यम् । इदम् । सर्वम् । यत् । किम् । च । जगत्याम् । जगत् । तेन । त्यक्तेन । भुञ्जीथाः । मा । गृधः । कस्य । स्वित् । धनम् ॥ १ ॥

अन्वय व अर्थ–(यत् किम् च जगत्याम् जगत्) (यत् किञ्च) जें कांहीं (जगत्याम्) ह्या पृथ्वीवर (जगत्) स्वभावतः चंचळ व न्यूनाधिक होणारें वस्तुमात्र (अस्ति) आहे (तत् इदम् सर्वम् ईशा वास्यम्) (तत् इदम् सर्वम्) तें लहान मोठें सर्व कांहीं (ईशा) त्या ऐश्वर्यशाली व अद्वितीय परमेश्वराकडून (वास्यम्) आच्छाद्य ह्मणजे तें त्याच्या आंत राहण्यासारिखें आहे (तेन त्यक्तेन भुञ्जीथाः) (तेन†त्यक्तेन) त्या परमेश्वरानें जे काय अन्नवस्त्रादि पदार्थ तुला तुझ्या कृतकर्माप्रमाणें दिले असतील ते त्यास अर्पण करून व फलासक्ति सोडून (भुञ्जीथाः) आपलीं

---

† तीन एषणा टाकून । एषणा ह्मणजे इच्छा ।

मुलेंबाळें व आश्रित यांसहवर्तमान सुखानें भोग । पण तूं (कस्य स्वित् धनम् मा गृधः) (कस्य स्वित् धनम्) कोणाच्याहि धनादि पदार्थांचा (मा गृधः) अन्यायानें अभिलाष करूं नकोस ।

अर्थ—ह्या दुनियेंत लहान मोठे स्थावर व जंगम असे अनेक पदार्थ आहेत । ते एकून एक झाडून सर्व त्या ऐश्वर्यशाली व अद्वितीय परमेश्वराकडून झांकले जाण्यासारिखे आहेत । एवढा तो परमेश्वर मोठा आहे । परमेश्वरानें जे अन्नवस्त्रादि पदार्थ तुला तुझ्याकृतकर्माप्रमाणें दिले असतील ते तूं त्यास निष्काम भक्तीनें अर्पण कर व आपलीं मुलेंबाळें व आश्रित यांसहवर्तमान तूं त्यांचा सुखानें उपभोग घे; पण धन आदिकरून पदार्थ कोणाचेहि अन्यायानें मिळविण्याची तूं लालसा धरूं नकोस ॥ १ ॥

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳ समाः ।
एवन्त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥२॥

पदें–कुर्वन् । एव । इह । कर्माणि । जिजीविषेत् । शतम् । समाः । एवम् । त्वयि । न । अन्यथा । इतः । अस्ति । न लिप्येते । नरे ॥ २ ॥

अन्वय व अर्थ–(इह कर्माणि कुर्वन् एव शतम् समाः जिजीविषेत्) (इह) ह्या दुनियेंतील संसारयात्रेंत (कर्माणि) पडतील तीं नित्य, नैमित्तिक, ऐहिक व पारलौकिक कर्में (कुर्वन् एव) करीत राहूनच (शतम् समाः) शंभर वर्षेपर्यंत (जिजीविषेत्)वांचण्याची इच्छा धरावी।

(एवम् त्वयि नरे कर्म न लिप्यते) (एवम्) ह्या प्रमाणें निष्काम कर्में करीत राहिलास तर (त्वयि नरे) तुझ्या-सारख्या मर्दाला (कर्म) एकहि कर्म (न लिप्यते) जन्म-मरणाची बाधा करणार नाहीं। (इतः अन्यथा न अस्ति) (इतः) ह्याहून (अन्यथा) जीं निराळीं काम्य कर्में आहेत तीं मनुष्याला बाधूं शकत नाहींत असें (न अस्ति) नाहीं।

अर्थ—ह्या दुनियेंतील संसारयात्रेंत मनुष्यास नित्य नैमित्तिक, ऐहिक व पारलौकिक अनेक कर्में करावीं लागतात। त्यांचा कोणीहि तिटकारा मानूं नये। तीं पडतील तशीं करीत राहून त्यानें शंभर वर्षेंहि वांचण्याची हांव धरावी; पण तीं कर्में निष्काम असावीं-ह्मणजे त्यानें कर्माच्या फळावर आसक्ति ठेवूं नये। अशाप्रकारें तूं कितीहि कर्में करीत राहिलास तरी तूं अगदीं निर्लेप राहशील-ह्मणजे त्यांतील एकाहि कर्मानें तुला जन्ममरणाची बाधा होणार नाहीं। अशी तुझ्यांत तेणेंकरून मर्दुमकी येईल; पण तीं कर्में जर काम्य ह्मणजे फलासक्तीनें केलीं असतील तर त्यांच्यायोगानें मनुष्याला बाधा होणार नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये ॥ २ ॥

असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसा वृताः ।
तांस्ते प्रेत्यापि गच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥३॥

पदें–असुर्याः । नाम । ते । लोकाः । अन्धेन । तमसा । आवृताः । तान् । ते । प्रेत्य । अपि । गच्छन्ति । ये । के । च । आत्महनः । जनाः ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ–(अन्धेन तमसा आवृता ते नाम असुर्य्याः लोकाः) (अन्धेन तमसा)–गाढ अज्ञानरूप तमोगुणानें अथवा अंधकारानें-(आवृताः) व्याप्त असे–(ते नाम) ते सर्वप्रसिद्ध (असुर्य्याः लोकाः) प्राणांच्या पोषणाच्या कामांत गढलेले अथवा ज्यांत सूर्य [2]उगवत नाहीं असे जन अथवा जनपद ह्मणजे देश आहेत। (ये के च आत्महनः जनाः) (ये के च)जे कोणी(आत्महनः) कामक्रोधादि षड्रिपूंस वश होऊन अथवा अविद्येंत मग्न होऊन पितृवत् उत्पत्ति व पालन व पोषण करणाऱ्या आत्मरूप परमेश्वरास विसरणारे कृतघ्न जडवादी व आत्मघातकी (जनाः) लोक आहेत ते (प्रेत्य तान् अपि गच्छंति) (प्रेत्य) असलेल्या देहास सोडिल्यावर (तान् अपि गच्छन्ति)त्या योनींत अथवा लोकीं निश्चयानें जन्मास जातात।

अर्थ—ज्यांत सूर्य उगवत नाहीं असे प्रसिद्ध प्रदेश आहेत ते गाढ अंधकारानें नेहमीं झांकलेले असतात, अथवा प्राणांच्या पोषणाच्या कामांत गढलेले असुर लोक सुप्रसिद्ध आहेत। ते गाढ अज्ञानरूप तमोगुणानें व्याप्त आहेत। जे कोणी कामक्रोधादि षड्रिपूंस वश होऊन अथवा अविद्येंत गर्क होऊन पितृवत् पालन पोषण करणाऱ्या आत्मरूप परमेश्वरास

---

१ असूर्या। पाठांतर। ईशाद्यष्टोपनिषदाप्रमाणें। नववा व बारावा मंत्र पहा२ मोक्षमुल्लरप्रमाणें.

विसरतात ते कृतघ्न जडवादी व आत्मघातकी लोक मेल्यावर हट-कून त्या असुर्य लोकीं अथवा आसुरी योनींत जन्मास जातात ३

अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत् । तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥ ४ ॥

पदें–अनेजत् । एकम् । मनसः । जवीयः । न । एनत् । देवाः ।आप्नुवन् । पूर्वम् । अर्षत् । तत् । धावतः । अन्यान्। अत्येति । तिष्ठत्।तस्मिन् । अपः । मातरिश्वा। दधाति॥४॥

अन्वय व अर्थ–(तत् मनसः जवीयः एकम् अनेजत्) (तत्) तें ब्रह्म (मनसः जवीयः) आठवणीबरोबर हजारों कोश चालून जाणाऱ्या मनापेक्षांहि वेगवान् आहे। तें (एकम्) अद्वितीय आहे । तें (अनेजत्) कंपरहित आहे । (एनत् देवाः न आप्नुवन्) (एनत्) त्याप्रत (देवाः) विषयांचें ज्ञान करून देणारीं तेजस्वी इंद्रियें अथवा त्यांतील अग्न्यादि देवता (न आप्नुवन्) जाऊं शकत नाहींत । तथापि (पूर्वम् अर्षत्) (पूर्वम् अर्षत्) तें विषय व इंद्रियें यांमध्यें भरून राहिलें आहे; पण तें इंद्रियांस गोचर होत नाहीं । तें (तिष्ठत् धावतः अन्यान् अत्येति) (तिष्ठत्) अचळ आहे; पण तें (धावतः अन्यान् अत्येति) धांवणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि इंद्रियांपुढें चालतें । (तस्मिन् मातरिश्वा अपः दधाति) (तस्मिन्) त्याच्या सत्तेनें (मातरिश्वा) आकाशांत वाहणारा वायु अथवा प्राण-

१ केनोपनिषद् पहा । गुरुमुखाप्रमाणें.

वायु (अपः) मेघोदक अथवाश्वासोश्वासक्रिया (दधाति) धारण करितो ।

अर्थ—आठवण झाल्याबरोबर मन हें हजारों कोश चालून जातें । त्या मनापेक्षांहि तें ब्रह्म चपळ आहे । तें अद्वितीय आहे, तें कधीं कंप पावत नाहीं । लहान मोठ्या सर्व विषयांचें ज्ञान इंद्रियांनीं प्राप्त होतें । त्या इंद्रियांची किंवा त्यांवरील अग्न्यादि अधिदेवतांचीहि गति त्या ब्रह्मापुढें कुण्ठित होते । तें विषय व इन्द्रियें यांत ओतप्रोत भरलेलें आहे;पण तें इन्द्रियांस कळत नाहीं । तें अचल आहे;पण तें धांवणाऱ्या हरयेक इन्द्रियापुढें धांव घेतें,इतकें तें वेगवान् आहे । आकाशांत मातरिश्वा नांवाचा वायु वाहतो, तो त्याच्याच सत्तेनें मेघोदक धारण करितो । अथवा प्राणिमात्राच्या तोंडांतून प्राणवायु रात्रंदिवस वाहतो, तो त्याच्याच सत्तेनें श्वासोच्छ्वास क्रिया करितो ॥४॥

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके ।
तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५ ॥

पदें—तत् । एजति । तत् । न । एजति । तत् । दूरे । तत् । उ । अन्तिके । तत् । अन्तः । अस्य । सर्वस्य । तत् । उ । सर्वस्य । अस्य । बाह्यतः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ–(तत् एजति न एजति) (तत्) पूर्वोक्त ब्रह्म (एजति) अचल असून चालतें असें दिसतें । पण तें वस्तुतः (न एजति) कधींच चालत नाहीं । (तत् दूरे) (तत्) तें ब्रह्म (दूरे) विषयामध्यें रममाण झालेल्या जनांस स्थळ व काळ यांनीं लांब आहे । पण तें (तत् उ अन्तिके) (तत् उ अन्तिके) भक्तिज्ञानवैरा-

ग्यशाली जनांस स्थल व काल यांनीं अगदीं समीप आहे। (तत् सर्वस्य अन्तः) (तत्) तें ब्रह्म (सर्वस्य अन्तः) ह्या चराचर जगाच्या आंत सर्वत्र भरलेलें आहे। (उ तत् अस्य सर्वस्य बाह्यतः) (उ) तसेंच (तत्) तें ब्रह्म (अस्य सर्वस्य बाह्यतः ।) ह्या सर्व चराचराच्या बाहेरहि आहे।

अर्थ—ब्रह्म अचल आहे। पण तें चालतें असें दिसतें। कांहीं लोक विषयांच्या भोगामध्यें गर्क झालेले असतात। त्यांस त्या ब्रह्माची कालान्तरीं किंवा स्थलान्तरींहि भेट होत नाहीं। इतकें तें त्यां पासून दूर असतें। पण कांहीं लोक भक्तिवैराग्य-ज्ञानशाली असतात। त्यांच्या तें ब्रह्म अगदीं जवळ असतें। हें *विश्व दोन प्रकारचें आहे। चर व अचर। त्यांत तें ब्रह्म* जसें आंत सर्वत्र भरलेलें आहे तसेंच तें बाहेरहि भरलेलें आहे॥५॥

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्नेवानुपश्यति।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विचिकित्सति॥ ६ ॥

पदें-यः। तु। सर्वाणि। भूतानि। आत्मन्। एव। अनु। पश्यति। सर्वभूतेषु। च। आत्मानम्। ततः। न। विचिकित्सति॥६॥

अन्वय व अर्थ–(यः सर्वाणि भूतानि आत्मन् एव अनु पश्यति) (यः) जो मनुष्य (सर्वाणि भूतानि) सर्व उत्पन्न झालेले चराचर पदार्थ (आत्मन् एव) त्या पर-मात्म्याच्या स्वरूपाचे (अनु पश्यति) अनुक्रमानें आ-हेत असें पाहतो। (च सर्वभूतेषु आत्मानम् अनुपश्यति) (च) आणि–(सर्वभूतेषु) लहान मोठ्या उत्पन्न झालेल्या सर्व पदार्थांत (आत्मानम्) तो ईश अनु

पश्यति) अनुक्रमानें [1]वास करीत आहे असें पाहतो। (ततः न विचिकित्सति)(ततः)असें झालें असतां तो निर्भय होऊन (न विचिकित्सति) संशयाप्रत पावत नाहीं। अथवा कोणाची निंदा किंवा द्वेष करीत नाहीं असा होतो।

अर्थ—हे उत्पन्न झालेले चराचर पदार्थ त्या परमात्म्याच्या ठिकाणीं अनुक्रमानें वास करितात व सर्व भूतमात्रांत त्या परमेश्वराचाहि अनुक्रमें वास आहे। ही गोष्ट ज्यास बरोबर समजली त्यास कोणाचें भय राहत नाहीं व त्यास कोणत्याहि विषयांत संशय रहात नाहीं अथवा तो कोणाची निंदा किंवा द्वेष करीत नाहीं ॥ ३ ॥

यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ ७ ॥

पदें—यस्मिन्। सर्वाणि। भूतानि। आत्मा। एव। अभूत्। विजानतः। तत्र। कः। मोहः। कः। शोकः। एकत्वम्। अनुपश्यतः ॥ ७ ॥

अन्वय व अर्थ—(यस्मिन् विजानतः सर्वाणि भूतानि आत्मा एव अभूत्) (यस्मिन् विजानतः) ज्या ब्रह्माचें नुसत्या भक्तीनें व वैराग्यानें बरेंचसें ज्ञान झालें आहे त्याला (सर्वाणि भूतानि) सर्व उत्पन्न झालेले भिन्न पदार्थ चराचर (आत्मा एव अभूत्) परमात्माच नटला आहे असें दिसतें (तत्र एकत्वम् अनुपश्यतः कः मोहः कः शोकः) (तत्र)

---

१ विजुगुप्सते- पाठांतर। गुप्त ठेवण्यासारिखी पापाची एकहि क्रिया करीत नाहीं। ह्मणजे त्याकडुन पापजनक क्रिया घडतच नाहीं। असा अर्थ होतो.

तर समाधिकाळीं (एकत्वम् अनुपश्यतः) त्यास सर्व-भूतें अखंड एकरूप पाहणाऱ्या योग्यास (कः मोहः) कोणता मोह व (कः शोकः) कोणतें दुःख प्राप्त होऊं शकेल, अलबत कोणतेंहि नाहीं ।

अर्थ—कांहीं लोक नुसते भक्तिमान् व वैराग्यशाली असतात । पण ह्या दोन गुणांच्या जोरावर त्यांस बरेंच ज्ञान प्राप्त होतें । त्याबरोबर दुनियेंत उत्पन्न झालेले शत्रु, मित्र, उदासीन व इतर सर्व चराचर पदार्थ तो परमात्माच नटला आहे असें त्यांस दिसूं लागतें । तेव्हां ज्यांस सर्व भूतें समाधिकाळीं एकरूप दिसतात त्या योग्यास कोणता मोह व कोणता शोक प्राप्त होऊं शकेल बरें ? अलबत कोणताहि नाहीं ॥ ७ ॥

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरꣳशुद्धमपापविद्ध म्। कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान्व्यद धाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८ ॥

पदें—सः । पर्यगात् । शुक्रम् । अकायम् । अव्राणम् । अस्नाविरम् । शुद्धम् । अपापविद्धम् । कविः । मनीषी । परिभूः । स्वयंभूः । याथातथ्यतः । अर्थान् । वि । अदधात् । शाश्वतीभ्यः । समाभ्यः ॥ ८ ॥

अन्वय व अर्थ–(सः पर्यगात् शुक्रेम् अकारायम् अस्नाविरम् शुद्धम् अपापविद्धम् कविः मनीषी परिभूः स्वयंभूः समाभ्यः शाश्वतीभ्यः याथातथ्यतः अर्थान् व्यद-

१ हा शब्द कोणीं अध्याहृत घेत नाहींत व तसाच अर्थ लावितात. २ ह्या व पुढील कांहीं विशेषणांचा लिंगनिर्बंध बरोबर पाळिला नाहीं ।

धात्) (सः) पूर्वोक्त परमात्मा (पर्यगात्) आकाशाप्रमाणें सगळ्यांस सभोंवार व्यापून राहिला आहे । तो (शुक्रम्) देदीप्यमान किंवा ताबडतोब संसार उत्पन्न करणारा आहे। तो (अकायम्) निराकार आहे। तो (अव्रणम्) व्रणरहित आहे। तो (अस्नाविरम्) नाड्या व स्नायु यांविरहित आहे। तो (शुद्धम्) निर्मळ आहे। तो (अपापविद्धम्) पापांच्या परिणामांपासून अलिप्त आहे। तो (कविः) त्रिकालज्ञ आहे। तो (मनीषी) शहाणा व ज्ञानी आहे। तो (परिभूः) सर्वांहून श्रेष्ठ अथवा सर्वसाक्षी आहे। तो (स्वयंभूः स्वयंसिद्ध व नित्यमुक्त आहे। तो (समाभ्यः शाश्वतीभ्यः) अचिरायु आणि चिरायु प्रजांना (याथातथ्यतः) ज्यांचें जसें कर्म असेल त्याप्रमाणें कल्पकल्पान्तीं (अर्थान्) भोगण्यास योग्य पदार्थ (व्यदधात्) देत आला आहे॥८॥

अर्थ—आकाश हें सर्वव्यापी आहे। त्याप्रमाणें सदरहु परमात्मा सभोंवारच्या सगळ्या भूतमात्रांस पूर्णपणें व्यापून राहिला आहे। तो मोठा तेजस्वी किंवा हांहां ह्मणतां संसार उत्पन्न करणारा आहे। तो निराकार आहे। तो व्रणरहित आहे। तो नाड्या व स्नायु यांविरहित आहे। तो पापांच्या परिणामांपासून अलिप्त आहे। तो सर्वांस त्रिकालीं पाहणारा आहे। तो शहाणा व ज्ञानी आहे। तो सर्वांहून श्रेष्ठ आहे। तो सर्वसाक्षी आहे। तो स्वयंसिद्ध व नित्यमुक्त आहे। प्रजा दोन प्रकारच्या असतात। चिरायु व अचिरायु। त्या प्रजाजनांस तो ज्याच्या

त्याच्या कृतकर्मांप्रमाणें कल्पकल्पांतीं भोगण्यास योग्य असे पदार्थ देत आला आहे ॥ ८ ॥

अन्धन्तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाᳲ रताः ॥ ९ ॥

पदें–अन्धम् । तमः । प्रविशन्ति । ये । अविद्याम् । उपासते । ततः । भूयः । इव । ते । तमः । ये । उ । विद्यायाम् । रताः ॥९॥

अन्वय व अर्थ–(ये अविद्याम् उपासते) (ये) जे तत्वज्ञान न जाणतां (अविद्याम्) अमक्या ऐहिक किंवा पारलौकिक कर्माचें अमुक फळ आपल्यास मिळेल अशा आशेनें अहोरात्र केवळ त्या कर्मकाण्डाची(उपासते) मोठ्या आसक्तीनें आराधना करितात (ते अन्धन्तमः प्रविशन्ति) ते अंधतामिस्र नरकांत अथवा अज्ञानरूप तमोगुणानें व्याप्त अशा प्रदेशांत अथवा योनीमध्यें शिरतात । (य उ विद्यायाम् रताः) (य उ) आणि जे (विद्यायाम) ऐहिक व पारलौकिक कर्में टाकून केवळ ज्ञानकाण्डांत (रताः) रममाण होतात (ते ततः भूय इव तमः) (ते ततः) ते पूर्वोक्त अविद्यारूप कर्मांची

---

१ पाठान्तरः—हा पाठ श्रीमच्छंकराचार्यांचा आहे । संहितेंत हा मंत्र बाराव्या मंत्राच्या ठिकाणीं व बारावा नवव्या मंत्राच्या ठिकाणीं आहे । एवढेंच बाकी वस्तुतः फरक नाहीं ।२ अपरा व परा विद्याः– (अ) अपराः– । तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदसामवेदोऽथर्वाङ्गिरस इत्यादि ।

उपासना करणाऱ्या लोकांपेक्षांहि (भूय इव तमः) अधिक मोठ्या अंधतामिस्र नरकाप्रत अथवा जास्त दाट तमोगुणानें व्याप्त प्रदेशांप्रत अथवा योनीप्रत जातात ॥९॥

अर्थ—अविद्या ह्मणजे कर्मकाण्ड। ह्यास दुसरें नांव अपराविद्या अमकें ऐहिक किंवा पारलौकिक कर्म केलें तर त्याचें अमुक फळ मिळतें। असें त्या अविद्येंत मधाचें बोट दाखविलेलें असतें। त्याच्या आशेनें अनेक लोक त्या अविद्येची आराधना अहोरात्र जिवापाड श्रम करून करितात।पण ते खऱ्या विद्येकडे कधीहि ढुंकुनहि पाहत नाहींत।ह्मणून ते अंधतामिस्र नरकांत अथवा दाट अंधकारानें व्याप्त अशा प्रदेशांत अथवा अज्ञानरूप तमोगुणानें व्याप्त अशा योनींमध्यें शिरतात। विद्या ह्मणजे ज्ञानकाण्ड। ह्यास दुसरें नांव पराविद्या। ज्या विद्येनें जीवास निर्विकार ब्रह्माची प्राप्ति होते तीस अपरा विद्या असें ह्मणतात।तींतील दाखविलेल्या सदरहु आशेस भुलून कांहीं लोक आपलीं ऐहिक व पारलौकिक कर्में एकून एक टाकून देतात व केवळ एका ज्ञानकाण्डांत रममाण होतात नुस्त्या कर्मकाण्डाची आराधना करणारे लोक अन्धतमाप्रत जातात असें पूर्वीं सांगितलें आहे। त्यापेक्षांहि अधिक मोठ्या अंधता मिस्र नरकाप्रत अथवा जास्त दाट तमोगुणानें व्याप्त अशा प्रदेशांप्रत अथवा योनीप्रत वरील ज्ञानकपरायण लोक जातात ॥ ९ ॥

(व) परा:— अथ परा यया तदक्षरमधिगम्यते इति।ज्या विद्येनें तें कूटस्थ निर्विकार ब्रह्म जीवास प्राप्त होतें त्यास परा ह्मणतात।—ब्रह्म विद्या— गुप्तविद्या—ब्रह्मज्ञान—अध्यात्मज्ञानः वेदान्त।

१कर्मांचा स्वतः सिद्ध कांहीं उपयोग आहे असें नसलें तरी तीं पुढील ब्रह्मज्ञानास साधनीभूत होतात, तसेंच विद्या व अविद्या यांचें जोड ज्ञान इष्ट व इतर अनिष्ट असें ह्या उपनिषदाचें रहस्य दिसतें।(११।१४ पहा।२गुरुमुखाप्रमाणें।३ध्रुवांकडील प्रदेशाप्रत वगैरे।मंत्र तिसरा पहा।

अन्यदेवाहुर्विद्ययाऽन्यदाहुरविद्यया ।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १० ॥

पदें–अन्यत् । एव । आहुः । विद्यया । अन्यत् । आहुः । अविद्यया । इति । शुश्रुम । धीराणाम् । ये । नः । तत् । विचचक्षिरे ॥ १० ॥

अन्वय व अर्थ–(विद्यया अन्यत् एव आहुः)(विद्यया) ज्ञानकाण्डाच्या अनुष्ठानानें (अन्यत् एव) दुसऱ्याप्रकारचें फळ ह्मणजे देवलोकाची प्राप्ति होते असें (आहुः) तदभिज्ञ ह्मणतात, कारण " कर्मणा पितृलोको विद्यया देवलोकः" इति श्रुतेः–व (अविद्यया अन्यत् एव आहुः) (अविद्यया) ऐहिक व पारलौकिक काम्यकर्मांच्या अनुष्ठानानें (अन्यत् एव) दुसेर प्रकारचें ह्मणजे धन सुत दारा-पितृलोकादि फळ प्राप्त होतें असें (आहुः) तदभिज्ञ ह्मणतात । (ये नः तत् विचचक्षिरे) (ये) ज्या आचार्यांनीं (नः) आह्माला (तत्) त्या ब्रह्मतत्वाचें (विचचक्षिरे) विवरण केलें (धीराणाम् इति शुश्रुम) त्या (धीराणाम्) बुद्धिमान् व शहाण्या गुरुजनांचा (इति) अशा प्रकारचा उपदेश (शुश्रुम) आह्मीं ऐकिला आहे ॥ १० ॥

---

१ पाठान्तरः–हा पाठ श्रीमच्छंकराचार्यांचा आहे,संहितेंत हा मंत्र तेराव्या मंत्राच्या ठिकाणीं व तेरावा दहाव्या मंत्राच्या ठिकाणीं आहे। एवढेंच । बाकी त्यांत वस्तुतः फरक नाहीं ।

अर्थ–विद्येच्या अनुष्टानानें एका प्रकारचें फळ ह्मणजे शान्त्यादिफळ प्राप्त होतें असें ह्मणतात। व अविद्येच्या अनुष्टानानें दुसऱ्या प्रकारचें ह्मणजे धनसुतदारादि फळ प्राप्त होतें असें ह्मणतात। ज्या आचार्यांनीं आम्हांला त्या ब्रह्मतत्वाचा उपदेश केला त्या शहाण्या व बुद्धिमान गुरुजनांच्या तोंडून अशा प्रकारचा उपदेश आह्मीं ऐकिला आहे ॥ १० ॥

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयंसहै।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते ॥ ११ ॥

पदें–विद्याम् । च। अविद्याम् । च । यः । तत् । वेद । उभयम् । सह । अविद्यया । मृत्युम् । तीर्त्वा । विद्यया । अमृतम् । अश्नुते ॥ ११ ॥

अन्वय व अर्थ–(यः विद्याम् च अविद्याम् च तत् उभयम् सह वेद) (यः) जो (विद्याम् च अविद्याम् च) पूर्वी सांगितलेलें ज्ञानकाण्ड व कर्मकाण्ड (तत् उभयम् सह) हीं दोन्हीहि एकदम (वेद) एकच पुरुष जाणतो। (सः अविद्यया मृत्युम् तीर्त्वा विद्यया अमृतम् अश्नुते) (सः) तो (अविद्यया) त्या कर्मकाण्डाच्या अनुष्ठानानें (मृत्युम्) जन्ममरणाच्या येरझारांची नदी (तीर्त्वा) तरून जाऊन (विद्यया) सदरहू ज्ञानकाण्डाच्या अनुष्ठा-

---

१ पाठान्तरः–हा पाठ श्रीमच्छंकराचार्यांचा आहे । संहितेंत हा मंत्र चवदाव्या मंत्राच्या ठिकाणीं व चौदावा मंत्र अकराव्या मंत्राच्या ठिकाणीं आहे। एवढेंच। बाकी वस्तुतः त्यांत फरक नाहीं।

२ पाठान्तरः– स ह । ईशाद्यष्टोपनिषद्।

नानें (अमृतम्) ज्यांत मरणाचें भय नाहीं असा मोक्ष (अश्नुते) भोगितो ॥ ११ ॥

अर्थ—जो कोणी सदरहु विद्या व अविद्या ह्या दोन्हीहि एकदम जाणतो तो त्या अविद्येनें जन्ममरणाच्या येरझारांची नदी तरून जातो व विद्येच्या अनुष्ठानानें ज्यांत मरणाचें भय नाहीं असा मोक्ष भोगितो ॥ ११ ॥

अन्धं[1]तमः प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्याꣳरताः ॥१२॥

पदें—अन्धम् । तमः । प्रविशन्ति । ये । असम्भूतिम् । उपासते । ततः । भूयः । इव । ते । तमः । ये । उ । सम्भूत्याम् । रताः ॥ १२ ॥

अन्वय व अर्थ–(ये असम्भूतिम् उपासते) (ये) जे अज्ञानी लोक (अस[2]म्भूतिम्) उत्क्रान्त अथवा व्याकृत प्रकृतीस सृष्टीच्या उत्पत्तीचें खरें कारण सोडून । (उपासते) भजतात । (ते अन्धम् तमः प्रविशन्ति) (ते) ते लोक (अन्धम् तमः) अन्ध तामिस्रनरकांत अथवा अज्ञानरूप तमोगुणानें व्याप्त अशा प्रदेशांत अथवा योनींत (प्रविशन्ति) शिरतात । पण (ये उ सम्भूत्याम् रताः) (ये उ) जे कोणी केवळ(सम्भू[3]त्याम्) निष्क्रान्त अथवा अव्याकृत प्रकृ-

---

१ पाठान्तर·- ह्या बाबतींत नवव्या मंत्रावरील टीप पहा ।

२ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें–प्रकृति–Nature–स्वभाव किंवा निराकारस्वरूप । कांहींच्या मताप्रमाणें ।

३ सृष्टीच्या उत्पत्तीचें अप्रत्यक्ष कारण जें हिरण्यगर्भादि ब्रह्म–श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें । किंवा प्रतिमा–कांहींच्या मताप्रमाणें ।

तीच्या उपासनेंत (रताः) रममाण होतात । (ते ततः भूय इव तमः) (ते) ते लोक (ततः) असंभूतीच्या ह्मणजे प्रकृतीच्या उपासकांस ज्या अन्धतमाची प्राप्ति होते असें पूर्वी सांगितलें आहे त्यापेक्षांहि (भूय इव तमः) अधिक अज्ञानरूप अंधकार ज्यांत आहे अशा नरकाप्रत अथवा प्रदेशांप्रत अथवा योनीप्रत जातात ॥ १२ ॥

अर्थ—जे अज्ञानी लोक जें सृष्टीचें खरें कारण नव्हे अशा असम्भूतीची ह्मणजे प्रकृतीची उपासना करितात ते अन्धतामिस्र नरकांत अथवा दाट तमोगुणानें व्याप्त अशा प्रदेशांत अथवा योनींत शिरतात । पण जे कोणी केवळ सम्भूतींत ह्मणजे उत्क्रांतीच्या कार्यकारणांत अथवा हिरण्यगर्भादि ब्रह्मांत अथवा प्रवृत्तिमार्गांत रममाण होतात, ते लोक असंभूतीच्या ह्मणजे प्रकृतीच्या उपासकांस ज्या अन्धतमाची प्राप्ति होते असें पूर्वी सांगितलें आहे त्यापेक्षांहि अधिक अज्ञानरूप अंधकार ज्यांत आहे अशा नरकाप्रत अथवा प्रदेशाप्रत अथवा योनीप्रत जातात ॥ १२ ॥

अन्यदेवाहुः[२] सम्भवादन्यदाहुरसम्भवात् ।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३ ॥

पदें—अन्यत् । एव । आहुः । सम्भवात् । अन्यत् आहुः । असम्भवात् । इति । शुश्रुम । धीराणाम् । ये । नः । तत् । विचचक्षिरे ॥ १३ ॥

अन्वय व अर्थ—(सम्भवात् अन्यत् एव आहुः)

---

१ ध्रुवाकडील प्रदेशांत वगैरे । तिसरा मंत्र पहा ।

२ पाठान्तरः—दहाव्या मंत्रावरील टीप पहा ।

(सम्भवात्) कार्यब्रह्माच्या उपासनेनें (अन्यत् एव) निराळेंच फळ ह्मणजे अणिमादि सिद्धि प्राप्त होतात असें (आहुः)तदभिज्ञ ह्मणतात । व (असम्भवात् अन्यत् आहुः) (असम्भवात्) जें सृष्टीचें खरें कारण नव्हे अशा अव्याकृत प्रकृतीच्या उपासनेनें(अन्यत्)निराळेंच फळ ह्मणजे प्रकृतींत लय प्राप्त होतो असें (आहुः) तदभिज्ञ ह्मणतात । (ये नः तत् विचचक्षिरे) (ये) ज्या आचार्यांनीं(नः) आह्माला (तत्) त्या ब्रह्मतत्वाचें (विचचक्षिरे) विवरण केलें त्या (धीराणाम् इति शुश्रुम) (धीराणाम्) शहाण्या व बुद्धिमान गुरुजनांचा (इति) अशा प्रकारचा उपदेश (शुश्रुम) आह्मीं ऐकिला आहे ॥ १३ ॥

अर्थ—कार्यब्रह्माच्या उपासनेनें निराळेंच फळ ह्मणजे अणिमादि सिद्धि प्राप्त होतात, असें तदभिज्ञ पण्डित ह्मणतात। व जें सृष्टीचें खरें कारण नव्हे अशा अव्याकृत प्रकृतीच्या उपासनेनें निराळेंच फळ ह्मणजे प्रकृतींत लय प्राप्त होतो असें तदभिज्ञ पण्डित ह्मणतात। ज्या आचार्यांनीं आह्माला त्या ब्रह्मतत्वाचें विवरण केलें त्या शाहाण्या व बुद्धिमान गुरुजनांचा अशा प्रकारचा उपदेश आह्मीं ऐकिला आहे ॥ १३ ॥

सम्भूतिञ्च[2] विनाशं च यस्तद्वेदोभयꣳ सह ।
विनाशेन मृत्युं तीर्त्वा सम्भूत्याऽमृतमश्नुते ॥ १४ ॥

पदें—सम्भूतिम् । च । विनाशम् । च । तत् । वेद ।

---

१ हिरण्यगर्भादि ब्रह्मकारण ।

२ पाठान्तरः—अकराव्या मंत्रावरील टीप पहा ।

उभयम् । सह । विनाशेन । मृत्युम् । तीर्त्वा । सम्भूत्या । अमृतम् ।अश्नुते ॥ १४ ॥

अन्वय व अर्थ–(यः सम्भूतिम् च विनाशम् च तत् उभयम् सह वेद) (यः) जो पुरुष (सम्भूतिम्[1]) उत्क्रान्त अथवा व्याकृत प्रकृतीचें आदिकारण (च) तसेंच (विनाशम्) निष्क्रान्त अथता अव्याकृत प्रकृतीचें आदिकारण (तत् उभयम्) हीं दोन्हींहि (सह वेद) एकदम जाणतो (सः विनाशेन मृत्युम् तीर्त्वा) (सः) तो (विनाशेन[2]) निष्क्रान्त अथवा अव्याकृत प्रकृतीच्या कार्य-कारणांच्या ज्ञानानें (मृत्युम्) जन्ममरणरूप नदी (तीर्त्वा) तरून जाऊन (सम्भूत्या अमृतम् अश्नुते) (सम्भूत्या) उत्क्रान्त अथवा व्याकृत प्रकृतीच्या कार्य-कारणांच्या ज्ञानानें (अमृतम्) मरणादि दुःखें ज्यांत असणें शक्य नाहींत अशी मुक्ति (अश्नुते) भोगतो ॥ १४॥

अर्थ—जो पुरुष उत्क्रान्त अथवा व्याकृत प्रकृतीचें आदि-कारण तसेंच निष्क्रान्त अथवा अव्याकृत प्रकृतीचें आदिकारण

---

१ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें सम्भूति ह्मणजे असम्भूति व विनाश ह्मणजे हिरण्यगर्भ । कोणाच्या मताप्रमाणें–सम्भूति ह्मणजे प्रवृत्तिमार्ग–सगुणोपासना । नवीन मताप्रमाणें–उत्क्रान्तीचें कारण । संभव ह्मणजे उत्पत्ति ज्याच्यापासून होते तें कारण। २ कोणाच्या मताप्रमाणें–(वि)–विशेषेंकरून गेला आहे–(नाशम्)—नाश ज्याचेपासून–ह्मणजे अविनाशी ब्रह्म व कोणाच्या मताप्रमाणें–प्रकृतीच्या विशेष नाशाचें कारण । कोणाच्या मताप्रमाणें–निवृत्तिमार्ग–निर्गुणोपासना । नवीन मताप्रमाणें–सृष्टीच्या निष्क्रान्तीचें कारण ।

हीं दोन्हींहि एकदम जाणतो, तो निष्क्रान्त अथवा अव्याकृत प्रकृतीच्या कार्यकारणांच्या ज्ञानानें जन्ममरणरूप नदी तरून जाऊन उत्क्रान्त अथवा व्याकृत प्रकृतीच्या कार्यकारणांच्या ज्ञानानें मरणादि दुःखें ज्यांत असणें शक्य नाहींत अशी मुक्ति भोगितो ॥ १४ ॥

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्तꣳ शरीरम् ।
ओ३म् क्रतो स्मर क्लिबे स्मर कृत ꣳ स्मर ॥ १५ ॥

पदें–वायुः । अनिलम् । अमृतम् । अथ । इदम् । भस्मान्तम् । शरीरम् । ओम् । क्रतो । स्मर । क्लिबे । स्मर । कृतम् । स्मर ॥ १५ ॥

अन्वय व अर्थ–(मम वायुः अमृतम् अनिलम्(वा) मम वायुः अनिलम् अमृतम्) (मम) माझा (वायुः) प्राणवायु या शरीरास सोडून गेल्यावर (अमृतम्) मरणधर्मविरहित अशा (अनिलम्)त्या सर्वव्यापक सूत्रात्म्या वायूस जाऊन मिळो । अथवा (मम) माझा (वायुः) लिंगशरीरी जीवात्मा (अनिलम्) निर्विकार (अमृतम्) मोक्षाप्रत जावो । (अथ इदम् शरीरम्) भस्मांतम् (अथ) असें झाल्यावर (इदम्) ह्या प्रत्यक्ष अग्नीस बळीप्रमाणें अर्पण केलेल्या (शरीरम्) शरीराचें (भस्मान्तम्)

---

१ कृतꣳ। पाठान्तर–ईशाद्यष्टोपनिषदाप्रमाणें ।
२ श्रीमच्छंकराचार्यांच्यामताप्रमाणें–हा अर्थ आहे । त्यांच्या पाठांत हा मंत्र सतरावा आहे ।

भस्म होऊन जावो। (क्रतो ओ३म् स्मर) (क्रतो) हे योग्या किंवा मना (त्वं) तूं (ओ३म) ओ३कारवाच्य परमात्म्याचें (स्मर) ध्यान कर। (क्लिबे स्मर) (क्लिबे) तुला सामर्थ्य प्राप्त व्हावें ह्मणून तूं त्या ईशाचें (स्मर) ध्यान कर । (कृतम् स्मर) (कृतम्) पूर्वी केलेल्या कर्मांची मदत व्हावी ह्मणून त्या आजन्म केलेल्या कर्मांची (स्मर) आठवण कर ॥ १५ ॥

अर्थ—माझा प्राणवायु या शरीरास सोडून गेल्यावर मरणधर्मविरहित अशा त्या सर्वव्यापक सूत्रात्म्या वायूस जाऊन मिळो। अथवा माझा लिंगशरीरी जीवात्मा निर्विकार मोक्षाप्रत जावो । असें झाल्यावर प्रत्यक्ष अग्नीस बळीप्रमाणें अर्पण केलेल्या ह्या शरीराचें भस्म होऊन जावो । हे योग्या, किंवा मना, तूं ॐकारवाच्य परमात्म्याचें ध्यान कर। तुला सामर्थ्य प्राप्त व्हावें ह्मणून तूं त्या ईशाचें ध्यान कर। पूर्वी केलेल्या कर्मांची मदत व्हावी ह्मणून त्या आजन्म केलेल्या कर्मांची आठवण कर ॥ १५ ॥

अग्ने नय सुपथा रायेऽअस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् । युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठान्ते नम उक्तिं विधेम ॥ १६ ॥

पदें—अग्ने । नय । सुपथा । राये । अस्मान् । विश्वानि । देव । वयुनानि । विद्वान् । युयोधि । अस्मत् । जुहुराणम् । एनः । भूयिष्ठाम् । ते । नमः । उक्तिम् । विधेम ॥ १६ ॥

अन्वय व अर्थ–(अग्ने देव विश्वानि वयुनानि विद्वान् अस्मान् राये सुपथा नय) (अग्ने देव) हे अग्निदेवा!। (विश्वानि) सगळीं (वयुनानि) कर्में (विद्वान्) जाणणाऱ्या हे तूं (अस्मान्) आह्मांस (राये) कृतकर्मांचें फळ किंवा ऐश्वर्य प्राप्त व्हावें ह्मणून (सुपथा) जन्ममरणाच्या येरझारा चुकविणाऱ्या उत्तरेकडील चांगल्या सरळ रस्त्यानें ह्मणजे देवयानमार्गानें अर्थात् उत्तरायणानें (नय) ने। (जुहुराणम् एनः अस्मत् युयोधि) (जुहुराणम्) कुटिल (एनः) पापाला (अस्मत्) आह्मापासून (युयोधि) दूर कर। त्वां असें करावें ह्मणूनच आह्मी (ते भूयिष्ठाम् नम उक्तिम् विधेम) (ते) तुला (भूयिष्ठाम्) पुन्हः पुन्हां (नमः उक्तिम्) नमस्कार नमस्कार असा शब्दोच्चार (विधेम) करितों ॥ १६[2]॥

अर्थ—हे अग्निदेवा! सगळीं कर्में जाणणाऱ्या हे तूं आह्मांस कृतकर्मांचें फळ किंवा ऐश्वर्य प्राप्त व्हावें ह्मणून जन्ममरणाच्या येरझारा चुकविणाऱ्या उत्तरेकडील चांगल्या सरळ रस्त्यानें ह्मणजे देवयानमार्गानें, अर्थात् उत्तरायणानें ने। आह्मांस पितृयानानें ह्मणजे दक्षिणायनानें नेऊं नको। कारण तो आपल्या शास्त्राप्रमाणें जन्मांतर चुकविणारा मार्ग नाहीं।

---

१ आह्मास पितृयानानें ह्मणजे दक्षिणायनानें नेऊं नको, कारण तो आपल्या शास्त्राप्रमाणें जन्मांतर चुकविणारा मार्ग नाहीं। श्रीमद्भगवद्गीता व केनोपनिषदांतील उपक्रम व ना. रा. बा. गं. टिळक यांचें ओरायण पुस्तक पहा ह्मणजे सदरहू शास्त्ररहस्य सहज समजेल।

२ श्रीमच्छंकराचार्यांच्या पाठांत ह्या मंत्राचा क्रम अठरावा आहे।

कुटिल पापाला आह्मांपासून दूर कर। त्यां असें करावें ह्मणूनच आह्मी तुला पुन्हः पुन्हां नमस्कार नमस्कार असा शब्दोच्चार करितों ॥ १६ ॥

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन्समूह ॥
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि ॥ १६ ॥[1]

पदें—पूषन्। एकर्षे। यम। सूर्य। प्राजापत्य। व्यूह। रश्मीन्। समूह। तेजः। यत्। ते। रूपम्। कल्याणतमम्। तत्। ते। पश्यामि ॥ १६ ॥

अन्वय व अर्थ—(पूषन् एकर्षे यम सूर्य प्राजापत्य रश्मीन् व्यूह तेजः समूह) (पूषन्) हे दीनदुनिया पोसणाऱ्या सूर्या। (एकर्षे) हे आकाशाचें आक्रमण करणाऱ्या अद्वितीय ऋषे। (यम) हे सर्वांचें नियमन करणाऱ्या यमधर्मा। (सूर्य) सर्वांतर्यामी सूर्या। (प्राजापत्य) हे प्रजापतिपुत्रा। (रश्मीन् व्यूह) तुझ्या तापद किरणांचा भेद कर व (तेजः समूह) सुखद तेजाचें एकीकरण कर। (यत् ते कल्याणतमम् रूपम् तत् ते पश्यामि) (यत् ते कल्याणतमम् रूपम्) जें तुझें अत्यंत मंगलदायक स्वरूप आहे (तत् ते पश्यामि) तें तुझें रूप मी पाहूं इच्छितों ॥ १६ ॥

अर्थ—हे दीनदुनिया पोसणाऱ्या, हे आकाशाचें आक्रमण करणाऱ्या अद्वितीय ऋषे, हे सर्वांचें नियमन करणाऱ्या यमधर्मा, हे सर्वांतर्यामी सूर्या, हे प्रजापतिपुत्रा तुझ्या तापद

---

१ (हा अधिक मंत्र) श्रीमच्छंकराचार्यांच्या पाठाप्रमाणें।

किरणांचा भेद कर व सुखद तेजाचें एकीकरण कर । कारण कीं जें तुझें अत्यंत मंगलदायक स्वरूप आहे तें तुझें रूप मी पाहूं इच्छितों ॥ १६ ॥

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
[1]योऽसावादित्ये पुरुषः सोऽसावहम्।ओ३म् खम्ब्रह्म ॥

पदें–हिरण्मयेन । पात्रेण । सत्यस्य । अपिहितम् । मुखम् । यः । असौ । आदित्ये । पुरुषः । सः । असौ । अहम् । ओ३म् । खम् । ब्रह्म ॥ १७ ॥

अन्वय व अर्थ–(हिरण्मयेण पात्रेण सत्यस्य मुखम् अपिहितम्) (हिरण्मयेण पात्रेण) सुवर्णाच्या भांड्यानें किंवा सुवर्णासारख्या तेजस्वी झांकणानें (सत्यस्य) त्या सत्यस्वरूप ईशाचें अथवा ज्ञानरूप मोक्षाचें (मुखम्) तोंड पक्षीं दरवाजा (अपिहितम्) बंद राहतो ह्मणजे फलासक्त संसारी मनुष्यास त्याची प्राप्ति

---

१ पाठान्तरः–तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥ १५ ॥

पदें—तत् । त्वम् । पूषन् । अपावृणु । सत्यधर्माय । दृष्टये ।

अन्वय व अर्थ—(पूषन्! सत्यधर्माय दृष्टये तत् त्वम् अपावृणु) (पूषन्)–हे अलम दुनिया पोसणाऱ्या सूर्या ! (सत्यधर्माय)(सत्यधर्मानें वागणारा जो मी त्यास–(दृष्टये) तो सत्यस्वरूप परमेश दिसावा ह्मणून (तत् त्वम् अपावृणु) तें झांकण तूं उघड ।

अर्थ—हे अलम दुनिया पोसणाऱ्या सूर्या । सत्यधर्मानें वागणारा जो मी त्यास तो सत्यस्वरूप परमेश दिसावा ह्मणून तें झांकण तूं उघड ॥ १७ ॥

होत नाहीं । त्याची संपत्ति त्याच्या मोक्षास आड येते । कारण तो पैशाच्या झांकणानें खऱ्याचें तोंड खरोखरी झांकून ठेवतो । त्या सत्यस्वरूप ईशाच्या ठायीं त्याची भक्ति संन्याशाप्रमाणें निष्काम नसते । ह्मणून त्या सत्यस्वरूपास मिळण्यास फलत्यागपूर्वक संसार किंवा संन्यास चालविला पाहिजे । व (आदित्ये यः असौ पुरुषः) (यः असौ) जो हा (आदित्ये) सृष्टीच्या केन्द्रस्थानीं असणाऱ्या सूर्यमंडळावर (पुरुषः)पूर्णपुरुष ईश्वर आहे । (सः असौ अहम्) (सः असौ) तो हा (अहम्) मी आहें। व (ॐ खम् ब्रह्म) (ॐ) ॐकार वाच्य (खम् ब्रह्म) निराकार सर्वव्यापी ब्रह्म आहे । अशी भावना धरून त्याचें ध्यान करावें ॥ १७ ॥

अर्थ—सुवर्णाच्या भांड्यानें किंवा सुवर्णासारख्या तेजस्वी झांकणानें त्या सत्यस्वरूप ईशाचें अथवा ज्ञानरूप मोक्षाचें तोंड, पक्षीं दरवाजा बंद राहतो । ह्मणजे फलासक्त संसारी मनुष्यास त्याची प्राप्ति होत नाहीं । त्याची संपत्ति त्याच्या मोक्षास आड येते । कारण तो पैशाच्या झांकणानें खऱ्याचें तोंड खरोखरी झांकून ठेवितो । त्या सत्यस्वरूप ईशाच्या ठायीं त्याची भक्ति संन्याशाप्रमाणें निष्काम नसते। ह्मणुन त्या सत्यस्वरूपास मिळविण्यास फलत्यागपूर्वक संसार अथवा संन्यास चालविला पाहिजे व जो हा पूर्ण पुरुष ईश्वर सृष्टीच्या केन्द्रस्थानीं असणाऱ्या सूर्यमंडळावर आहे । तो हा मी आहें व ॐकार वाच्य निराकार सर्वव्यापी ब्रह्म आहे । अशी भावना धरून त्यानें ध्यान केलें पाहिजे॥१७॥

॥ इति परशुरामशर्मकृता प्रतिपदबोधिनी माध्वीशोपनिषद्महाराष्ट्रभाषाटीका समाप्ता ॥

प्रस्तावना.

१ नांवाची उत्पत्तिः–ईशोपनिषत् व केनोपनिषत् हीं नांवें ह्या उपनिषदांस पडण्याचें कारण काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास शास्त्रें धुंडाळावयास नकोत. कारण तें कांहीं मोठें गूढ आहे असें नाहीं. ज्यास संस्कृताचा गंधही नाहीं त्यासहि तें सहज समजण्यासारिखें आहे. हीं दोन्हीं उपनिषदें घेऊन त्यांचे पहिलेच मंत्र पहा. त्या मंत्रांच्या पहिल्या शब्दांतच ह्या नांवांचें मूळ आहे. ते शब्द ईश व केन हे होत. ह्यांवरून ईशोपनिषद् व केनोपनिषद् हीं नांवें तयार झालीं. पण हीं त्या उपनिषदांचीं लोकव्यवहारांतील नांवें. त्यांचीं शास्त्रोक्त नांवें निराळींच आहेत. ईशोपनिषदास वाजसनेयोपनिषद् ह्मणतात त्याप्रमाणें ह्या केनोपनिषदास तलवकारोपनिषद् असें ह्मणतात.

२ उपनिषदाचें स्थळः–ईशोपनिषदाच्या प्रस्तावनेंत बारा उपनिषदांचीं नांवें दिलीं आहेत. तीं सर्व वेदमूलक आहेत असा तद्भिज्ञ लोकांचा समज आहे. त्यांतील कांहीं उपनिषदें संहितेंत, कांहीं ब्राह्मणांत व कांहीं शाखांत मोडतात. उदाहरणार्थ, ईशोपनिषत् ह्मणजे यजुर्वेदाच्या वाजसनेयि–संहितेचा चाळीसावा अध्याय, त्याप्रमाणें केनोपनिषत् हा तलवकार शाखेंतील नववा अध्याय. सामवेदाच्या एक हजार शाखा आहेत. त्यांत, तलवकार ही एक शाखा आहे. या शाखेचे नऊ अध्याय आहेत. त्यांतील पहिल्या आठ अध्यायांत कर्मकांडाचें वर्णन आहे व नवव्या अध्यायांत ज्ञानकांडाचें वर्णन आहे. संहिता, ब्राह्मण किंवा शाखा ह्याचा जो भाग असा ज्ञानपर असतो त्यास उपनिषत् असें ह्मणतात, त्याप्रमाणें ह्या अध्यायास केनोपनिषत् किंवा तलवकारोपनिषत् असें नांव चालतें. ही तलवकारशाखा श्रीमच्छंकराचार्य यांच्या वेळेपर्यंत प्रचलित होती, पण ती हल्लीं कोठें फारशी आढळत नाहीं असें ह्मणतात.

३ भाषांतराच्या सोईः–॥न तत्र चक्षुर्गच्छति—इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद् व्याचचक्षिरे ॥ ३ ॥ प्रथम खण्ड–केनोपनिषत् पहा.

ह्यावरून हीं उपनिषदें गुरुशिष्यपरंपरेनें शिकवीत असें निर्विवाद सिद्ध होतें. आमचे गुरुजी हीं उपनिषदें उदासी पंथाच्या गोसाव्यांच्या आखाढ्यांत शिकले. यावरून अगदीं अलीकडे सुद्धां ह्या ग्रंथांच्या अध्ययनाची व्याप्ति किती होती हें उघड दिसतें. पण ही वहिवाट हल्लीं अगदीं मोडली आहे. ह्मणून आतांच्या शिक्षणांत किंवा भाषांतरांत वडाची साल पिंपळाला व पिंपळाची साल वडाला किती ठिकाणीं होत असेल हें कोणीं सांगावें ! उपनिषदांवर श्रीमच्छंकराचार्यांच्या टीका सर्वमान्य आहेत. पण त्याहि गुरुशिष्यपरंपरेच्या अभावीं मूळांतील दुर्बोधस्थळीं फारशा उपयोगीं पडत नाहींत. तेव्हां युक्तीस धरून काम उरकून घेतल्यावांचून गत्यंतर नसतें । अशाबद्दल मोक्षमूलर यांस आमच्येप्रमाणेंच खेद प्रदर्शित करावा लागला आहे, तो असाः—

"I give my translation as hypothetical only,for certainty is extremely difficult to attain, when we have to deal with these enigmatical sayings which, when they were first delivered, were necessarily accompanied by oral explanations."—Sacred Books of the East Vol. I–P. 152–1.

१ ह्या उपनिषदाचीं परभाषेंतील भाषांतरें:—

१ दारा सुखोष याचें फारशी भाषांतर–१६५७

२ एन्क्विटील डयुपेरानचें लाटीन भाषांतर– १८०१–१८०२

३ राममोहन रायचें इंग्रजी भाषांतर–१८३२

४ विनडिशमन वगैरेचें जर्मन भाषांतर

५ मोक्ष मुल्लरचें इंग्रजी भाषांतर–१८७९

कोणीहि भाषा शिकतो तो शब्दांवरून शिकत नाहीं–तो वाक्यांवरून शिकतो. ह्मणून भाषांतर वाक्यपृथक्करणास धरून केलें तर टीकाविषयक ग्रंथ जास्त सुगम होतो हें इंगित भाषांतर करतांना सुचलें त्याप्रमाणें व्यवस्था ह्या पुस्तकांत केली व तीच पूर्वीं होऊन पडलेल्या ईशोपनिषदांत करण्याचा विचार आहे.

४ दुर्बोध स्थळें—ईशोपनिषदांत जशा अनेक संज्ञा दुर्बोध आहेत. त्याप्रमाणें ह्या उपनिषदांत एकच संज्ञा दुर्बोध आहे. ती कोणती ह्मणाल तर बाराव्या मंत्रांतील 'प्रतिबोध' हा शब्द होय. त्याचा अर्थ त्या मंत्राच्या खालीं टिपेंत यथामति सविस्तर दिला आहे. त्यावरून त्या शब्दाच्या अर्थाचा वाचकांस फारसा संशय राहणार नाहीं. पण त्यावरून निघणारें समाधिप्रकरण समजण्यास प्रत्यक्ष तदभिज्ञ गुरूची कृपा संपादिल्यावांचून गत्यंतर नाहीं. कारण शब्दपांडित्य ऐकल्यानें जर यम, नियम, आसन, प्राणायाम,प्रत्याहार, धारणा, ध्यान, व समाधि हीं साधलीं असतीं तर अतींद्रिय ज्ञानी पुरुषांचें हल्लीं सुशिक्षित ह्मणविणारांत असें दुर्भिक्ष कधींच नसतें. याशिवाय कित्येक मंत्रांत जागोजाग दुसरीं दुर्बोध स्थळें आहेत, तीं त्या त्या मंत्राखालील टिपेंतून सुचविलीं आहेत.

५ विनंति.—हें भाषांतर करतांना गुरुकृपेशिवाय अनेक ग्रंथांचें साह्य घेतलें आहे. त्याबद्दल मी त्यांचा बहुत ऋणी आहे हें येथें कबूल केलें पाहिजे. पण त्यांत कांहीं वावगें झालें असल्यास त्याबद्दल जबाबदार ते नाहींत—हें सांगणें माझें कर्तव्य आहे. पण तें मात्र त्यांनीं किंवा इतरानीं मेहेरबानीनें कळवावें ही विनंति.

मुंबई,
३० आगष्ट १८९९.

प० ह० थत्ते.

श्रीमच्छंकराचार्यांचा उपक्रम ।

ॐ तत् सत् ।

सामवेदाच्या तलवकार शाखेंतील ह्या नवव्या भागास आरंभ करण्यापूर्वी सर्व कर्मांचें विवरण केलें आहे व सर्व उद्योगांचें मूळ जे प्राण त्यांच्या भक्तीचे निरनिराळे प्रकार दाखविले आहेत व यज्ञाच्या पूर्वी ह्मणावयाच्या सामगीतांविषयीं सर्व कांहीं माहिती दिली आहे ! नंतर गायत्र सामन ह्मणजे काय ह्याचें स्पष्टीकरण केलें आहे व गुरु व शिष्य यांचा वंशवेल दिला आहे. दरयेक कर्म व ज्ञान यांचें यथासांग पालन झालें तर तें निरिच्छ व मुमुक्षू मनुष्याचें मन शुद्ध करितें. मनुष्य सेच्छ व ज्ञानशून्य असेल तर श्रुति व स्मृति यांत सांगितलेलीं कर्में केल्यानें तो दक्षिणायन अथवा पितृयान नामक मार्गास लागतो व पुढें संसारांतील जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडतो । शास्त्रांस विरुद्ध व मनोवृत्तींस अनुकूळ अशीं कर्में केल्यानें मनुष्यास नीच योनींत जन्म प्राप्त होतो । ह्मणजे तो जनावर किंवा जडमूढ होतो। श्रुति ह्मणतात, देवयान किंवा पितृयान यांपैकीं एकाहि मार्गानें न जाणारे हे लहान प्राणी पुन्हः पुन्हः मरून जन्मतात. दुसरी श्रुति ह्मणते—ह्या दोन मार्गांपैकीं एकाहि मार्गानें न जाणारे हे तीन प्रकारचे प्राणी अशा ह्या दुःखमय स्थितीस येऊन पोहोंचतात. ज्याचें मन शुद्ध आहे व जो निरिच्छ आहे व ज्याच्या ह्या किंवा पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांची बेबाकी झाली आहे त्यासच ब्रह्म जाणण्याची इच्छा उत्पन्न होते व त्यासच ह्या मृगजलासारख्या संसाराचा वीट उत्पन्न होतो, कारण त्यांत हेतु व साधनें यांशिवाय कांहीं नसतें, ह्या उपनिषदांत ब्रह्माचें चित्र प्रश्नोत्तररूपानें काढिलें आहे । काठकोपनिषदांत असें ह्मटलें आहे कीं 'स्वयंभूनें मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांस बहिर्मुख केलें आहे, ह्मणून मनुष्याची नजर नेहमीं बाहेरच्या वस्तूंकडे असते व ती अंतरात्म्याकडे

जात नाहीं. पण कांहीं सुज्ञ लोकांनीं आपली दृष्टि अंतर्मुख करून व अंतरात्म्यास पाहून इच्छेप्रमाणें मुक्ति मिळविली आहे। कृतकर्मानें मनुष्यास जे जे लोक प्राप्त होतात त्यांच्या विनाशीपणाचा विचार करून ब्रह्मवेत्त्या मनुष्यानें अथवा ब्राह्मणानें त्यांविषयी विरक्त व्हावें व कोणतीहि असृष्ट अथवा स्वयंभू वस्तु कर्मानें प्राप्त होत नाहीं ह्याविषयीं खातरजमा करून घ्यावी। ती करून घेण्याकरितां त्यानें आपल्या हातांत समिधा घेऊन वेदवित् व ब्रह्मवित् जो कोणी गुरु असेल त्याकडे जावें। असें केल्याशिवाय निरिच्छ मनुष्यही अंतरात्म्याचें श्रवण, मनन व निदिध्यास करण्यास पात्र होत नाहीं. अज्ञान हें सर्व बंधाचें मूळ आहे। इष्ट हेतु साधावे ह्मणून तेंच अज्ञान मनुष्यास कर्मं करावयास लावितें। अंतरात्म्याचें ज्ञान झालें कीं त्या अज्ञानाचा समूळ उच्छेद होतो। श्रुति ह्मणतात कीं "जो हें अद्वैत अथवा ऐक्य पाहतो त्यास माया किंवा दुःखयाची बाधा होत नाहीं"। 'ज्यास आत्मज्ञान झालें त्यास दुःखाची बाधा होत नाहीं'। 'जो खालीं व वर आहे तो पाहिल्याबरोबर हृदयाच्या ग्रंथीचा भेद होतो व सर्व संशयांचा उच्छेद होतो व झाडून सर्व कर्मांचा नाश होतो'।

कर्माशीं ज्ञानाची देखील सांगड घातली तरी हेंच कार्य होईल असें कोणी आग्रहपूर्वक ह्मणेल तर तसें होणार नाहीं असें त्यास आमचें तसेंच उत्तर आहे। कारण अशा सांगडीचा परिणाम निराळाच होतो असें वाजसनेयकांत दाखविलें आहे। त्यांत असें सांगितलें आहे कीं 'पुत्राच्या योगानें हा लोक मिळतो तो दुसऱ्या साधनांनीं मिळत नाहीं, 'कर्मानें पितृलोक प्राप्त होतो, व 'ज्ञानानें स्वर्गलोक प्राप्त होतो; याप्रमाणें या क्रियांनीं आत्म्याहून जे भिन्न लोक आहेत ते कसे प्राप्त होतात हें उघड होतें। त्यांतच पुढें फलासक्तिविरहित संसार अथवा संन्यास याचें महत्व दाखविलें आहे. 'हे लोक ह्मणजे कांहीं आत्मा नव्हे तेव्हां आपल्यास संतति

मिळवून काय करावयाचें बरें? '। ह्या वचनाचा मथितार्थ एवढाच कीं आपण मुलें, कर्में व कर्मसहित ज्ञान यांविषयीं आसक्ति ठेवूं नये, कारण त्यांनीं अनुक्रमें मृत्युलोक, पितृलोक व देवलोक प्राप्त होतात व त्यांनीं आपल्यास आत्म्याचा जो लोक पाहिजे असतो तो तर आपणास मुळींच प्राप्त होत नाहीं। वरील उपायांनीं जे पहिले तीन लोक प्राप्त होतात ते विनाशी आहेत ह्मणून ते आह्मास इष्ट नाहींत। जो लोक स्वभावज, स्वयंभू, असृष्ट, अविनाशी, अमर्त्य, भीतिरहित, कर्मानें क्षयवृद्धि न पावणारा व अनाद्यनंत असा आहे तोच फक्त आह्मांस इष्ट आहे व तो अज्ञान घालविण्याच्या उपायाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि उपायानें साधतां येण्यासारिखा नाहीं। ह्मणून आपल्या ब्रह्मरूप अंतरात्म्याचें ज्ञान प्रथम करून घेऊन आपण सर्व इच्छांच्या परित्यागाचें व्रत सुदृढतेनें चालवावें। दुसरें कारण असें आहे कीं अंतरात्म्याचें ज्ञान कर्मास विरुद्ध असतें ह्मणून तें कर्माबरोबरच चालवितां येत नाहीं। ब्रह्मज्ञान हें मनुष्याच्या प्रयत्नांनींच होतें असें नाहीं। बाहेरील साधनांच्या योगानें जीं दृश्य व अदृश्य फळें प्राप्त होतात त्यांस कोणी एक पुरुष कंटाळून ब्रह्मज्ञान मिळविण्याविषयीं उत्कंठित झाला आहे।त्याचें वर्णन श्रुतींतील पुढील केनेषितमादिकरून मंत्रांत दिलें आहे।ब्रह्मज्ञानाचा विषय फार सूक्ष्म आहे, तो सामान्य बुद्धीच्या मनुष्यास समजत नाहीं। ह्मणून त्यांत त्याचें विवरण गुरु व शिष्य यांत झालेल्या प्रश्नोत्तररूपानें दिलें आहे। आणखीं हेंहि स्पष्ट सांगून ठेविलें पाहिजे कीं तर्कशास्त्रानुरोधें कितीहि वादविवाद केले तरी त्यानींच केवळ तें ज्ञान प्राप्त होत नाहीं। श्रुतींत असें ह्मटलें आहे कीं ' तार्किक वादविवादानीं ही मनाची स्थिति प्राप्त होणें शक्य नाहीं ' ' जो गुरूजवळ बसून शिकतो त्यासच तें प्राप्त होतें ' ' गुरूजवळ शिकून जें ज्ञान प्राप्त होतें तेणेंकरूनच कल्याण होतें। ' स्मृतींत असेंहि ह्मटलें आहे कीं ' तें प्रणिपातपूर्वक

शिकावें '। ह्मणून हें अनुमानानें जाणण्यासारिखेंच आहे कीं कोणा एकास अंतरात्म्याशिवाय आपल्यास कोणाचा आश्रय नाहीं असें वाटून व भीतिरहित,अनाद्यनंत, शान्त,व कंपरहित असा आश्रा मिळविण्यास उत्सुक होऊन तो एका ब्रह्मवेत्त्या गुरूजवळ उपदेशार्थ यथाशास्त्र आला आहे व त्यानें ' केनेषितमादिकरून ' मंत्रद्वारा त्यास त्याचें विवरण करण्याविषयीं परिप्रश्न केले आहेत ।

ॐ तत् सत् ।

सहनाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु माविद्विषावहै ॥

ॐ शांन्तिः । शान्तिः । शान्तिः ।

अर्थः–ब्रह्म आमचें दोघांचें रक्षण करो। ब्रह्म आमचा दोघांचा उपभोग घेवो।आपण दोघे एकत्र काम करूं। आह्मां दोघांकडून तेजस्वी ब्रह्माचा अभ्यास होवो।आपणां दोघांमध्यें बेकी नसो ।

आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ।

अर्थः–माझे अवयव, वाणी, प्राण, डोळ,कान, बल व सर्व इंद्रियें सशक्त होवोत । प्रत्येक वस्तु उपनिषदोक्त ब्रह्मरूप आहे । माझ्याकडून ब्रह्म कधींही अमान्य न होवो । ब्रह्महि मला कधीं न धिक्कारो । ब्रह्माची अमान्यता नसो। ब्रह्माकडून धिक्कार न होवो । आत्मानंदांत निमग्न असणारा जो मी त्या माझ्याठायीं उपनिषदांत सांगितलेले सर्व धर्म व नीति हीं लीन होवोत । तीं माझ्या ठिकाणीं लय पावोत ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ।

ॐ

अथ केनोपनिषत्।

सामवेदीय-तलवकारशाखा-न्तर्गता ॥

केनेषितं पतति प्रेषितं मनः । केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः । केनेषितां वाचमिमां वदन्ति चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥ १ ॥

पदं-केन। इषितम्। पतति। प्रेषितम्। मनः। केन। प्राणः। प्रथमः। प्रैति। युक्तः। केन। इषिताम्। वाचम्। इमाम्। वदन्ति। चक्षुः। श्रोत्रम्। कः। उ। देवः। युनक्ति ॥ १ ॥

अन्वय व अर्थः-विद्यार्थी गुरूस विचारितोः-(केन प्रेषितम् मनः इषितम् पतति) (केन) कोणाकडून (प्रेषितम् मनः) प्रेरणा पावलेलें मन (इषितम्) इष्ट विषयाला (पतति) प्राप्त होतें। (केन युक्तः प्रथमः प्राणः प्रैति) (केन) कोणाकडून (युक्तः प्रथमः प्राणः) आपआपल्या कामांत योजला गेलेला व नाक, डोळे, कान, तोंड वगैरे मध्यें पसरलेला प्राण-वायु (प्रैति) आपलें काम करीत राहतो। (केन इषिताम् इमाम् वाचम् वदन्ति) (केन) कोणाकडून (इषिताम् इमाम् वाचम्) नियमन

केलेली व कानांनीं प्रत्यक्ष ऐकावयास येणारी ही वाणी (वदन्ति) मनुष्यें बोलतात । (उ कः देवः चक्षुः श्रोत्रम् युनक्ति) (उ कः देवः) आणि कोणता देव (चक्षुः श्रोत्रम्) डोळे व कान यांस (युनक्ति) आपआपले नियमित विषय ग्रहण करण्याची शक्ति देतो । ह्मणजे कानांनीं ऐकावें, डोळ्यांनीं पाहावें पण त्यांनीं तदितर व्यापार करूं नयेत असा निर्बंध कोणीं घातला आहे ॥ १ ॥

अर्थः—विद्यार्थी गुरूस विचारितो—कोणाकडून प्रेरणा पावलेलें मन इष्टविषयाला प्राप्त होतें । कोणाकडून आपआपल्या कामांत योजला गेलेला व नाक, डोळे, कान, तोंड वगैरे मध्यें पसरलेला प्राणवायु आपलें काम करीत राहतो । कोणाकडून नियमन केलेली व कानांनीं प्रत्यक्ष ऐकावयास येणारी ही वाणी मनुष्यें बोलतात । आणि कोणता देव डोळे व कान यांस आपआपले विषय ग्रहण करण्याची शक्ति देतो । ह्मणजे कानानीं ऐकावें, डोळ्यांनीं पहावें, पण त्यांनीं तदितर व्यापार करूं नयेत असा निर्बंध कोणीं घातला आहे ॥ १ ॥

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः । चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २ ॥

पदें—श्रोत्रस्य । श्रोत्रम् । मनसः । मनः । यत् । वाचः । ह । वाचम् । सः । उ । प्राणस्य । प्राणः । चक्षुषः। चक्षुः। अतिमुच्य। धीराः। प्रेत्य । अस्मात् । लोकात्। अमृताः । भवन्ति ॥ २ ॥

अन्वय व अर्थः—गुरु उत्तर देतात—(यत् श्रोत्रस्य

श्रोत्रम्) (यत्) जें (श्रोत्रस्य श्रोत्रम्) कानास ऐकण्याची शक्ति देणारें आहे । (यत् मनसः मनः) (यत्) जें (मनसः मनः) मनाला मनन करण्याची शक्ति देणारें आहे । (यत् वाचः ह वाचम्) (यत्) जें (वाचः ह वाचम्) वाणीला बोलण्याची शक्ति देतें । (सः उ प्राणस्य प्राणः) (सः उ) तोच देव (प्राणस्य प्राणः) प्राणवायूचा चालक आहे । (सः उ चक्षुषः चक्षुः) (सः उ) तोच देव (चक्षुषः चक्षुः) डोळ्याला पाहण्याची शक्ति देणारा आहे । ह्मणून (अतिमुच्य धीराः अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति) (अतिमुच्य) त्यांची जीवंतपणांतच आसक्ति सोडून (धीराः) शहाणे लोक (अस्मात् लोकात्) ह्या प्रत्यक्ष लोकापासून (प्रेत्य) देहांस प्रेतरूप टाकून गेल्यावर (अमृताः) मुक्त (भवन्ति) होतात ॥ २ ॥

अर्थः—गुरु उत्तर देतातः—जें कानास ऐकण्याची शक्ति देणारें आहे। जें मनाला मनन करण्याची शक्ति देणारें आहे। जें वाणीला बोलण्याची शक्ति देतें । तोच देव प्राणवायूचा चालक आहे। तोच देव डोळ्याला पाहण्याची शक्ति देणारा आहे। ह्मणून त्यांची जीवंतपणांतच आसक्ति सोडून शहाणे लोक ह्या प्रत्यक्ष लोकापासून देहांस टाकून गेल्यावर मुक्त होतात ॥ २ ॥

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनो न विद्मो न विजानीमो यथैतदनु शि[1]ष्यादन्यदेव तद्विदिता

---

१ श्रीमच्छंकराचार्यांच्या पाठाप्रमाणें:—अनुशि ष्यात् ।

दथो अविदितादधि । इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्
व्द्याचचक्षिरे ॥ ३ ॥

पदें-न । तत्र । चक्षुः । गच्छति । न । वाक् । गच्छति । नो । मनः । न । विद्मः । न । विजानीमः । यथा । एतत् । अनुशिष्यात् । अन्यत । एव । तत । विदितात् । अथो । अविदितात् । अधि । इति । शुश्रुम । पूर्वेषाम् । ये । नः । तत् । व्याचचक्षिरे ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः-(तत्र चक्षुः न गच्छति) (तत्र) तेथें त्या ब्रह्मापत (चक्षुः) डोळा (न गच्छति) जाऊं शकत नाहीं । (तत्र वाक् न गच्छति) (तत्र) त्या ब्रह्माच्या ठिकाणीं (वाक्) वाणी (न गच्छति)जाऊं शकत नाहीं । (तत्र नो मनः) (तत्र) त्या ब्रह्माच्या ठिकाणीं (नो मनः) मन देखील जाऊं शकत नाहीं । ह्मणून (न विद्मः) आह्मी तें ब्रह्म इंद्रियांनीं सामान्यत्वें-करून जाणत नाहीं । (न विजानीमः) व त्या ब्रह्माचें आह्मांस विशेष ज्ञान झालेलें नाहीं। (यथा अनु शिष्यात्) कीं तें इंद्रियांपलीकडील ब्रह्म आह्मास शिष्यपरंपरेनें तुला इंद्रियगोचर करितां येईल । कारण-(तत् विदितात् अन्यत् एव) (तत्) तें (विदितात्) इंद्रियांनीं समजणाऱ्या वस्तूंहून (अन्यत् एव) अगदीं निराळें आहे । (अथो अविदितात् अधि) (अथो) तसेंच तें ब्रह्म (अविदितात् अधि) इंद्रियांनीं समजल्या जाणाऱ्या वस्तूंच्या

वर आहे। (ये नः तत् व्याचचक्षिरे) (ये) ज्या आचार्यांनीं (तत् नः व्याचचक्षिरे) आह्मास त्या ब्रह्माचा उपदेश केला–(पूर्वेषाम् इति शुश्रुम) (पूर्वेषाम्) त्या पूर्वीं होऊन गेलेल्या आचार्यांचें (इति) असें वचन (शुश्रुम) आह्मीं ऐकिलें आहे । ह्मणजे तें ब्रह्म गुरू-पासून शिक्षण मिळविल्यानें समजण्यासारिखें आहे। केवळ यज्ञयाग, तपश्चर्या, मोठी विद्या, बुद्धिमत्ता, विवरण, व तर्कवितर्क यांच्या साहाय्यानें तें समजण्यासारिखें नाहीं ॥ ३ ॥

अर्थः—तेथें त्या ब्रह्माप्रत डोळा जाऊं शकत नाहीं । त्या ब्रह्माच्या ठिकाणीं वाणी जाऊ शकत नाहीं । त्या ब्रह्माच्या ठिकाणीं मन देखील जाऊं शकत नाहीं । ह्मणून आह्मी तें ब्रह्म सामान्यत्वेंकरूनहि इंद्रियांनीं जाणत नाहीं । व त्या ब्रह्माचें आह्मांस विशेष ज्ञान झालेलें नाहीं । अशा रीतीनें कीं तें इंद्रियांपलीकडील ब्रह्म आह्मास तुला शिष्यपरंपरेनें इंद्रिय-गोचर करितां येईल । कारण तें इंद्रियांनीं समजणाऱ्या वस्तूं-हूंन अगदीं निराळें आहे । तसेंच तें ब्रह्म इंद्रियांनीं समजल्या जाणाऱ्या वस्तूंच्या वर आहे । ज्या आचार्यांनीं आह्मास त्या ब्रह्माचा उपदेश केला त्या पूर्वीं होऊन गेलेल्या आचार्यांचें असें वचन आह्मीं ऐकिलें आहे । ह्मणजे तें ब्रह्म गुरूपासून शिक्षण मिळविल्यानें समजण्यासारिखें आहे । तें केवळ यज्ञ-याग, तपश्चर्या, मोठी विद्या, बुद्धिमत्ता, विवरण व तर्कवितर्क यांच्या साह्यानें समजण्यासारिखें नाहीं ॥ ३ ॥

यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ४ ॥

पदें–यत् । वाचा । अनभ्युदितम् । येन । वाक् । अभ्युद्यते । तत् । एव । ब्रह्म । त्वम् । विद्धि । न । इदम् । यत् । इदम् । उपासते ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः-(यत् वाचा अनभ्युदितम्) (यत्) जें (वाचा) वाणीनें (अनभ्युदिम्) बोलून दाखवितां येत नाहीं । (येन वाक् अभ्युद्यते) (येन) ज्याच्या योगानें (वाक्) वाणी (अभ्युद्यते) सुबोध व सुप्रकाशित होते । (तत् एव ब्रह्म त्वम् विद्धि) (तत् एव) तेंच (ब्रह्म) ब्रह्म होय असें (त्वम्) तूं (विद्धि) जाण । (यत् इदम् उपासते) ज्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात (तत् इदम् न) तें हें ब्रह्म नव्हे [१] ॥ ४ ॥

अर्थः--जें वाणीनें बोलून दाखवितां येत नाहीं। पण ज्याच्या योगानें वाणी सुबोध व सुप्रकाशित होते । तेंच ब्रह्म होय असें तूं जाण । ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात तें हें ब्रह्म नव्हे ॥ ४ ॥

यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ५ ॥

---

१ ह्या व पुढील मंत्रावरून ह्या उपनिषदाच्या वेळीं पंचमहाभूतें, मूर्ति किंवा असले नामरूपधारी पदार्थ यांची पूजा हल्लींप्रमाणें सामान्य लोकांत रूढ होती असें दिसतें ।

पदें-यत् । मनसा । न । मनुते । येन । आहुः । मनः । मतम् । तत् । एव । ब्रह्म । त्वम् । विद्धि । न । इदम् । यत् । इदम् । उपासते ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः-(यत् मनसा न मनुते) (यत्) जें (मनसा) मनानें (न मनुते) मनन करीत नाहीं । (येन मनः मतम्) (येन) ज्याच्या कडून (मनः) मनाला (मतम्) मनन करण्याची शक्ति प्राप्त होते । (आहुः) असें मोठमोठे ब्रह्मवेत्ते ह्मणतात । (तत् एव ब्रह्म त्वं विद्धि) (तत् एव) तेंच (ब्रह्म) ब्रह्म होय असें (त्वं) तूं (विद्धि) जाण । (यत् इदम् उपासते) (यत् इदम्) ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची (उपासते) लोक उपासना करितात । (इदम् न)(इदम्) तें हें (न) ब्रह्म नव्हे ॥ ५ ॥

अर्थः---जें मनानें मनन करीन नाहीं । पण ज्याच्याकडून मनाला मनन करण्याची शक्ति प्राप्त होते । असें मोठमोठे ब्रह्मवेत्ते ह्मणतात । तेंच ब्रह्म होय असें तूं जाण । ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात तें हें ब्रह्म नव्हे ॥ ५ ॥

यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ६ ॥

पदें-यत् । चक्षुषा । न । पश्यति । येन । चक्षूंषि । पश्यति । तत् । एव । ब्रह्म । त्वम् । विद्धि । न । इदम् । यत् । इदम् । उपासते ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः–(यत्[१] चक्षुषा न पश्यति) (यत्) जें (चक्षुषा) डोळ्यानें (न पश्यति) पाहत नाहीं। किंवा जें कोणी पहात नाहीं। (येन चक्षूंषि पश्यति) (येन) ज्याच्यायोगानें (चक्षूंषि) डोळे (पश्यति) पाहतात। (तत् एव ब्रह्म त्वम् विद्धि) (तत् एव) तेंच (ब्रह्म) ब्रह्म होय असें (त्वम्) तूं (विद्धि)जाण। (यत् इदम् उपासते) (यत् इदम्) ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची (उपासते) लोक उपासना करितात। (इदम् न) (इदम्) तें हें (न) ब्रह्म नव्हे ॥ ६ ॥

अर्थः—जें डोळ्यानें पाहत नाहीं किंवा जें कोणी पाहत नाहीं। ज्याच्या योगानें डोळे पाहतात। तेंच ब्रह्म होय असें तूं जाण। ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात। तें हें ब्रह्म नव्हे ॥ ६ ॥

यच्छ्रोत्रेण न शृणोति येन श्रोत्रमिदं श्रुतम्।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ७ ॥

पदें–यत्। श्रोत्रेण। न। शृणोति। येन। श्रोत्रम्। इदम्। श्रुतम्। तत्। एव। ब्रह्म। त्वम्। विद्धि। न। इदम्। यत्। इदम्। उपासते ॥ ७ ॥

अन्वय व अर्थः–(यत्[२] श्रोत्रेण न शृणोति) (यत्) जें (श्रोत्रेण) कानानें (न शृणोति) ऐकत नाहीं किंवा जें कोणीहि ऐकत नाहीं। (येन इदम् श्रुतम्) (येन)

---

१ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें।

२ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें।

पण ज्याच्याकडून (इदम्) हा कान (श्रुतम्) ऐकण्याची शक्ति मिळवितो) (तत् एव ब्रह्म त्वम् विद्धि) (तत् एव) तेंच (ब्रह्म) ब्रह्म होय असें (त्वम्) तूं (विद्धि) जाण। (यत् इदम् उपासते) (यत् इदम्) ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची (उपासते) लोक उपासना करितात। (इदम् न) (इदम्) तें हें (न) ब्रह्म नव्हे ॥ ७ ॥

अर्थः—जें कानानें ऐकत नाहीं किंवा जें कोणीहि ऐकत नाहीं । पण ज्याच्याकडून हा कान ऐकण्याची शक्ति मिळवितो । तेंच ब्रह्म होय असें तूं जाण। ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात । तें हें ब्रह्म नव्हे ॥ ७ ॥

यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्रणीयते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ८ ॥

पदें–यत् । प्राणेन । न । प्राणिति । येन । प्राणः । प्रणीयते । तत् । एव । ब्रह्म । त्वम् । विद्धि । न । इदम् । यत् । इदम् । उपासते ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः–(यत् प्राणेन न प्राणिति) (यत्) जें (प्राणेन) प्राणवायूनें (न प्राणिति) श्वासोच्छ्वास करीत नाहीं । किंवा कोणीहि श्वासोच्छ्वासानें आंत बाहेर टाकीत नाहीं । (येन प्राणः प्रणीयते) (येन) पण ज्याच्या योगानें (प्राणः) प्राणवायु हा (प्रणीयते) श्वासोच्छ्वास करण्याची शक्ति मिळवितो। (तत् एव ब्रह्म त्वम् विद्धि) (तत् एव) तेंच (ब्रह्म) ब्रह्म होय असें(त्वं) तूं

(विद्धि) जाण । (यत् इदम् उपासते) (यत् इदम्) ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची (उपासते) लोक उपासना करितात । (इदम् न) (इदम्) तें हें (न) ब्रह्म नव्हे ॥ ८ ॥

अर्थः—जें प्राणवायूनें-श्वासोच्छ्वास करीत नाहीं किंवा कोणीहि श्वासोच्छ्वासा बरोबर आंत बाहेर टाकीत नाहीं। पण ज्याच्या योगानें प्राणवायु हा श्वासोच्छ्वास करण्याची शक्ति मिळवितो, तेंच ब्रह्म होय असें जाण । ज्या ह्या नामरूपात्मक इंद्रादि देवांची लोक उपासना करितात। तें हें ब्रह्म नव्हे ॥ ८ ॥ ॥ इति प्रथमः खण्डः ॥

यदि मन्यसे सुवेदेति दभ्रमेवापि[1] नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपम् । यदस्य त्वं यदस्य देवेष्वथ नु मीमांस्यमेव ते मन्ये विदितम् ॥ ९ ॥ १ ॥

पदें—यदि । मन्यसे । सुवेद । इति । दभ्रम् । एव । अपि । नूनम् । त्वम् । वेत्थ । ब्रह्मणः । रूपम् । यत् । अस्य । त्वम् । यत् । अस्य । देवेषु । अथ । नु । मीमांस्यम् । एव । ते । मन्ये । विदितम् ॥ ९ ॥ १ ॥

अन्वय व अर्थः—आचार्य ह्मणतातः—(यदि सुवेद) (यदि) जर (सुवेद) मला ब्रह्माचें स्वरूप चांगलें समजलें (इति मन्यसे) (इति) असें (मन्यसे) तूं मानितोस । फार तर काय पण (त्वम्[2] ब्रह्मणः दभ्रम् एव

---

१ श्रीमच्छंकराचार्यांच्या पाठाप्रमाणें । दहरमेवापि।ह्मणजे थोडेंच.

२ कोणी ह्याच पदांचा अन्वय व अर्थ पुढील प्रमाणें करितातः—(त्वम् ब्रह्मणः रूपम् दभ्रम् एव नूनम् वेत्थ)—तर—(ब्रह्मणःरूपम्)—ब्रह्माचें रूप—(त्वम्)—तूं (दभ्रम् एव) अगदींच थोडें—(नूनम्)—खरोखर (वेत्थ)—जाणतोस ।

रूपम् नूनम् वेत्थ) (त्वम्) तूं (ब्रह्मणः दभ्रम् एव रूपम्) ब्रह्माचें सूक्ष्म देखील रूप) (नूनम्) खरोखर (वेत्थ) जाणतोस । तर (यत् अस्य त्वम्) (यत्) जें (अस्य) ह्या ब्रह्माचें स्वरूप (त्वम्) तूं जाणतोस। व (यत् अस्य देवेषु) (यत्) जें (अस्य) ह्या ब्रह्माचें स्वरूप (देवेषु) देवांमध्यें ज्ञात आहे । (अथ नु ते विदितम् मीमांस्यम् एव) (अथ नु ते विदितम्) ह्या दोहोंत खरोखर तुझें ब्रह्माचें ज्ञान (मीमांस्यम् एव) मीमांस्य ह्मणजे तर्कवितर्कांनीं विचार करण्यास योग्य आहे असें (मन्ये) मी मानितों ॥ ९ ॥ १ ॥

अर्थः—जर मला ब्रह्माचें रूप चांगलें समजलें असें तूं मानितोस। फार तर काय पण ब्रह्माचें सूक्ष्म देखील रूप तूं खरोखर जाणतोस । तर जें ह्या ब्रह्माचें स्वरूप तूं जाणतोस व जें ह्या ब्रह्माचें स्वरूप देवांमध्यें किंवा ब्रह्मवेत्त्यांमध्यें[1] ज्ञात आहे । ह्या दोहोंत खरोखर तुझें ब्रह्माचें ज्ञान मीमांस्य ह्मणजे तर्कवितर्कांनीं विचार करण्यास योग्य आहे । असें मी मानितों ॥ ९ ॥ १ ॥

नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च ।
यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च ॥ १० ॥२॥

पदें—न । अहम् । मन्ये । सुवेद । इति । नो । न । वेद । इति । वेद । च । यः । नः । तत् । वेद ।

---

१ ब्रह्मवेत्त्यांमध्यें ।

२ हा सगळा मंत्र दुर्बोध आहे—त्याचा अर्थ सरळ लागत नाहीं ।

तत् । वेद । नो । न । वेद । इति । वेद । च ॥१०॥२॥

अन्वय व अर्थः-शिष्य ह्मणतो-(अहम् सुवेद) (अहम्) मी (सुवेद) ब्रह्म चांगल्या प्रकारें जाणलें। (इति न मन्ये) (इति) असें (न मन्ये) मी मानीत नाहीं। (न वेद) मी त्या ब्रह्माचें स्वरूप जाणत नाहीं (इति नो) (इति) असें (नो) नाहीं। तर (वेदच) ब्रह्म आहे असें मी जाणतों। "नो न वेदेति वेद च" हें (तत् नः यः वेद) तें पूर्वोक्त वचन (नः यः) आह्मा शिष्यमंडळीपैकीं (यः) ज्यानें (वेद) जाणिलें आहे (तत् वेद) त्यानें (तत्) तें ब्रह्म (वेद) जाणिलें असें समजावें ॥ १० ॥ २ ॥

अर्थः—शिष्य ह्मणतोः-मीं ब्रह्म चांगल्या प्रकारें जाणलें असें मी मानीत नाहीं। मी त्या ब्रह्माचें स्वरूप जाणत नाहीं असें नाहीं। तर ब्रह्म आहे असें मी जाणतों। "नो न वेदेति वेद च" हें तें पूर्वोक्त वचन आह्मां शिष्यमंडळीपैकीं ज्यानें जाणिलें आहे। त्यानें तें ब्रह्म जाणिलें। असें समजावें ॥ १० ॥ २॥

यस्यामतं तस्य मतं यस्य न वेद सः । अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥ ११ ॥ ३ ॥

पदें—यस्य। अमतम्। तस्य। मतम । यस्य। न। वेद। सः। अविज्ञातम्। विजानताम्। विज्ञातम्। अविजानताम् ॥ ११ ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ–(यस्य अमतम्) (यस्य) ज्याची समजूत अशी आहे कीं (अमतम्) ब्रह्म हें मनानें जाणिलें जात नाहीं (तस्य मतम्) त्याला ब्रह्माचें ज्ञान बरोबर झालें असें समजावें। पण (यस्य मतम्) (यस्य) ज्याची समजूत अशी आहे कीं (मतम्) मन आदिकरून इंद्रियांनीं ब्रह्म गोचर होतें अथवा ब्रह्म व मन किंवा बुद्धि एकच आहेत असें जो समजतो (सः न वद) (सः) त्याला (न वेद) ब्रह्म समजलें नाहीं असें समजावें। (विजानताम् अविज्ञातम्) (विजानताम्) विशेष ज्ञान आह्मांस आहे असा अभिमान बाळगणारांस (अविज्ञातम्) तें ब्रह्म समजत नाहीं। (अविजानताम्) विज्ञातम् (अविजानताम्) विशेष ज्ञानाची घमेंड ज्यांनीं सोडिली आहे त्यांस (विज्ञातम्) त्या ब्रह्माचें विशेष ज्ञान झालें आहे असें समजावें ॥ ११ ॥ ३ ॥

अर्थः—ज्याची समजूत अशी आहे कीं ब्रह्म हें मनानें जाणिलें जात नाहीं। त्याला ब्रह्माचें ज्ञान बरोबर झालें असें समजावें। पण ज्याची समजूत अशी आहे कीं मन आदिकरून इंद्रियांनीं ब्रह्म गोचर होतें। किंवा ब्रह्म व मन किंवा बुद्धि एकच आहेत असें जो समजतो। त्याला ब्रह्म समजलें नाहीं असें समजावें। विशेष ज्ञान आह्मांस आहे असा अभिमान बाळगणारांस तें ब्रह्म समजत नाहीं। विशेष ज्ञानाची घमेंड ज्यांनीं सोडिली आहे। त्यांस त्या ब्रह्माचें विशेष ज्ञान झालें आहे-असें समजावें ॥ ११ ॥ ३ ॥

प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते । आत्मना विन्दते वीर्य्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥ १२ ॥ ४ ॥

पदें–प्रतिबोधविदितम् । मतम् । अमृतत्वम् । हि । विन्दते । आत्मना । विन्दते । वीर्य्यम् । विद्यया । विन्दते । अमृतम् ॥ १२ ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ–(प्रतिबोध[1]विदितम् मतम्) (प्रतिबोधविदितम्) जीवशिवाच्या ऐक्यानें झालेल्या प्रतिबोधानें जाणल्या गेलेल्या ज्ञानास किंवा[2] ब्रह्म सर्व प्रकारच्या ज्ञानाचें साक्षी होय अशा ज्ञानास (मतम्) खरें ब्रह्मज्ञान असें समजतात । (हि अमृतत्वम् विन्दते) (हि) कारण अशा प्रकारें ज्ञानी झालेले पुरुष (अमृतत्वम्) ज्यांत मरणाची भीति नाहीं अशा जीवन्मुक्त स्थितीस (विन्दते) प्राप्त होतात (आत्मना वीर्यम्[3] विन्दते) (आत्मना) ते आपल्या आत्म्याच्या साहाय्यानें (वीर्यम्) योगबल (विन्दते) मिळवितात । व (वि-

---

१. ज्या बुद्धीच्या योगानें विषयांच्या नामरूपादि गुणांचें आकलन होतें तीस 'बोध' असें ह्मणतात. बुद्धिजवळ हे गुण आणून पोहोंचविण्याचें काम इंद्रियें करीत असतात. त्यांस विषयांपासून दूर राखून त्यांचा अंतः करणांत संयम केला ह्मणजे त्या स्थितीस समाधि असें ह्मणतात. ह्या स्थितींत मनाची एकाकार स्थिति होते व त्यांत विचारांच्या लाटा उठेनाशा होतात व जीवात्मा व परमात्मा ह्यांचा संयोग होतो । मनुष्याच्या मस्तकरूप 'क्यामेरावर' समाधिरूप काळें फडकें घालून जीवात्मारूप 'फोकस' परमात्मारूप चित्र घ्यावयाच्या वस्तूकडे नीट लागला ह्मणजे क्यामेरांतील मनाच्या चौकटींत बसविलेलें बुद्धिरूप भिंग इष्ट ज्ञानरूप किरणांच्या चित्रविचित्र 'शेडी' भराभर घेऊं लागतें. त्या शेडींस प्रतिबोध असें ह्मणतात । या प्रतिबोधानें जें विदित ह्मणजे समजलेलें ज्ञान तें प्रतिबोधविदितज्ञान । २ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें ।

३ नास्ति सांख्यसमं ज्ञानम् । न योगसमं बलम् ।

द्यया अमृतम् विन्दते) (विद्यया) ते ब्रह्मविद्येच्या योगानें (अमृतम्) जन्ममरणाच्या दुःखापासून अलग अशा मुक्तीस (विन्दते) मिळवितात ॥ १२ ॥ ४ ॥

अर्थः—जीवशिवाच्या ऐक्यानें झालेल्या प्रतिबोधानें जाणल्या गेलेल्या ज्ञानास किंवा ब्रह्म सर्व प्रकारच्या ज्ञानाचें साक्षी होय अशा ज्ञानास खरें ब्रह्मज्ञान असें समजतात। कारण अशा प्रकारें ज्ञानी झालेले पुरुष जींत मरणाची भीती नाहीं अशा जीवन्मुक्त स्थितीस प्राप्त होतात । ते आपल्या आत्म्याच्या सहाय्यानें योगबळ मिळवितात। व ब्रम्हविद्येच्या योगानें जन्ममरणाच्या दुःखापासून अलग अशा मुक्तीस मिळवितात ॥ १२ ॥ ४ ॥

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति न चेदिहावेदीन्महती विनष्टिः । भूतेषु भूतेषु विचिन्त्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ १३ ॥ ५ ॥

पदें—इह । चेत् । अवेदीत् । अथ । सत्यम् । अस्ति । न । चेत् । इह । अवेदीत् । महती । विनष्टिः । भूतेषु । भूतेषु । विचिन्त्य । धीराः । प्रेत्य । अस्मात् । लोकात् । अमृताः । भवन्ति ॥ १३ ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः—(इह चेत् अवेदीत्) (इह) ह्या जन्मांत (चेत्) जर (अवेदीत) आत्मज्ञान करून घेतलें (अथ सत्यम् अस्ति) (अथ) तर (सत्यम्) मनुष्य जन्माचें सार्थक (अस्ति) होय । (इह चेत् न अवेदीत्)(इह) ह्या जन्मांत (चेत्) जर (न अवे-

दीत्) ब्रह्मज्ञान करून घेतलें नाहीं तर (महती विनष्टिः) मोठी सुखाची हानी होते । ह्मणून (धीराः भूतेषु भूतेषु विचिन्त्य) (धीराः) शहाणे लोक (भूतेषु भूतेषु) ह्या एकंदर चराचर सृष्टीविषयीं (विचिन्त्य) विशेष विचारानें आत्मज्ञान करून घेऊन (अस्मात् लोकात् प्रेत्य) (अस्मात् लोकात्) ह्या लोकापासून (प्रेत्य) देहास सोडून गेल्यावर (अमृताः भवन्ति) (अमृताः) जन्ममरणाच्या दुःखापासून मुक्त(भवन्ति)होतात ॥१३॥५॥

अर्थः—ह्या जन्मांत जर आत्मज्ञान करून घेतलें तर मनुष्यजन्माचें सार्थक होय। ह्या जन्मांत जर ब्रह्मज्ञान करून घेतलें नाहीं तर सुखाची मोठी हानी होते । ह्मणून शहाणे लोक ह्या एकंदर चराचर सृष्टीविषयीं विशेष विचारानें आत्मज्ञान करून घेऊन ह्या देहास सोडून गेल्यावर जन्ममरणाच्या दुःखापासून मुक्त होतात ॥ १३ ॥ ५ ॥

इति द्वितीयः खंडः ॥

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त । त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥ १४ ॥ १ ॥

पदें—ब्रह्म । ह । देवेभ्यः । विजिग्ये । तस्य । ह । ब्रह्मणः । विजये । देवाः । अमहीयन्त । ते । ऐक्षन्त । अस्माकम् । एव । अयम् । विजयः । अस्माकम् । एव । अयम् । महिमा । इति ॥ १४ ॥ १

अन्वय व अर्थः—नंतर गुरुजी एक आख्यायिका

सांगतातः-(ह ब्रह्म देवेभ्यः विजिग्ये) (ह) खरोखर (ब्रह्म) ब्रह्मानें (देवेभ्यः) देवांसाठीं (विजिग्ये) विजय मिळविला। (तस्य ह ब्रह्मणः विजये देवाः अमहीयन्त) (तस्य ह ब्रह्मणः विजये) त्या ब्रह्माचाच वास्तविक जय झाला असतां (देवाः) देव (अमहीयन्त) गर्वानें फुगले । व (ते ह ऐक्षन्त) (ते) ते देव (ह) खरोखर (ऐक्षन्त) मानूं लागले कीं (अस्माकम् एव अयम् विजयः) (अस्माकम् एव) आमचाच केवळ (अयम् विजयः) हा जय होय (अस्माकम् एव अयम् महिमा इति) (अस्माकम् एव) आमचाच केवळ (अयम् महिमा इति) हा मोठेपणा होय ॥ १४ ॥ १ ॥

अर्थः—नंतर गुरुजी एक आख्यायिका सांगतातः—खरोखर ब्रह्मानें देवांसाठीं विजय मिळविला । त्या ब्रह्माचाच वास्तविक जय झाला असतां देव गर्वानें फुगले । व ते देव खरोखर मानूं लागले कीं, आमचाच केवळ हा जय होय । आमचाच केवळ हा मोठेपणा होय ॥ १४ ॥ १ ॥

तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानन्त किमिदं यक्षमिति ॥ १५ ॥ २ ॥

पदें-तत् । ह । एषाम् । विजज्ञौ । तेभ्यः । ह । प्रादुर्बभूव । तत् । न । व्यजानन्त । किम् । इदम् । यक्षम् । इति ॥ १५ ॥ २ ॥

अन्वय व अर्थः-तेव्हां (तत् ह एषाम् विजज्ञौ)

(तत्) त्या ब्रह्मानें (ह एषाम्) ह्या इंद्रादि देवांचा अभिमान (विजज्ञौ) सर्वज्ञत्वानें जाणिला । व (तेभ्यः ह प्रादुर्बभूव) (तेभ्यः) त्या देवांच्या ठायीं असा वृथा अभिमान न राहवा ह्मणून (ह प्रादुर्बभूव) तें प्रत्यक्ष प्रकट झालें । पण (इदम् यक्षम् किम् इति) (इदम् यक्षम्) पूजा करण्यास योग्य असें हें (किम्) काय आहे (इति) हें (तत् न व्यजानन्त) (तत्) तें (न व्यजानन्त) त्या देवांना बरोबर समजलें नाहीं ॥ १५ ॥ २ ॥

अर्थः—तेव्हां त्या ब्रह्मानें ह्या इंद्रादि देवांचा अभिमान सर्वज्ञत्वानें जाणिला । व त्या देवांच्या ठायीं असा वृथा अभिमान न राहवा ह्मणून तें प्रत्यक्ष प्रकट झालें । पण पूजा करण्यास योग्य असें हें काय आहे? हें तें त्या देवांना बरोबर समजलें नाहीं ॥ १५ ॥ २ ॥

तेऽग्निमब्रुवन् जातवेद एतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति ॥ १६ ॥ ३ ॥

पदें—ते । अग्निम् । अब्रुवन् । जातवेद । एतत् । विजानीहि । किम् । एतत् । यक्षम् । इति । तथा । इति ॥ १६ ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः—तेव्हां (ते अग्निम् अब्रुवन्) (ते) इंद्रादि देव (अग्निम्) अग्नीला (अब्रुवन्) ह्मणाले- (जातवेद ! एतद् यक्षम् किम् इति) (जातवेद)

१ जातं वेत्ति इति जातवेदः—गुरुमुखाप्रमाणें ।

हे झालेलें जाणणाऱ्या अग्ने ! (एतद् यक्षम्) पूजा करण्यास योग्य असें हें (किम्) काय आहे (इति) हें । (एतद विजानीहि) (एतत्) तेवढें (विजानीहि) तूं तपासून ये। अग्नि ह्मणाला (तथा इति) बरें ! तसें करितों ॥ १६ ॥ ३ ॥

अर्थः—तेव्हां ते इंद्रादि देव अग्नीला ह्मणाले–हें झालेलें सर्व कांहीं जाणणाऱ्या अग्ने ! पूजा करण्यास योग्य असें हें काय आहे ? हें तेवढें तूं तपासून ये । अग्नि ह्मणाला । बरें तसें करितों. ॥ १६ ॥ ३ ॥

तदभ्यद्रवत्तमभ्यवदत् कोऽसीति । अग्निर्वाऽअहमस्मीत्यब्रवीज्जातवेदा वाऽअहमस्मीति ॥ १७ ॥ ४ ॥

पदें–तद् । अभ्यद्रवत् । तम् । अभ्यवदद् । कः । असि । इति । अग्निः । वै । अहम् । अस्मि । इति । अब्रवीत् । जातवेदाः । वै । अहम । अस्मि । इति ॥ १७ ॥ ४ ॥

अन्वय व अर्थ–नंतर (तत् अभ्यद्रवत (तत्) त्या पूजनीय यक्षाकडे (अभ्यद्रवत्) तो अग्नि गेला । तेव्हां (तम् अभ्यवदत्) (तम्) त्या अग्नीला (अभ्यवदत्) तो यक्ष ह्मणाला–(कः असि इति) (कः) कोण (असि) तूं आहेस (इति) असें । तेव्हां (अब्रवीत) अग्नि ह्मणाला–(अहम् वै अग्निः अस्मि) (अहम्) मी (वै अग्निः) प्रसिद्ध अग्नि नामक देव (अस्मि) आहें । (अहम् वै जातवेदाः अस्मि इति)

(अहम्) मी (वै जातवेदाः) हरयेक उत्पन्न झालेलें वस्तुमात्र जाणणारा जातवेद नामक अग्नि (अस्मि) आहें (इति) असें ॥ १७ ॥ ४ ॥

अर्थः—नंतर त्या पूजनीय यक्षाकडे तो अग्नि गेला। तेव्हां तो यक्ष ह्मणाला–तूं कोण आहेस, असें। तेव्हां अग्नि ह्मणाला–मी प्रसिद्ध अग्नि नामक देव आहें। मी हरयेक उत्पन्न झालेलें वस्तुमात्र जाणणारा जातवेद नामक अग्नि आहें असें ॥ १७ ॥ ४ ॥

तस्मिंस्त्वयि किं वीर्यमित्यपीदꣳसर्वं दहेयम् । यदिदं पृथिव्यामिति ॥ १८ ॥ ५ ॥

पदें–तस्मिन् । त्वयि । किम् । वीर्यम् । इति । अपि । इदम् । सर्वम् । दहेयम् । यत् । इदम् । पृथिव्याम् । इति । १८।५

अन्वय व अर्थः–तें ब्रह्म ह्मणालें (तस्मिन् त्वयि किम् वीर्यम्) तस्मिन् (त्वयि) तें जातवेदासारिखें सुंदर नांव धारण करणाऱ्या त्या तुझ्या ठिकाणीं (किम् वीर्यम्) काय पराक्रम आहे ? । अग्नि ह्मणाला–(इदम् सर्वम् अपि दहेयम्) (इदम् सर्वम् अपि) हें सर्व कांहीं, मग तें चर असो कीं अचर असो (दहेयम्) मी जाळून भस्म करीन ॥ १८ ॥ ५ ॥

अर्थः—तें ब्रह्म ह्मणालें—तें जातवेदासारखें सुंदर नांव धारण करणाऱ्या तुझ्या ठिकाणीं काय पराक्रम आहे ?। अग्नि ह्मणाला–हें सर्व कांहीं मग तें, चर असो कीं अचर असो, मी जाळून भस्म करूं शकेन ॥ १८ ॥ ५ ॥

तस्मै तृणं निदधावेतद्दहेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ १९ ॥ ६ ॥

पदें—तस्मै । तृणम् । निदधौ । एतत् । दह । इति । तत् । उपप्रेयाय । सर्वजवेन । तत् । न शशाक । दग्धुम् । सः । ततः । एव । निववृते । न । एतत् । अशकम् । विज्ञातुम् । यत् । एतत् । यक्षम् । इति ॥ १९ ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः—तेव्हां ब्रह्मानें (तस्मै तृणम् निदधौ) (तस्मै) त्याच्यापुढें (तृणम्) गवत (निदधौ) ठेविलें । आणि ह्मटलें—(एतत् दह इति) (एतत्) हें (दह) जाळून भस्म कर (इति) असें । तेव्हां अग्नि (तत् सर्वजवेन उपप्रेयाय) (तत्) त्या गवताजवळ (सर्वजवेन) मोठ्या वेगानें (उपप्रेयाय) गेला; पण तो (तत् दग्धुम् न शशाक) (तत्) तें गवत (दग्धुम्) जाळण्यास (न शशाक) समर्थ झाला नाहीं । तेव्हां (सः ततः एव निववृते) (सः) तो (ततः) त्या गवतापासूनच (निववृते) परत गेला । आणि देवांस ह्मणाला—(यत् एतत् यक्षम् इति) (यत् एतत्) जें हें (यक्षम् इति) कांहीं पूजनीय आहे । (एतत् विज्ञातुम् न अशकम्) (एतत्) तें हें (विज्ञातुम्) बरोबर जाणण्यास (न अशकम्) मी समर्थ झालों नाहीं ॥ १९ ॥ ६ ॥

अर्थः—तेव्हां ब्रह्मानें त्या गर्विष्ठ जातवेद ह्मणविणाऱ्या अग्नीपुढें गवत ठेविलें आणि ह्मटलें । हें जाळून भस्म कर

असें । तेव्हां अग्नि त्या गवताजवळ मोठ्या वेगानें गेला; पण तो तें गवत जाळण्यास समर्थ झाला नाहीं । तेव्हां तो अग्नि त्या गवतापासूनच परत गेला । आणि देवांस ह्मणाला–जें हें कांहीं पूजनीय आहे । तें हें बरोबर जाणण्यास मी समर्थ झालों नाहीं ॥ १९ ॥ ६ ॥

अथ वायुमब्रुवन्वायवेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति ॥ २० ॥ ७ ॥

पदें–अथ । वायुम् । अब्रुवन् । वायो । एतत् । विजानीहि । किम् । एतत् । यक्षम् । इति । तथा । इति॥२०॥७॥

अन्वय व अर्थ–(अथ वायुम् अब्रुवन्) (अथ) नंतर देव (वायुम्) वायूला (अब्रुवन्) ह्मणाले– (वायो किम् एतत् यक्षम् इति एतत् विजानीहि)(वायो) हे वायु । (किम्) जें काय (एतत् यक्षम्) हें यक्ष आहे (इति एतत्) तें हें (विजानीहि) बरोबर तपासून ये । तेव्हां वायु ह्मणाला–(तथा इति) बरें तसें करितों असें ॥ २० ॥ ७ ॥

अर्थः—नंतर देव वायूला ह्मणाले–हे वायु । जें काय हें यक्ष आहे तें हें बरोबर तपासून ये । तेव्हां वायु ह्मणाला–बरें, तसें करितों असें ॥ २० ॥ ७ ॥

तदभ्यद्रवत्तमभ्यवदत् कोऽसीति वायुर्वा अहमस्मीत्यब्रवीन्मातरिश्वा वा अहमस्मीति ॥ २१ ॥ ८ ॥

पदें–तत् । अभ्यद्रवत् । तम् । अभ्यवदत् । कः । असि । इति । वायुः । वै । अहम् । अस्मि । इति । अब्रवीत् । मातरिश्वा । वै । अहम् । अस्मि । इति ॥२१॥८॥

अन्वय व अर्थः–तो वायु (तत् अभ्यद्रवत्) (तत्) त्या ब्रह्माकडे धांवत गेला । तेव्हां (त्वम् कः असि इति) (त्वम्) तूं (कः) कोण (असि) आहेस ? (इति) असें तें ब्रह्म (तम् अभ्यदवत्) (तम्) त्या वायूला (अभ्यवदत्) ह्मणालें । तेव्हां (अहम् वायुः अस्मि इति) (अहम्) मी (वायुः) वायु (अस्मि) आहें (इति) असें (वै अहम् मातरिश्वा अस्मि इति) (वै अहम्) तसाच मी (मातरिश्वा[१]) प्राणवायु (अस्मि) आहें (इति) असें तो वायु (अब्रवीत्) ह्मणाला ॥२१॥८॥

अर्थः—तो वायु त्या ब्रह्माकडे धांवत गेला। तेव्हां तूं कोण आहेस ? असें तें ब्रह्म त्या वायूला ह्मणालें तेव्हां मी वायु आहें असें। तसाच मी प्राणवायु आहें असें तो वायु ह्मणाला-

तस्मिंस्त्वयि किं वीर्यमित्यपीदꣳसर्वमाददीयं यदिदं पृथिव्यामिति ॥ २२ ॥ ९ ॥

पदें–तस्मिन् । त्वयि । किम् । वीर्यम् इति । अपि । इदम् । सर्वम् । आददीयम् । यत् । इदम्त् पृथिव्याम् । इति ॥ २२ ॥ ९ ॥

अन्वय व अर्थः–नंतर ब्रह्म ह्मणालें–(तस्मिन् त्वयि किम् वीर्यम्) (तस्मिन् त्वयि) त्या तुझ्याठायीं (किम् वीर्यम्) काय पराक्रम आहे ? । वायूनें उत्तर केलें–(यत् इदम् पृथिव्याम्) (यत्) जें कांहीं (इदम्) हें (पृथिव्याम्) पृथ्वीवर आहे (इदम् सर्वम्

---

१ मातरि आकाशे मातुः उदरेवा श्वयति वर्धते इति मातरिश्वा ।

आददीयम् इति) (इदम् सर्वम्) हें सर्व (आददीयम्) मी उडवून टाकीन किंवा घेऊन जाईन (इति)असें॥२२॥

अर्थः—नंतर ब्रह्म ह्मणालें—त्या तुझ्या ठायीं काय पराक्रम आहे, । वायूनें उत्तर केलें—जें कांहीं हें पृथ्वीवर आहे । हें सर्व मी उडवून टाकीन किंवा घेऊन जाईन असें॥२२॥९॥

तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाकादातुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ २३ ॥ १० ॥

पदें—तस्मै । तृणम् । निदधौ । एतत् । आदत्स्व । इति । तत् । उपप्रेयाय । सर्वजवेन । तत् । न । शशाक । आदातुम् । सः ततः । एव । निववृते । न । एतत् । अशकम् । विज्ञातुम् । यत् । एतत् । यक्षम् । इति ॥ २३ ॥ १०॥

अन्वय व अर्थ—तेव्हां ब्रह्मानें (तस्मै तृणम् निदधौ) (तस्मै) त्याच्या गर्वाचा परिहार करण्यासाठीं (तृणम्) गवत (निदधौ) त्याच्यापुढें ठेविलें । आणि ह्मणालें—(एतत् आदत्स्व इति) (एतत्) हें आदत्स्व) घेऊन जा (इति) असें । तेव्हां वायु (तत् सर्वजवेन उपप्रेयाय) (तत्) त्याच्याजवळ (सर्वजवेन मोठ्या त्वेषानें (उपप्रेयाय) गेला । पण तो (तत् आदातुम् न शशाक) (तत्) तें गवत (आदातुम्) घेऊन जाण्यास (न शशाक) समर्थ झाला नाहीं । तेव्हां (सः ततः एव निववृते) (सः) तो वायु (ततः एव) त्या गवतापासूनच (निववृते) परत गेला । व देवांस ह्मणाला—(यत्

एतत् यक्षम् इति) (यत् एतत) जें हें (यक्षम्) यक्ष आहे तें (एतत) (विज्ञातुम् न अशकम्) (एतत) हें (विज्ञातुम्) बरोबर जाणण्याला (न अशकम्) मी समर्थ झालों नाहीं ॥ २३ ॥ १० ॥

अर्थः--तेव्हां ब्रह्मानें त्याच्या गर्वाचा परिहार करण्याकरितां गवत त्याच्यापुढें ठेविलें आणि ह्मणालें-हें घेऊन जा असें । तेव्हां वायु त्याच्याजवळ मोठ्या त्वेषानें गेला; पण तो तें गवत घेऊन जाण्यास समर्थ झाला नाहीं । तेव्हां तो वायु त्या गवतापासूनच परत गेला व देवांस ह्मणाला-जें हें यक्ष आहे तें हें बरोबर जाणण्याला मी समर्थ झालों नाहीं ॥ २३ ॥ १० ॥

अथेन्द्रमब्रुवन्मघवन्नेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति तदभ्यद्रवत्तस्मात्तिरोदधे ॥ २४ ॥ ११ ॥

पदें-अथ । इन्द्रम् । अब्रुवन् । मघवन् । एतत् । विजानीहि । किम् । एतत् । यक्षम् । इति । तथा । इति । तत् । अभ्यद्रवत् । तस्मात् । तिरः । दधे ॥ २४ ॥ ११ ॥

अन्वय व अर्थः-तेव्हां देव (इन्द्रम् अब्रुवन्) इंद्रास ह्मणाले-(मघवन् एतत् किम् यक्षम्)(मघवन्) हे ऐश्वर्यशाली इंद्रा ! (एतत किम् यक्षं) हें जें काय पूजा करण्यासारिखें आहे तें (एतत् विजानीहि) (एतत) तेवढ्याचा (विजानीहि) तपास करून ये । तेव्हां इंद्र ह्मणाला-(तथा इति) बरें, तसें करितों असें । नंतर तो इंद्र (तत् अभ्यद्रवत्) (तत्) त्या ब्रह्माकडे

(अभ्यद्रवत्) धांवत गेला, पण तें ब्रह्म (तस्मात् तिरः दधे) (तस्मात्) त्या इंद्राजवळून (तिरः दधे) त्याचा गर्वपरिहार करण्याकरितां अंतर्धान पावलें २४।११

अर्थः—तेव्हां देव इंद्रास ह्मणाले-हे ऐश्वर्यशाली इंद्रा ! हें जें काय पुजा करण्यासारिखें आहे त्या तेवढ्याचा तपास करून ये। तेव्हां इंद्र ह्मणाला—बरें, तसें करितों असें। नंतर तो इंद्र त्या ब्रह्माकडे धांवत गेला; पण तें ब्रह्म त्या इंद्राजवळून त्याचा गर्वपरिहार करण्याकरितां अंतर्धान पावलें ॥ २४ ॥ ११ ॥

स तस्मिन्नेवाकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमां हैमवतीं तां होवाच किमेतद्यक्षमिति ॥ २५ ॥ १२ ॥

पदें—सः । तस्मिन् । एव । आकाशे । स्त्रियम् । आजगाम । बहुशोभमानाम् । उमाम् । हैमवतीम् । ताम् । ह । उवाच । किम् । एतत् । यक्षम् । इति ॥ २५॥१२॥

अन्वय व अर्थः—तेव्हां तो इंद्र पूर्वोक्त अग्नि व वायु यांप्रमाणें तसाच परत गेला नाहीं। तो कच्चा दिलाचा नव्हता। (सः तस्मिन् एव आकाशे हैमवतीम् उमाम् स्त्रियम् आजगाम) (सः) तो (तस्मिन् एव आकाशे) त्याच आकाशांत किंवा स्थळीं (हैमवतीम् बहुशोभमानाम् स्त्रियम् उमाम्) सुवर्णाच्या अलंकारांनीं मण्डित व फारच शोभिवंत दिसलेली एक स्त्री जी ब्रह्मविद्या किंवा हिमवताची कन्या जी उमा तिजकडे प्राप्त झाला। व (ताम् उवाच) (ताम्) त्या उमा नामक

ब्रह्मविद्येला किंवा त्या सर्वज्ञ शंकराची सहधर्मचारिणी जी उमा तिला (उवाच) ह्मणाला–(ह किम् एतत् यक्षम् इति) पूजा करण्यास योग्य असें हें काय आहे असें ॥ २५ ॥ १२ ॥

अर्थः––तेव्हां तो इंद्र पूर्वोक्त अग्नि व वायु यांप्रमाणें तसाच परत गेला नाहीं। तो कच्चा दिलाचा नव्हता। तो निश्चयानें त्याच आकाशांत किंवा स्थळीं सुवर्णाच्या अलंकारांनीं मण्डित व फारच शोभिवंत दिसलेली एक स्त्री जी ब्रह्मविद्या किंवा हिमालयाची कन्या जी उमा हिजकडे प्राप्त झाला व त्या उमा नामक ब्रह्मविद्येला किंवा त्या सर्वज्ञ शंकराची सहधर्मचारिणी जी उमा तिला ह्मणाला–पूजा करण्यास योग्य असें हें काय आहे, असें ॥ २५ ॥ १२ ॥

इति तृतीयः खण्डः ॥

सा ब्रह्मेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति ततो विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २६ ॥ १ ॥

पदें–सा । ब्रह्म । इति । ह । उवाच । ब्रह्मणः । वै । एतत् । विजये । महीयध्वम् । इति । ततः । विदाञ्चकार । ब्रह्म । इति ॥ २६ ॥ १ ॥

अन्वय व अर्थः–नंतर (सा उवाच) (सा) ती उमा (उवाच) ह्मणाली–(ह ब्रह्म इति) (ह) तें खरोखर (ब्रह्म) ब्रह्म आहे (इति) असें। व (ब्रह्मणः विजये वै एतत् महीयध्वम् इति) (ब्रह्मणः विजये वै) ह्या ब्रह्माच्या विजयामुळेंच (एतत् महीयध्वम्) तुह्मी

एवढे मोठे झाले आहां (इति) असें । (ततः ह ब्रह्म एव इति) (ततः) हा उमेचा उपदेश झाल्यापासून (ह) तें खरोखर (ब्रह्म एव) ब्रह्मच होय (इति) असें (विदाञ्चकार) त्या इन्द्रास समजलें ॥ २६ ॥ १ ॥

अर्थः—नंतर ती उमा ह्मणाली–तें खरोखर ब्रह्म आहे असें व या ब्रह्माच्या विजयामुळेंच तुह्मी एवढे मोठे झाले आहां असें । हा उमेचा उपदेश झाल्यापासून तें खरोखर ब्रह्मच होय असें त्या इंद्रास समजलें ॥ २६ ॥ १ ॥

तस्माद्वा एते देवा अतितरामिवान्यान्देवान् यदग्निर्वायुरिन्द्रस्तेह्येनन् नेदिष्ठं पस्पर्शुस्तेह्येनत्प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २७ ॥ २ ॥

पदें—तस्मात् । वै । एते । देवाः । अतितराम् । इव । अन्यान् । देवान् । यत् । अग्निः । वायुः । इन्द्रः । ते । हि । एनत् । नेदिष्ठम् । पस्पर्शुः । ते । हि । एनत् । प्रथमः । विदाञ्चकार । ब्रह्म । इति ॥ २७ ॥ २ ॥

अन्वय व अर्थः–(तस्मात् वै एते देवाः अन्यान् देवान् अतितराम् इव) (तस्मात् वै) ह्मणूनच (एते देवाः) इन्द्र, अग्नि व वायु हे देव (अन्यान् देवान्) दुसऱ्या देवांपेक्षां (अतितराम् इव) जणुं काय श्रेष्ठ होऊन बसले आहेत । (यत् अग्निः वायुः इन्द्रः ते हि

एनत् नेदिष्ठम्) (यत् अग्निः वायुः इन्द्रः ते हि) कारण ते अग्नि, वायु व इन्द्र हे देव (एनत्) ह्या ब्रह्माला (नेदिष्ठम्) संभाषणादिकांनीं अत्यंत निकट (पस्पर्शुः) स्पर्श करिते झाले व (ते हि एनत् प्रथमः विदाञ्चकार) (ते हि) तेच (एनत्) ह्या पूजनीय यक्षाला (प्रथमः) सगळ्यांच्या आधीं (विदाञ्चकार) जाणते झाले। (ब्रह्म इति) कीं तें ब्रह्म होय ॥ २७ ॥ २ ॥

अर्थः—ह्मणूनच इन्द्र, अग्नि व वायु हे देव दुसऱ्या देवांपेक्षां जणुं काय श्रेष्ठ होऊन बसले आहेत । कारण ते अग्नि, वायु व इन्द्र हे देव ह्या ब्रह्माला संभाषणादिकांनीं अत्यंत निकट स्पर्श करिते झाले व तेच ह्या पूजनीय यक्षाला सगळ्यांच्या आधीं जाणते झाले। कीं तें ब्रह्म होय॥२७॥२॥

तस्माद्वा इन्द्रोऽतितरामिवान्यान् देवान् स ह्येतन्नेदिष्ठं पस्पर्श स ह्येनत्प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति२८।३

पदें—तस्मात् । वै । इन्द्रः । अतितराम् । इव । अन्यान् । देवान् । सः । हि । एतत् । नेदिष्ठम् । पस्पर्श । सः । हि । एनत् । प्रथमः । विदाञ्चकार । ब्रह्म । इति ॥ २८ ॥ ३ ॥

अन्वय व अर्थः–(तस्मात् वै इन्द्रः अन्यान् देवान्

---

१ श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणें ।

२ येथें अनेक वचनी कर्त्याप्रमाणें ‘ विदाञ्चक्रुः ’ पाहिजे ।

अतितराम् इव) (तस्मात् वै) ह्मणूनच (इन्द्रः) इन्द्र देवहि (अन्यान् देवान्) दुसऱ्या देवांहून (अतितराम् इव) जणुं काय अत्यंत वरचढ होऊन बसला आहे । (हि सः एनत् नेदिष्ठम् पस्पर्श) (हि) कारण कीं (सः) तो (एनत्) त्या यक्षरूप ब्रह्मास (नेदिष्ठम्) अत्यंत निकट (पस्पर्श) स्पर्श करिता झाला। व (ब्रह्म इति) तें ब्रह्म आहे असें (प्रथमः) सगळ्यांच्या आधीं (विदाञ्चकार) उमेपासून जाणता झाला ॥ २८ ॥ ३ ॥

अर्थः—ह्मणूनच इन्द्रहि दुसऱ्या देवांहून जणुं काय अत्यंत वरचढ होऊन बसला आहे । कारण कीं तो त्या यक्षरूप ब्रह्मास अत्यंत निकट स्पर्श करिता झाला व तें ब्रह्म आहे असें सगळ्यांच्या आधीं उमेपासून जाणता झाला ॥ २८ ॥ ३ ॥

---

१ इन्द्र हा जीवात्म्याची देवता । अग्नि ही नेत्रांचा । व वायु ही कर्णाची। तेव्हां जीवात्म्याचें नेत्रादि इंद्रियांवर प्रभुत्व आहे तें ठीकच। त्याप्रमाणेंच पूर्वोक्त आख्यायिकेंतील इंद्रादि देवतांच्या ठिकाणीं तीं तीं इंद्रियें घेऊन चाललें तर तिचा अर्थ चांगला सुगम होतो । नेत्रादि गौण इंद्रियांना त्या ब्रह्माचें विशेष ज्ञान होत नाहीं—त्यांस त्याचा भास मात्र होतो; पण ब्रह्माचें पुरें आकलन असें फक्त जीवात्म्यास होऊं शकतें । त्यास त्या इन्द्राप्रमाणें तळमळ लागली ह्मणजे, उमानामक ब्रह्मविद्या विजप्रमाणें चकून प्रकट होऊन त्याचा परमात्म्याशीं मिलाफ करिते । तेव्हांच त्यास (ब्रह्मानंद व अतींद्रिय ज्ञान) ह्मणतात तें प्राप्त होतें । असा भावार्थ लागतो ।

तस्यैष आदेशो यदेतद् विद्युतो व्यद्युतदा ३ इतीति न्यमीमिषदा ३ इत्यधिदेवतम् ॥ २९ ॥ ४ ॥

पदें–तस्य । एषः । आदेशः । यत् । एतत् । विद्यतः । व्यद्युतत् । आ । इति । इति । न्यमीमिषत् । आ । इति । अधिदैवतम् ॥ २९ ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः–(तस्य एषः आदेशः) (तस्य) त्या यक्षरूप ब्रह्माचें (एषः आदेशः) असें उदाहरणानें विवरण आहे । (यत् एतत् विद्युतः व्यद्युनत् आ इति इति) (यत् एतत्) जें हें (विद्युतः व्यद्युतत् आ इति इति) जसें विजेचें चकून चमकून हां हां ह्मणतां नाहींसें होणें होतें तसेंच केवळ अथवा (न्यमीमिषत् आ इति) डोळे निमिषमात्रांत उघडून लावावे तसेंच केवळ (अधिदैवतम्) हें ब्रह्मसंबंधी विवरण आहे ॥ २९ ॥ ४ ॥

अर्थः—त्या यक्षरूप ब्रह्माचें असें उदाहरणानें विवरण आहे । जें हें जसें विजचें चकून चमकून हांहां ह्मणतां नाहींसें होणें होतें तसेंच केवळ, अथवा डोळे निमिषमात्रांत उघडुन लावणें तसेंच केवळ हें ब्रह्मसंबंधी विवरण आहे २९।४

अथाध्यात्मं यदेतद् गच्छतीव च मनो नेन चैतदुपस्मरत्यभीक्ष्णं सङ्कल्पः ॥ ३० ॥ ५ ॥

पदें–अथ । अध्यात्मम् । यत् । एतत् । गच्छति । इव । च । मनः । अनेन । च । एतत् । उपस्मरति । अभीक्ष्णम् । सङ्कल्पः ॥ ३० ॥ ५ ॥

अन्वय व अर्थः–(यत् एतत् मनः गच्छति इव)

(यत् एतत्) ह्या ब्रह्माकडे (मनः) मन (गच्छति इव) जणुं काय चटकन जाऊं द्यावें किंवा जातें (च अनेन एतत् उपस्मरति (च) आणि (अनेन) ह्या मनानें (एतम्) त्या ब्रह्माचें (उपस्मरति) अगदीं जवळ जाऊन स्मरण करावें किंवा एखादा करितो। (सङ्कल्पः अभीक्ष्णम् च) (सङ्कल्पः) अंतःकरणाची (अभीक्ष्णम्) एकतानवृत्ति करावी किंवा करितो (अथ अध्यात्मम्) असें हें पुढील अध्यात्मिक किंवा शरीरांतील आत्म्याचें दिग्दर्शन किंवा उदाहरण आहे ॥ ३० ॥ ५[२]॥

अर्थः—त्या ह्या ब्रह्माकडे मन जणुं काय चटकन जाऊं द्यावें किंवा जातें। आणि ह्या मनानें त्या ब्रह्माचें स्मरण अगदीं जवळ जाऊन करावें किंवा एखादा करितो, व अंतःकरणाची एकतान वृत्ति करावी किंवा करितो। असें हें पुढील अध्यात्मिक किंवा शरीरांतील आत्म्याचें दिग्दर्शन किंवा उदाहरण आहे ॥ ३० ॥ ५ ॥

तद्ध तद्वनं नाम तद्वनमित्युपासितव्यम् ।
स य एतदेवं वेदाभिहैनं सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति ॥ ३१ ॥ ६ ॥

---

१ हीं क्रियापदें वर्तमान काळीं आहेत तरी त्यांचा अर्थ कोणी असा विद्धयर्थीं लावितात व ह्या मंत्रांतील आज्ञा, ब्रह्मप्राप्ति कशी करून घ्यावी ह्याची दिशा दाखविणाऱ्या आहेत असें समजतात । तसा, दुसरा अर्थ मागल्या मंत्रांतील विवरणाचें समर्थन होईल असा श्रीमच्छंकराचार्यांसारिखे टीकाकार लावितात।

२ ह्या मंत्राचें मोक्ष मुल्लर यांनीं केलेलें भाषांतर शंकराचार्यांच्या भाषांतरापेक्षां अगदीं निराळें आहे।

पदें–तत् । ह । तद् । वनम् । नाम । तद्वनम् । इति । उपासितव्यम् । सः । यः । एतत् । एवम् । वेद । अभिहैनम् । सर्वाणि । भूतानि । संवाञ्छन्ति ॥ ३१ ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः–(ह तत् तद्वनम् नाम) शिवाय (ह) हें सगळ्यांस ठाऊकच आहे कीं (तत्) तें ब्रह्म (तद्वनम् नाम) सगळ्या सजीव वस्तूंचा अद्वितीय आत्मा होय व तें तसेंच सर्वांस पूज्य आहे ह्मणून त्यास तद्वन असें यथार्थ ह्मणतात । (तद्वनम् इति उपासितव्यम्) तेव्हां (तद्वनं इति) त्या तद्वन या नांवानें तें (उपासितव्यम्) ध्यान करण्यास योग्य आहे । (यः एतद् एवम् अभिहैनम् वेद) (यः) जो (एतद् एवम् अभिहैनम्) ह्या ब्रह्माला अशा गुणांनीं युक्त मानून ध्यातो । (सः सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति) (सः) त्या भक्तावर (सर्वाणि भूतानि) सगळे प्राणिमात्र (संवाञ्छन्ति) प्रेम करितात । ह्मणून तूं त्या ब्रह्माचें तसें ध्यान कर॥ ३१ ॥ ६ ॥

अर्थः—शिवाय हें सगळ्यांस ठाऊकच आहे कीं तें ब्रह्म सगळ्या सजीव वस्तूंचा अद्वितीय आत्मा होय व तें तसेंच सर्वांस पूज्य आहे ह्मणून त्यास तद्वन असें यथार्थ ह्मणतात । तेव्हां त्या तद्वन या नांवानें तें ध्यान करण्यास योग्य आहे । जो ह्या ब्रह्माला अशा गुणांनीं युक्त मानून ध्यातो । त्या भक्तावर सगळे प्राणिमात्र प्रेम करितात । ह्मणून तूं त्या ब्रह्माचें तसें ध्यान कर ॥ ३१ ॥ ६ ॥

उपनिषदं भो ब्रूहीत्युक्ता त उपनिषद् ब्राह्मीं वाव त उपनिषदमब्रूमेति ॥ ३२ ॥ ७ ॥

---

१ छांदस प्रयोग ।

पदें—उपनिषदम् । भोः । ब्रूहि । इति । उक्ता । ते ब्राह्मीम् । वाव । ते । उपनिषदम् । अब्रूम । इति ॥३२॥७॥

अन्वय व अर्थः–गुरु ह्मणतात–([1] भोः उपनिषदम् ब्रूहि) (भोः) अहो आचार्य (उपनिषदम्) ब्रह्मविद्या (ब्रूहि) मला सांगा (इति) असें तूं आह्माला विनविलेंस । त्याप्रमाणें (ते उपनिषत् उक्ता) (ते) तुला (उपनिषत्) ब्रह्मविद्या (उक्ता) सांगितली गेली आहे । (ते ब्राह्मीम् उपनिषदम् वाव अब्रूम) (ते) तुला (ब्राह्मीम् उपनिषदम्) ब्रह्मसंबंधी विद्या (वाव) खरोखर (अब्रम इति) आह्मीं सर्व सांगितली आहे ॥ ३२ ॥७॥

अर्थ––गुरु ह्मणतात । अहो आचार्य ! ब्रह्मविद्या मला सांगा असें तूं आह्मास विनविलेंस । त्याप्रमाणें तुला ब्रह्मविद्या सांगितली गेली आहे । तुला ब्रह्मसंबंधी विद्या खरोखर आह्मीं सर्व सांगितली आहे ॥ ३२ ॥ ७ ॥

तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा वेदाः सर्वाङ्गानि सत्यमायतनम् ॥ ३३ ॥ ८ ॥

पदें—तस्यै । तपः । दमः । कर्म । इति । प्रतिष्ठा । वेदाः । सर्वाङ्गानि । सत्यम् । आयतनम् ॥ ३३ ॥ ८ ॥

---

१ कोणी हे शब्द शिष्याच्या तोंडी घालितात व पुढील गुरूच्या मुखीं घालितात पण तेणें करून मुख्य अर्थांत कांहीं फरक पडत नाहीं । पण पहिल्या अर्थाच्या योगानें शिष्य मदबुद्धीचा होता असें दिसूं लागतें । तसें दुसऱ्या अर्थानें दिसत नाहीं । व शिष्य मंदबुद्धीचा होता असें घेण्याचें विशेष कारण दिसत नाहीं । ह्मणून सरळ अर्थास दुसरा अर्थ बाधक मानिलेला नाहीं ।

अन्वय व अर्थः–पण (तस्यै तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा[1]) (तस्यै) त्या ब्रह्मविद्येच्या व ब्रह्माच्या प्राप्तीस जें भक्तिमंदिर बांधतात त्याचा (तपः) मान, अपमान, सुख, दुःख, लाभ, हानि, शीत, उष्ण इत्यादि परस्पर विरुद्ध द्वन्द्वांचें सहन करणें, (दमः) मन ताब्यांत राखणें, (कर्म) धर्मशास्त्रोक्त सदाचरण, अग्निहोत्रादि वेदोक्त व व्यावहारिक कर्मे (इति) हा । (प्रतिष्ठा) पाया होय । त्यावरील (वेदाः सर्वाङ्गानि[3] सत्यम् आयतनम्) (वेदाः) ऋग्वेदादि चार वेद (सर्वाङ्गानि) शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्दःशास्त्र व ज्योतिःशास्त्र हीं सहा अङ्गें (सत्यम्) सत्याचरण हें (आयतनम्) घर होय ॥ ३३ ॥ ८ ॥

अर्थः––पण त्या ब्रह्मविद्येच्या व ब्रह्माच्या प्राप्तीस जें भक्तिमंदिर बांधितात त्याच्या मान अपमान, सुखदुःख, लाभ-हानि, शीतउष्ण इत्यादि परस्पर विरुद्ध द्वंद्वांचें सहन करणें, मन ताब्यांत राखणें, धर्मशास्त्रोक्त सदाचरण व अग्निहोत्रादि वेदोक्त व व्यावहारिक कर्मे हा पाया होय । त्यावरील ऋग्वेदादि चार वेद शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्दःशास्त्र,व ज्योतिःशास्त्र हीं सहा अंगें, व सत्याचरण हें घर होय॥३३॥८

---

१ (इति) ह्या शब्दापुढें (साधनानि) हा शब्द अध्याहृत घेतात व हीं साधनें आहेत असा कोणी अर्थ करितात ।

२ केव्हां (प्रतिष्ठा) ह्याचा अर्थ प्रतिष्ठितपणा घेतात ।

३ (वेदाः सर्वाङ्गानि) असा अन्वय करून त्यांचा अर्थ । वेद हे अवयव होत । असा कोणी करितात ।

४ (सत्यम् आयतनम्)–असा अन्वय करून त्यांचा अर्थ सत्य हें घर होय । असा कोणी करितात ।

यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥ ३४ ॥ ९ ॥

पदें–यः । वै । एताम् । एवम् । वेद । अपहत्य । पाप्मानम् । अनन्ते । स्वर्गे । लोके । ज्येये । प्रतितिष्ठति । प्रतितिष्ठति ॥ ३४ ॥ ९ ॥

अन्वय व अर्थः–(यः वै एताम् एवं वेद) (यः) जो कोणी (एताम्) ही केनोपनिषद् नामक ब्रह्मविद्या (एवम्) ह्या प्रकारें (वेद) जाणतो । तो (पाप्मानम् अपहत्य) अनादि कालापासून सांचलेल्या पापाला टाकून (अनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति) (अनन्ते) अविनाशी (स्वर्गे) सुखस्वरूपी ([1]लोके) सूक्ष्म दृष्टीनें अथवा ज्ञानदृष्टीनें पाहण्यास योग्य (ज्येये) सर्वांहून श्रेष्ठ अशा परमात्म्याच्या ठायीं (प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति) सुखासमाधानानें निःसंदेह राहतो ॥ ३४ ॥ ९ ॥

अर्थः––जो कोणी ही केनोपनिषद् नामक ब्रह्म विद्य ह्याप्रकारें जाणतो । तो अनादि कालापासून सांचलेल्या पापाला टाकून अविनाशी, सुखस्वरूपी, सूक्ष्मदृष्टीनें अथवा ज्ञानदृष्टीनें पाहण्यास योग्य व सर्वांहून श्रेष्ठ अशा परमात्म्याच्या ठायीं सुखासमाधानानें निःसंदेह राहतो ॥ ३४ ॥ ९ ॥

इति चतुर्थ खण्डः ॥

इति परशुरामेण कृता त्रिविधतापहारिणी प्रतिपदबोधिनी नाम्नी महाराष्ट्रभाषाटीका समाप्ता ॥

(१ लोक) ह्याचा अर्थ लोक व (ज्येये) हें त्याचें विशेषण करून त्याचा अर्थ अजिंक्य लोकीं असा मोक्ष मुल्लर करितात ।